इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ४० ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव




बुधवार,ता. १० जून २०२६ | अधिक ज्येष्ठ कृष्ण १० | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००



कोल्हापुरात अवैध औषध साठा जप्तीची कारवाई करताना अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी.

# तुकाराम मुंडेंचा धडाका

## कोल्हापुरात १३ लाखांचा औषधांचा साठा जप्त

**कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-**

**रविवार पेठ परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये विनापरवाना औषधांचा साठा केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करत १३ लाख ६२ हजार रुपये किमतीची औषधे जप्त केली. ही कारवाई सोमवारी सायंकाळी करण्यात आली.**

अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त महेश कवटिकवार व औषध निरीक्षक श्रीकांत पाटील यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर औषधांचा साठा आढळून आला. या साठ्याबाबत आवश्यक परवाना नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर अधिकाऱ्यांनी औषधे ताब्यात घेतली.

प्राथमिक चौकशीत सातारा येथील मेड बेब्स फार्मा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने हा औषधसाठा कोल्हापुरातील त्यांच्या एरिया सेल्स मॅनेजरकडे पाठविल्याचे समोर आले. संबंधित मॅनेजरकडून विनापरवाना औषधांचा साठा करण्यात आल्याची माहिती प्रशासनाला मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.जप्त करण्यात आलेल्या औषधांची एकूण किंमत (पान २ वर)

# 'शक्तीपीठ' विरोधात कोल्हापुरात शेतकऱ्यांचा विराट मोर्चा

**कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)**

**प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाविरोधातील मंगळवारी कोल्हापुरात हजारो शेतकऱ्यांनी विराट मोर्चा काढून सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला. 'रद्द करा, रद्द करा, शक्तीपीठ महामार्ग रद्द करा', 'जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची' अशा घोषणांनी शहर दणाणून गेले. शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात जिल्ह्यातील शेतकरी, महिला, युवक, ग्रामस्थ तसेच राजकीय पक्षांचे नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रस्तावित महामार्गामुळे हजारो एकर सुपीक शेती, पाणीपुरवठा योजना, नद्या, धार्मिक स्थळे आणि ग्रामीण जीवनव्यवस्था धोक्यात येणार आहे. त्यामुळे महामार्ग पूर्णपणे रद्द करण्याची मागणी केली.**

सकाळी साडेदहापासून दसरा चौक येथे शेतकऱ्यांची गर्दी होण्यास सुरुवात झाली. दुपारी बारा वाजता मोर्चाला प्रारंभ झाला. हातात फलक, बॅनर आणि काळे झेंडे घेत शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या (पान २ वर)




कोल्हापूर - शक्तीपीठ महामार्ग रद्द करा या मागणीसाठी शेतकऱ्यांनी काढलेला विराट मोर्चा.

## शिर्डीत बुरशीयुक्त पेढ्यांची विक्री

**शिर्डी,ता.९-**

**बुरशीयुक्त पेढ्यांबाबत भाविकांकडून तक्रारी आल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन मंळवारी शिर्डीत धडक कारवाई सुरू केली. त्यामध्ये शिर्डीत मंदिर परिसरात असणाऱ्या शेकडो प्रसादाच्या दुकानांवर भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री सुरू असल्याचे उघड झाले. या कारवाईमुळे भेसळखोरांचे धाबे दणाणल्याचे आहे.**

शिर्डीत दररोज हजारो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. अनेक भाविक (पान २ वर)

# देशभरात पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा अंदाज

**नवी दिल्ली,ता.९-**

**देशाच्या विविध भागात मान्सून वेगाने पुढे सरकत असून, पश्चिमी वारे सक्रिय झाल्याने उत्तर-पश्चिम भारतातील हवामानातही बदल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) बुधवारी दिल्ली-एनसीआरमध्ये जोरदार वारे आणि पावसाचा इशारा दिला आहे.**

आयएमडीच्या माहितीनुसार, राजधानीत बुधवारी दुपारनंतर ते सायंकाळदरम्यान जोरदार वाऱ्यांसह मेघगर्जना आणि पावसाची शक्यता आहे. या दिवशी कमाल तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सियस, तर किमान तापमान २९ ते ३१ अंश सेल्सियस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. ११ जून रोजीही अशीच परिस्थिती राहणार असून वाऱ्यांचा वेग ताशी (पान २ वर)

### राज्यात पाऊस, वादळी वाऱ्याचा तडाखा

राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे २४ जिल्ह्यांतील १ लाख ५०० एकरांहून अधिक शेतजमीन बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नुकसानग्रस्त भागांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

# तृणमूलच्या लोकसभेतील पक्षप्रतोदपदी कल्याण बॅनर्जी

### लोकसभा अध्यक्षांना पाठवले पत्र

**कोलकाता,ता.९-**

टीएमसीमधील फुटीच्या पार्श्वभूमीवर, ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी खासदार कल्याण बॅनर्जी यांची लोकसभेतील पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून नियुक्ती केली. त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना पत्र लिहून हा निर्णय तात्काळ प्रभावाने लागू करण्याची विनंती केली आहे.



एक दिवसापूर्वी झालेल्या बंडानंतर टीएमसीच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांनी ममता बॅनर्जी यांचा पक्ष सोडला होता. त्यांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी खासदार काकोली घोष दस्तीदार यांची मुख्य प्रतोद म्हणून निवड केली आहे. काकोली घोष यांनी स्वतः बंडखोर खासदारांच्या स्वाक्षरीचे पत्र (पान २ वर)

### बेदाणा व्यापाऱ्याची फसवणूक ; दिल्लीच्या ठगांवर गुन्हा दाखल

**सांगली,ता.९(प्रतिनिधी)-**

**होलसेल दराने बेदाणा खरेदी करुन दिल्लीतील दोघांनी सांगलीतील व्यावसायिकाची तब्बल ३ लाख ६७ हजार ८५५ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी श्रवण सत्यनारायण मर्दा (रा.सांगली) यांनी विश्रामबाग पोलीसात फिर्याद दिली आहे.**

शहरातील मार्केट यार्ड परिसरात श्रवण मर्दा यांचे बेदाणा आणि हळद होलसेल विक्रीचे कार्यालय आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये दिल्लीतील अरुण गोयल आणि यश अरुण गोयल या दोघांनी मर्दा (पान २ वर)

# वर्धा नदीत पाच मित्रांचा बुडून मृत्यू

**चंद्रपूर,ता.९-**

**उकाड्यापासून दिलासा मिळावा म्हणून वर्धा नदीत पोहण्यासाठी गेलेल्या पाच मित्रांचा बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस शहरात ही दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. यातील तिघांचे मृतदेह मिळाले असून अन्य दोघांचा शोध सुरू आहे.**



घुग्गुस शहरातील इंदिरानगर परिसरात राहणारे नकुल केळझकर, तन्मय पथाडे, सम्यक सोनटक्के, सन्नी आसपेल्ली आणि रोहित बोबडे हे पाच मित्र सोमवारी दुपारी घरातून बाहेर पडले. घुग्गुस-वणी मार्गावरील हिंदू स्मशानभूमीजवळ असलेल्या वर्धा नदीच्या चांदूर घाटावर ते पोहण्यासाठी गेले होते. (पान २ वर)

# कोल्हापुरात रिक्षाचालकाचा खून

**कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-**

**तीन महिन्यांपूर्वी मित्रावर झालेल्या चाकू हल्ल्याच्या रागातून पाच जणांनी टेंबलाई मंदिराच्या कमानीजवळ सोमवारी रात्री रिक्षाचालक सोहेब उर्फ साद मुबारक पठाण (वय २४,रा.ओंकार कॉलनी,उचगाव) याच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केला होता. गंभीर जखमी झालेल्या सोहेबचा उपचारादरम्यान मंगळवारी पहाटे मृत्यू झाला. याप्रकरणी राजारामपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यानुसार तिघा संशयितांसह दोन अल्पवयीन मुलांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने बारा तासांत ताब्यात घेतले.**



विशाल सूर्यवंशी | आदित्य ओहोळ | आयुष माने

**दोन अल्पवयीनांसह पाच जण ताब्यात**

आदित्य सुखदेव ओहोळ (वय २४,रा.सुधाकर जोशीनगर), विशाल ज्ञानेश्वर सूर्यवंशी (वय २०,रा.बापूरामनगर,कळंबा) आणि आयुष सदाशिव माने (वय २१,रा.शाहू कॉलनी,विक्रमनगर) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. या गुन्ह्यात दोन अल्पवयीन मुलांचाही सहभाग आहे. मृतासह सर्व हल्लेखोरही पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.

मणेर मळा येथे राहणारा सोहेब पठाण हा सोमवारी सायंकाळी घराकडे जात असताना टेंबलाई मंदिराच्या कमानीजवळ मित्रांसोबत थांबला होता. याचवेळी तेथे दबा धरून बसलेल्या पाच ते सात जणांनी त्याच्यावर चाकू, कोयता व अन्य धारदार शस्त्रांनी हल्ला केला. हल्ल्यानंतर सोहेबने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र हल्लेखोरांनी त्याचा पाठलाग करून पुन्हा त्याच्यावर वार केले. हल्ल्यात सोहेबच्या हात, पाय, छाती, पोट आणि पाठीवर गंभीर जखमा झाल्या. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर (पान २ वर)

### एनडीए, सीडीएससाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**मुंबई,ता.९-**

**राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने तांत्रिक अडचणींची दखल घेत दोन्ही परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीत वाढ केली आहे.**

यूपीएससीच्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, एनडीए आणि सीडीएस २०२६ या परीक्षांसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख आता ११ जून २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज भरण्याचा (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४८००० रु. | २४८००० रु. |

अंडी ६४० रुपये शेकडा

**हास्यतुषार -सुरेंद्र दास**



ते पिऊन पडले खरं, पण रस्त्यावर साठलेल्या पाण्यात पाय घसरून पडले आणि तेच पाणी नाका तोंडात जाऊन चक्क बेशुद्ध पडले ..!

# बेळगावात सव्वादहा लाखाचे हेरॉईन जप्त

**बेळगाव,ता.९(प्रतिनिधी)-**

**सार्वजनिक ठिकाणी अवैध हेरॉईन विकणाऱ्या टोळीवर छापा टाकणाऱ्या बेळगाव शहर सीसीबी पोलिसांनी तिघांना अटक केली असून, त्यांच्याकडून १०.३१ लाख रुपयांचे हेरॉईन आणि इतर साहित्य जप्त करण्यात यश मिळवले आहे.**

या प्रकरणातील आरोपींची नावे निखिल नारायण बेल्लारी (२४) (साक्षीदारी: रेल्वे क्वार्टर्स, बेळगाव), कपिला गजानन होसुराकर (१८) (साक्षीदारी: मुजावर गल्ली, बेळगाव), आकाश आनंद साळुंके (३४) (साक्षीदारी: मुजावर गल्ली, बेळगाव) अशी आहेत.



बेळगाव: अटक केलेल्या आरोपीसमवेत पोलिस अधिकारी.

हे तिघेही बेळगावमधील तांगडी गल्लीतील महादेव मंदिरामागे एका सार्वजनिक ठिकाणी हेरॉईन विकत होते, तेव्हा सीसीबीचे पोलीस निरीक्षक मंजुनाथ नायक यांनी सीसीटी विभागाचे पोलीस उपनिरीक्षक मंजुनाथ भजंतरी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने छापा टाकला.

**तिघांना अटक**

आरोपींकडून ९,५०,००० रुपये किमतीचे ४७.२९ ग्रॅम हेरॉईन (४६६ लहान गोळ्या), ७०,००० रुपये किमतीची (पान २ वर)

# बागणीत दोन दुचाकीची धडक;एक ठार,चार जखमी

**आष्टा,ता.९(प्रतिनिधी**

**बागणी तालुका वाळवा येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एक ठार तर चौघे जखमी झाले. सोमनाथ सर्जेराव मदने (वय ३४, रा.शिगाव) असे मयताचे नाव असून मुशरफ मनुलाशा फकीर, मोईन मानुलाशा फकीर व अनोळखी दोन असे चौघे जखमी झाले आहेत.**

याप्रकरणी कमाल नबीलाल शेख यांनी आष्टा पोलीसात फिर्याद दिली. त्यानुसार मयत सोमनाथ मदने यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. फिर्यादी यांचे जावई मुशरफ फकीर व त्याचा भाऊ मोईन फकीर हे त्यांचे दुचाकीवरुन शिगाव ते बागणी रोडने जात होते. तेव्हा बागणीकडून भरधाव वेगाने येणारा दुचाकी चालक सोमनाथ सर्जेराव मदने हा पाठीमागे दोघांना बसवून घेऊन येत होता. रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन विरुध्द दिशेने येऊन समोरुन दुचाकीस जोराची धडक दिली. यात मोईन फकीर तसेच पाठीमागे बसलेले मुशरफ फकीर हे गंभीर जखमी झाले. तर मदने हे ठार झाले असून त्यांच्या मोटरसायकल वरील अनोळखी दोघे गंभीर जखमी झाले.



# नदीजोड प्रकल्पांमध्ये विचारसरणी हेच सर्वात मोठे आव्हान - उपराष्ट्रपती

**नवी दिल्ली,ता.९–**

**देशात जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नद्यांना जोडणे आणि भूजल पातळी वाढविण्याच्या प्रयत्नांना अधिक गती देणे आवश्यक असल्याचे उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी मंगळवारी सांगितले. नदीजोड प्रकल्पांच्या अंमलबजावणीत निधीची कमतरता ही मोठी अडचण नसून लोकांची विचारसरणी आणि राजकीय कारणे ही अधिक मोठी आव्हाने असल्याचे त्यांनी नमूद केले.**

उपराष्ट्रपती भवनात जलशक्ती मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकी दरम्यान राधाकृष्णन म्हणाले की, राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने पाण्याचे अधिक प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी दूरदृष्टीपूर्ण आणि सहकार्यात्मक दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज आहे. या बैठकीत त्यांना जलसंपदा, नदी विकास आणि गंगा संवर्धन विभागाच्या विविध योजना व प्रकल्पांची माहिती देण्यात आली.

उपराष्ट्रपतींनी 'जल संचय जनभागीदारी' अभियानाचे कौतुक करताना सांगितले की, सरकार, समाज, उद्योग क्षेत्र आणि विविध संस्थांच्या सहभागातून जलसंवर्धन आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी चांगले प्रयत्न केले जात आहेत. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत जलसंवर्धन आणि भूजल पुनर्भरणाशी



संबंधित १.५५ कोटींहून अधिक संरचना उभारण्यात आल्या किंवा त्यांची नोंद करण्यात आली असून, हा आकडा निर्धारित उद्दिष्टापेक्षा लक्षणीयरीत्या अधिक असल्याची माहिती त्यांना देण्यात आली. बैठकीत उपराष्ट्रपतींना केन-बेतवा लिंक प्रकल्प, पार्वती-कालीसिंध-चंबळ लिंक प्रकल्प आणि गोदावरी-कावेरी लिंक प्रकल्प यांसह प्रमुख नदीजोड प्रकल्पांच्या प्रगतीची माहितीही देण्यात आली. नद्यांना जोडल्यामुळे जलटंचाई कमी होण्यास, दुष्काळाशी सामना करण्यास, सिंचन क्षेत्राचा विस्तार करण्यास आणि विविध प्रदेशांच्या संतुलित विकासास मोठी मदत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीत केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी उपराष्ट्रपतींना सप्टेंबर २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या 'इंडिया इंटरनॅशनल वॉटर वीक २०२६' मध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण दिले.

(पान १ वरून)

## रिक्षाचालकाचा खून

कुटुंबीयांनी त्याला सीपीआर रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारांनंतर खासगी रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असताना पहाटे त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शेंडा पार्क परिसरात नातेवाईक आणि मित्रांनी संताप व्यक्त केला. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती देत परिस्थिती नियंत्रणात ठेवली. दरम्यान, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अंमलदार वैभव पाटील, संतोष बरगे आणि विशाल खराडे यांना आरोपी कंदलगाव-पाचगाव मार्गावरील नवीन पाण्याच्या टाकीजवळ असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांच्या पथकाने पहाटे छापा टाकून संशयितांना ताब्यात घेतले.

प्राथमिक तपासात या खुनामागे जुन्या वादाचे कारण असल्याचे समोर आले आहे. राजेंद्रनगर परिसरातील एका वादातून करण नावाच्या युवकाला मारहाण झाल्याचा राग सोहेबच्या मनात होता. त्यातून तीन महिन्यांपूर्वी सोहेबने आदित्य ओहोळ याच्यावर चाकूहल्ला केला होता आहे. त्या घटनेचा राग मनात धरून आदित्य आणि त्याच्या साथीदारांनी हा हल्ला केला. सोहेब हा व्यवसायाने रिक्षाचालक होता. त्याचे वडील आणि लहान भाऊदेखील रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. पुढील तपास राजारामपुरी पोलीस करत आहे.

## बेदाणा व्यापाऱ्याची फसवणूक

यांच्याशी संपर्क साधला. गोयल ट्रेडर्स आणि हरेकृष्णा ट्रेडर्स अशा दोन त्यांच्या कंपन्या असल्याचे त्यांनी मर्दा यांना सांगितले. या कंपनीमार्फत दोघांनी फिर्यादी मर्दा यांच्याकडून होलसेल स्वरुपात बेदाणा खरेदी केला. त्याची देय रक्कम ३ लाख ६७ हजार ८५५ रुपये झाली. ती त्यांनी काही दिवसांनी देतो असे सांगितले.

मर्दा यांनी विश्वासाने त्यांना बेदाणा दिला. मात्र वारंवार मागणी करूनही संशयित दोघांनी मर्दा यांना ठरलेली रक्कम दिली नाही. त्यानंतर पैसे देण्यात टाळाटाळ केली. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेवून फिर्याद दिली. पोलिसांनी दोघा संशयितांवर गुन्हा दाखल केला आहे.

## तृणमूलच्या लोकसभेतील पक्षप्रतोदपदी कल्याण बॅनर्जी

लोकसभा अध्यक्षांना पाठवून, टीएमसीमधून बाहेर पडलेल्या खासदारांसाठी स्वतंत्र संसदीय गट स्थापन करण्याची विनंती केली आहे. मुख्य प्रतोद हे राजकीय पक्षाचे एक वरिष्ठ नेते असतात, ज्यांच्यावर संसदेत किंवा विधानसभेत पक्षाच्या खासदार आणि आमदारांमध्ये शिस्त राखण्याची आणि पक्षाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असते. आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाते.

सध्या टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. ३ जून रोजी बंगालमधील ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनीही एक वेगळा गट स्थापन केला. या गटाचे नेतृत्व ऋतब्रता करत आहेत.

दरम्यान, दिल्लीत एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना कल्याण बॅनर्जी म्हणाले की, बंडखोर खासदारांनी राजकीय नैतिकता गमावली आहे. पक्षाविरुद्ध काही तक्रार असलेल्या कोणत्याही नेत्याने आपल्या खासदार पदाचा राजीनामा द्यावा, असे ते म्हणाले. माजी राज्यसभा खासदार सुखेंदू शेखर रॉय यांचे उदाहरण देत ते म्हणाले की, आरोप केल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला आणि इतर बंडखोर खासदारांनीही त्यांचेच अनुकरण करावे. पक्षांतरबंदी कायद्यातून सुटण्यासाठी बंडखोर गटाकडे आवश्यक संख्याबळ नाही, असेही बॅनर्जी म्हणाले.

## वर्धा नदीत पाच मित्रांचा बुडून मृत्यू

नदीकाठी कपडे ठेवून सर्वजण पाण्यात उतरले. मात्र नदीतील खोल पाण्याचा अंदाज न आल्याने पाचही जण पाण्यात अडकले. त्यानंतर ते बाहेर न आल्याने ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. संध्याकाळपर्यंत मुले घरी परतली नसल्याने कुटुंबीयांनी घुग्गुस पोलिस ठाण्यात धाव घेत माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली.

तपासादरम्यान नदीकाठी युवकांचे कपडे आणि मोबाईल फोन आढळून आल्याने ते नदीत बुडाल्याची शक्यता अधिक बळावली. बोटीच्या मदतीने रात्रभर शोधकार्य सुरू ठेवण्यात आले. शोधमोहीमेदरम्यान तन्मय पथाडे, रोहित बोबडे आणि सन्नी आसपेल्ली या तिघांचे मृतदेह नदीतून बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. उर्वरित दोन युवकांचाही शोध सुरू ठेवण्यात आला असून प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोधमोहीम राबविण्यात येत आहे.

## पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा अंदाज

**(पान १ वरून)** ५० ते ७० किलोमीटरपर्यंत राहू शकतो. त्या दिवशी कमाल तापमान ४१ ते ४३ अंश सेल्सियस आणि किमान तापमान २९ ते ३१ अंश सेल्सियस राहण्याची शक्यता आहे.

दक्षिण-पश्चिम मान्सूनने ईशान्येकडील उर्वरित राज्ये, संपूर्ण सिक्कीम आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगालच्या काही भागांमध्ये प्रगती केली आहे. पुढील ५ ते ७ दिवसांत केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, ईशान्य भारत आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगालमध्ये काही ठिकाणी ७ ते २० सेंटीमीटरपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. पश्चिमी विक्षोभाच्या प्रभावामुळे ११ आणि १२ जून रोजी हलका ते मध्यम पाऊस, ताशी ५० ते ६० किलोमीटर वेगाने वाहणारे वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

पुढील ४ ते ५ दिवसांत दक्षिण-पश्चिम मान्सूनला मध्य अरबी समुद्र, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, नैऋत्य बंगालचा उपसागर, पश्चिम-मध्य व उत्तर-पश्चिम बंगालचा उपसागर, पश्चिम बंगालचे काही भाग, छत्तीसगड, बिहार, झारखंड आणि ओडिशाच्या काही भागांमध्ये पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती राहणार आहे. उत्तर-पश्चिम भारत आणि पूर्व उत्तर प्रदेशमध्ये पुढील ६ दिवसांत काही भागांत मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, काही भागांत वेगवान वारेही वाहू शकतात.

पश्चिम भारतातील कोकण, गोवा, गुजरात प्रदेश, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा येथे १० ते १५ जूनदरम्यान, तर सौराष्ट्र आणि कच्छमध्ये १२ ते १५ जूनदरम्यान पावसाची शक्यता आहे. या भागांमध्ये काही ठिकाणी जोरदार वारेही वाहू शकतात. दक्षिण भारतातील काही भागांत पुढील ६ दिवस मुसळधार पाऊस, तर काही भागांत वादळी वाऱ्यांसह हवामान राहण्याची शक्यता आहे. ओडिशामध्ये १० आणि ११ जूनदरम्यान उष्ण व दमट हवामान कायम राहण्याचा अंदाज आहे.

## शिर्डीत बुरशीयुक्त पेढ्यांची विक्री

(पान १ वरूएन)

साई मंदिर परिसरात असणाऱ्या खाजगी दुकानदारांकडून प्रसाद विकत घेतात. मात्र या दुकानांमध्ये विकल्या जाणाऱ्या पेढा प्रसादावर पॅकेजिंग आणि एक्सपायरी डेट, तसेच हा पेढा नेमका कुठे आणि कोण बनवतो याबाबत उल्लेख नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अनेक वर्षांपासून अक्षरशः दगडासारख्या पेढा प्रसादाची साईभक्तांना विक्री केली जात आहे. पॅकिंग केलेल्या पेढ्यांना बुरशी लागल्याचे देखील आढळून आले आहे. प्रसादाच्या नावाखाली साईभक्तांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून, शिर्डी नगरपालिकेसह अन्न व औषध प्रशासनाचे याकडे साफ दुर्लक्ष झाले होते. निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांमुळे साईभक्तांमध्ये तीव्र नाराजी असून, श्रद्धेच्या नावाखाली भाविकांच्या आरोग्याशी सुरू असलेला हा खेळ थांबणार तरी कधी? असा प्रश्न उपस्थित होत होता.

साई मंदिर परिसरातील पेढा प्रसाद दुकानांवर छापेमारी करण्यात आली असून पेढा प्रसादाचे नमुने गोळा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. हे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले जातील आणि त्यानंतर दोषी आढळल्यास पेढा उत्पादकांवर कठोर कारवाई होणार आहे.

## तुकाराम मुंडेंचा धडाका

(पान १ वरून)

१३ लाख ६२ हजार रुपये असून या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील तपास सुरू आहे. संबंधितांकडे आवश्यक परवाने व कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत असून नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

## भारताकडून प्रथमच १२ अण्वस्त्र तैनात

### संपूर्ण चीन टप्प्यात

**नवी दिल्ली,ता.९–**

**भारताने १२ अण्वस्त्रे तैनात केली आहेत. शांतता काळात इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रथमच अण्वस्त्रे तैनात केली गेली आहेत. स्वीडिश थिंकटँक स्टॉकहॉम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या नव्या अहवालातून हा दावा करण्यात आला आहे.**

चीनने देखील आपल्या अण्वस्त्र तैनातीत वाढ केली आहे. २०२६ मध्ये चीनने ३४ अण्वस्त्रे तैनात केली आहेत. भारताने तैनात केलेल्या अण्वस्त्रांच्या टप्प्यात संपूर्ण चीन आला आहे.स्वीडिश थिंकटँक स्टॉकहॉम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटने नुकताच जारी केली. जगभरातील देश आता राष्ट्रीय शक्तीच्या साधनाच्या रुपात अण्वस्त्रांवर जास्त अवलंबून असल्याचे निरीक्षण स्वीडिश थिंकटँक स्टॉकहॉम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिटच्यूटकडून नोंदवण्यात आले आहे.

## एनडीए,सीडीएससाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

(पान १ वरून)

अंतिम दिवस ९ जून होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून आयोगाच्या वेबसाईटचे सर्व्हर डाऊन असल्यामुळे देशभरातील लाखो विद्यार्थी अर्ज करण्यापासून वंचित राहिले होते. विद्यार्थ्यांचा वाढता संताप आणि मुदतवाढीची मागणी लक्षात घेता आयोगाने अखेर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

## दागिन्यांवर डल्ला मारणारी महिला गजाआड

**सांगली,ता.९(प्रतिनिधी)–**

**बस स्थानकावरील गर्दीचा फायदा घेत प्रवासी महिलांच्या मौल्यवान दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या चोरट्या महिलेला पोलिसांनी गजाआड केले आहे. कविता सतीश काळे (वय ४६, रा.कनाननगर झोपडपट्टी,कोल्हापूर) असे या चोरट्या महिलेचे नाव आहे. तिच्याकडून पोलिसांनी सुमारे ७ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.**

विविध ठिकाणच्या बस स्थानकावर महिलांकडील मौल्यवान दागिने आणि रोकड चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी आणि अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारावकर यांनी संबंधित चोरट्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांनी पोलिसांना सूचना दिल्या होत्या. पोलीस सराईत चोरट्यांची माहिती काढत असतानाच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पोलिस अंमलदार अरुण पाटील आणि सुरज थोरात यांना चोरीच्या उद्देशाने एक महिला आष्टा बस स्थानकाच्या परिसरात घुटमळत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी लक्ष ठेवले. त्या वेळेला एक महिला अगदी घाईघाईने आष्टा बस स्थानकातून बाहेर पडताना दिसली. पोलिसांनी संशयावरून तिचा पाठलाग केला सहाय्यक पोलीस फौजदार सपना गराडे यांच्या पथकाने त्या महिलेला ताब्यात घेतले. त्या महिलेच्या पर्समध्ये चोरीचे दागिने सापडले. अधिक चौकशीत तिने आपले नाव कविता सतीश काळे असल्याचे सांगितले. संबंधित दागिन्यांबाबत चौकशी केली असता तिने दोन महिन्यापूर्वी विटा बस स्थानकावरून मी हे दागिने चोरले असल्याची कबुली दिली. तिच्याकडून पोलिसांनी सुमारे ६ लाख ९० हजार रुपये किमतीचे दागिने आणि काही रोकड हस्तगत केली आहे.

## सव्वादहा लाखाचे हेरॉईन जप्त

(पान १ वरून)

एक अॅव्हेन्यू सुझुकी स्कूटर, १०,८०० रुपये किमतीचे ३ मोबाईल आणि ३०० रुपये रोख, असे एकूण १०,३१,१०० रुपये

किमतीचे सामान जप्त करण्यात आले.नंतर, आरोपींची चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की हेरॉईन महाराष्ट्रातील मुंबई येथील सैन कोलावाडा येथून आणले होते.तिन्ही आरोपींविरुद्ध खाडेबाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

## नेतृत्वावरून इंडिया आघाडीत नवा वाद

### पंतप्रधानपदाचा चेहरा स्पष्ट करा; ठाकरे सेनेची मागणी

**नवी दिल्ली,ता.९–**

**आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांच्या इंडिया आघाडीतील नेतृत्वाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा चर्चा तीव्र झाली आहे. आघाडीत सक्षम समन्वयक नेमावा तसेच पंतप्रधानपदाचा संभाव्य चेहऱ्याबाबत स्पष्टता असावी अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली. त्यामुळे आघाडीतील नेतृत्त्व संरचनेवर चर्चा रंगली आहे.**

इंडिया आघाडीच्या दिल्लीत झालेल्या बैठकीसंदर्भात सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आघाडीत विविध विचारसरणीचे आणि विविध राज्यांतील पक्ष एकत्र असल्याने प्रभावी समन्वयासाठी स्पष्ट नेतृत्व आवश्यक असल्याचे मत बैठकीत मांडण्यात आले. अन्यथा, आघाडीचा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यात अडथळे येऊ शकतात, असे निरीक्षणही नोंदवले गेले. भाजपकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा स्पष्ट चेहरा असताना, विरोधी आघाडीत अद्याप पंतप्रधानपदाचा उमेदवार निश्चित झालेला नाही. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी हा मुद्दा पुन्हा चर्चेत आणल्याचे सांगितले जाते. आघाडीतील प्रमुख नेत्यांमध्ये राहुल गांधी, ममता बॅनर्जी, शरद पवार तसेच विविध प्रादेशिक पक्षांचे नेते यांचा समावेश असल्याने एकमत साधने आव्हानात्मक ठरत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

## शेतकऱ्यांचा विराट मोर्चा

(पान १ वरून)


दिशेने मार्गस्थ झाले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. त्यानंतर संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांना निवेदन सादर केले. या मोर्चात आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, आमदार जयंत पाटील, माजी आमदार सत्यजित पाटील, माजी आमदार ऋतुराज पाटील, गिरीश फोंडे, विजय देवणे, संपतराव पवार-पाटील, संजय पवार, ए.वाय.पाटील, कॉम्रेड उदय नारकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी खासदार राजू शेट्टी यांनी शक्तीपीठ महामार्गावर सडकून टीका केली. ते म्हणाले, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असू शकतो; मात्र शेतकऱ्यांची थडगी बांधून विकासाचे मनोरे उभारायचे आहेत का? आतापर्यंत देवदर्शनासाठी जाण्यास कोणालाही अडचण आलेली नाही. मग शक्तीपीठ महामार्गाची गरज नेमकी कोणासाठी आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आमचा विकासाला विरोध नाही. नागपूर-रत्नागिरी महामार्गालाही आम्ही विरोध केलेला नाही. मात्र गरज नसलेला आणि हजारो शेतकऱ्यांचे नुकसान करणारा शक्तीपीठ महामार्ग आम्हाला मान्य नाही,'' असे सांगत त्यांनी सरकारवर टीका केली.

आमदार सतेज पाटील म्हणाले, अकरा नद्या ओलांडून जाणारा हा महामार्ग नदीकाठच्या हजारो कुटुंबांचे जीवन विस्कळीत करणार आहे. अनेक मंदिरे, धार्मिक स्थळे आणि ग्रामीण भागातील नैसर्गिक व्यवस्था यामुळे धोक्यात येणार आहेत. मग सत्ताधाऱ्यांचे हिंदुत्व नेमके कुठे गेले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

आमदार जयंत पाटील यांनी सरकारच्या धोरणांवर टीका करताना सांगितले की, आज न मागितलेल्या रस्त्याच्या विरोधात जनता एकवटली आहे. पूर्वी गावोगावी रस्ते व्हावेत म्हणून सरकारकडे मागण्या कराव्या लागत होत्या. आज मात्र रस्ता नको म्हणून आंदोलन करण्याची वेळ आली आहे. ही परिस्थिती दुर्दैवी आहे.

माजी आमदार सत्यजित पाटील, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संपर्कप्रमुख विजय देवणे यांची भाषणे झाली. दरम्यान, महामार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत प्रसंगी रक्त सांडावे लागले तरी शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी भूमिका मांडली. या प्रकल्पाविरोधातील संघर्ष आता अधिक व्यापक स्वरूप धारण करणार असल्याचे संकेतही मोर्चाच्या माध्यमातून देण्यात आले.




स्व. श्री. राजाराम विश्वनाथ हावळे - भदरगडे

॥ ऋणनिर्देश ॥

आमचे वडील आदरणीय
**श्री. राजाराम (बापू) विश्वनाथ हावळे-भदरगडे**
यांचे बुधवार, दि. २७/०५/२०२६ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या निधनाने आम्हां कुटुंबियावर कोसळलेल्या दु:खद प्रसंगी आमचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र परिवार, स्नेही, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच ज्ञात-अज्ञात हितचिंतक यांनी प्रत्यक्ष भेटून, फोनद्वारे आमचे सात्वंन करून आमचा दु:खभार हलका केला व आम्हांस धीर दिला याबद्दल आम्ही सर्वांचे अंत:करणपूर्वक शतश: ऋणी आहोत...!

**गणेश दत्तात्रय भदरगडे**
**विवेक राजाराम हावळे**
**शिवलिंग महादेव कापसे**
**रोहीत गणेश भदरगडे**
**शिव विवेक हावळे**

**समस्त भदरगडे, हावळे, कापसे, लंबे, चौगुले परिवार, इचलकरंजी**

# इचलकरंजीत बेशिस्त वाहतुकीमुळे वाढली डोकेदुखी

## नव्या वाहतूक कृती आराखड्याची केव्हा होणार अंमलबजावणी

इचलकरजी,ता.९–

**शहराची वाढती लोकसंख्या, वाहनांची प्रचंड वाढ,अरूंद रस्ते, बेशिस्त पार्किंग आणि मुख्य चौकांमध्ये निर्माण होणारी वाहतूक कोंडी यामुळे इचलकरंजीची वाहतूक व्यवस्था दिवलेला वाहतूक कृती आराखडा केव्हा जाहीर होणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.**

इचलकरंजीला महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर नव्याने वाहतूक आराखडा केला जातो. मात्र, महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय राजवटमध्ये वाहतूक आराखड्याबाबत फारसे गांभिर्याने पाहिले गेले नाही. तत्कालीन पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे यांनी २०११ मध्ये वाहतूक कृती आराखड्यामध्ये काही प्रमुख रस्त्यांवर वन-वे व्यवस्था, पार्किंग निर्बंध आणि वाहतूक नियंत्रणांच्या उपाययोजना प्रायोगिक तत्वावर राबवण्यात आल्या होत्या. सुरूवातीच्या काळात या आराखड्यामुळे काही प्रमाणात वाहतूक सुरळीत झाल्याचे दिसून येत होते. मात्र, या आरखड्याची कायमस्वरूपी अंमलबजावणी होऊ शकली नाही.

आता महानगरपालिकेमध्ये नव्याने सत्ता स्थापन झाल्यानंतर वाहतूक व्यवस्थेबाबत ठोस पावले उचलण्यास सुरूवात झाली आहे. महापौर उदय धातुंडे यांच्या अध्यक्षतेखाली महानगपालिका आणि पोलीस प्रशासनाची प्राथमिक बैठक पार पडली आहे. त्यामध्ये नवीन वाहतूक कृती आराखड्यावर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये २०२१ मधील वाहतूक आराखड्याचा अभ्यास करणेत आला आहे. सदरचा आराखडा जाहीर झाल्यानंतर त्याची प्रायोगीक तत्वावर अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यानंतर नागरिकांच्या सुचना,हरकती आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे या आराखड्यास आवश्यक बदल करून कायमस्वरूपी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

वाहतूक शिस्तीच्या दृष्टीने नविन उपाय योजना प्रमुख चौकामध्ये बदल,वन वे मार्ग नो पार्किंग शाळा आणि व्यापारी भागामध्ये वाहतूक नियंत्रण यावर प्रशासनाकडून विचार सुरू आहे.

नव्या वाहतूक आराखड्याची आखणी करत असून हे काम गतिमान करण्यात आले आहे. तेव्हा तातडीने नव्याने वाहतूक आराखडा जाहीर करून प्रायोगिक तत्वावर लागू करावा अशी मागणी होत आहे.



**नव्याने करण्यात येत असलेल्या आराखड्यामध्ये काही नवीन चौकात नव्याने सिग्नल बसवणे, रस्ता रूंदीकरण, गर्दीच्या ठिकाणी वाहनतळ, पार्कींग झोन, सायलेन्स झोन, सम-विषम पार्कींग, आठवडी बाजाराचे नियोजन त्याचबरोबर शहराबाहेर स्वतंत्र ट्रक टर्मिनल आणि ट्रान्सपोर्टनगर उभारणे आदिचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे असे जाणकारातून बोलले जात आहे.**

## इचलकरंजीचे दोन पाकीटमार जेरबंद

आष्टा,ता.९ (प्रतिनिधी)–

**आष्टा बस स्थानकामध्ये बस मध्ये चढत असताना खिसा मारलेल्या दोघा जणांना अष्टा पोलिसांनी अटक केली त्यांच्याकडून रोख १३ हजार रुपये व मुद्देमाल व मोटरसायकल जप्त केली आहे. दिनकर श्रीपती सुतके (वय ५३), सिमा सचिन भोसले (वय ४० दोन्ही रा. तिनबत्ती, चार रस्ता, बागडी गल्ली इचलकरंजी) अशी त्यांची नावे आहेत.**

याप्रकरणी मनोज बाबासो घस्ते रा. आष्टा यांनी अष्ट पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली होती. आष्टा पोलिसांनी २४ तासाच्या आत दोघाजणांना अटक केली.

सोमवारी सकाळी मनोज घस्ते हे आपल्या पत्नीला घेऊन सांगलीला निघाले होते. आष्टा बस स्थानकामध्ये ते सांगलीला जाणाऱ्या बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील रक्कम लांपास केली याप्रकरणी त्यांनी आष्टा पोलीस ठाण्यामध्ये सुमारे १३ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याची फिर्याद दाखल केली होती त्यानुसार आष्टा पोलिसांच्या पथकाने कारवाई केली.

## पाणी न दिल्याने मायलेकावर चाकूने हल्ला

सांगली,ता.९ (प्रतिनिधी)–

**वाहन धुण्यास पाणी न दिल्याचा राग मनात धरुन तिघांनी शिवीगाळ करुन मायलेकावर चाकूने हल्ला केल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी स्वप्नील गौतम बनसोडे (वय ३५, रा. हनुमाननगर गल्ली, विश्रामबाग ) यांनी विश्रामाबाग पोलीसात फिर्याद दिली आहे. हा प्रकार सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडला.**

फिर्यादी स्वप्नील हे सोमवारी दुपारच्या सुमारास त्यांच्या घरासमोरील कट्टा फोडत होते. त्यावेळी त्यांची आई संगीता या घरासमोर वाळत घातलेले कपडे काढत होती. त्या दरम्यान संशयित सोहेल तांबोळी उर्फ टोल्या आणि त्याचे दोघे साथीदार तेथे आले. त्यांनी संगीता यांच्याशी, वाहन धुण्यासाठी पाणी मागितले असता ते का दिले नाही या कारणावरुन वाद घालण्यास सुरवात केली.

फिर्यादी स्वप्नील याने संशयितांना, तुम्ही गेटच्या आतमध्ये का आला ? असा जाब त्यांना विचारला. याचा राग आल्याने संशयितांनी माय - लेकांना शिवीगाळ करुन दोघांवर चाकूने हल्ला केला. यामध्ये दोघेही जखमी झाले. यानंतर संशयित तिघेही घटनास्थळावरुन पसार झाले. पोलिसांनी तिघाही संशयितांवर गुन्हा दाखल केला आहे.



## पेठवडगाव मुख्याधिकाऱ्यांच्या निषेधार्थ भटका समाजमुक्ती संघटनेची निदर्शने

पेठ वडगाव,ता.९(प्रतिनिधी)–

**येथील १८ पगड जातीच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कष्टकरी व कामगार कुटुंबांसाठी मंजूर झालेल्या ४१० परवडणाऱ्या घरांच्या गृहप्रकल्पाची माहिती वडगाव नगरपालिका मुख्याधिकारी सुमीत जाधव यांनी जाणीवपूर्वक लपवून ठेवली.**

गेल्या तीन महिन्यांपासून पुढील कार्यवाही हेतुपुरस्सर रखडविल्याचा गंभीर आरोप करीत भटका समाजमुक्ती आंदोलनाच्या वतीने मंगळवारी (दि. ९) नगरपालिका चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भीमराव साठे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय दलित महासंघाचे अध्यक्ष रमेश चांदणे, बाबासाहेब दबडे, विश्वास सुवासे, पाकीजा मस्तान, विकास कांबळे, संदीप जाधव, बेबीताई गोसावी, रेणुका माळवे, शाहीन मुजावर, वंदना पवार, शशिकला गजरे, बजरंग सावंत, स्वाती देसाई, दिपाली घोरपडे यांचेसह गृह प्रकल्पातील शेकडो सदस्य उपस्थित होते.

## हळदीत गुटख्याचा साठा जप्त

### ४७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

कोल्हापूर, ता.९(प्रतिनिधी)–

**हळदी (ता. करवीर) येथील मुख्य चौक परिसरात सुरू असलेल्या गुटखा विक्रीच्या अड्ड्यावर करवीर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने छापा टाकत ४७ हजार ८०० रुपयांचा गुटखा, सुगंधी तंबाखू आणि पानमसाला जप्त केला. या प्रकरणी खंडेराव मनोहर नाईक (वय ४५, रा. हळदी, ता. करवीर) याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध करवीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

करवीर तालुक्यातील हळदी गावातील मुख्य चौकाजवळील एका पानटपरीच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडमध्ये गुटख्याच्या लहान-लहान पुड्यांची विक्री होत असल्याची माहिती करवीर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकली. यावेळी खंडेराव नाईक याच्या ताब्यातील दोन प्लास्टिकच्या पोत्यांमध्ये महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेला गुटखा, सुगंधी तंबाखू व पानमसाल्याचा साठा आढळून आला. पोलिसांनी ४७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी करवीर पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा व मानके कायद्यासह संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता ११ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## हातकणंगले पाणीपुरवठा सक्षमीकरणासाठी ६१ कोटींची मंजुरी

### राज्याकडून १९ कोटीचा निधी : खास. धैर्यशील माने यांचा पाठपुरावा

हातकणंगले,ता.९(प्रतिनिधी)–

**हातकणंगले नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा सक्षमीकरण व बळकटीकरणासाठी एकूण ६१ कोटींच्या निधीला मंजुरी मिळाली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हातकणंगलेकरांना दिलेला शब्द पाळत पाणीप्रश्न सोडविण्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.**

यामध्ये १९ कोटी निधी कार्यान्वित करण्यात आला असून उर्वरित ४२ कोटींचा निधी केंद्र शासनाच्या अमृत २.० योजनेत समाविष्ट करून उपलब्ध करून देण्यात आला आहे. या संदर्भातील शासन निर्णय आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार धैर्यशील माने, आमदार अशोकराव माने, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्या उपस्थितीत हातकणंगले नगरपंचायतीचे नगराध्यक्ष अजितसिंह (काका) पाटील यांच्याकडे सुपूर्द केला.

या योजनेमुळे हातकणंगले शहराच्या पाणीपुरवठा प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या कामासाठी खासदार धैर्यशील माने, नगराध्यक्ष अजितसिंह (काका) पाटील तसेच नगरपंचायत प्रशासन यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून हातकणंगलेच्या विकासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे.



**हातकणंगले पाणी योजनेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगराध्यक्ष अजितसिंह पाटील यांना १९ कोटी निधी मंजूरीचे पत्र दिले याप्रसंगी धैर्यशिल माने, आम. अशोकराव माने, सुजित मिणचेकर.**

## बार व बेंच यांचे समन्वयातून न्यायालयीन कामांचा जलद निपटारा

### न्यायाधिश एल. डी. बिले

इचलकरंजी,ता.९–

**दि इचलकरंजी बार असोसिएशनच्या वतीने नविन रुजू झालेल्या जिल्हा न्यायाधिश क्र. १ एल. डी. बिले व जिल्हा न्यायाधिश क्र. २ यु.सी. देशमुख यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. न्यायाधिश एल. डी. बिले यांचे स्वागत सिनिअर अॅड. एस.बी. खंजिरे यांनी केले.**

न्यायाधिश देशमुख यांचे स्वागत सिनिअर अॅड. बी.ए. देसाई यांनी केले. यावेळी न्यायाधिश बिले यांनी बार व बेंच यांचे समन्वयातून न्यायालयीन कामकाजांचा जलद निपटारा होणे शक्य असलेबाबत नमूद केले. यावेळी न्यायाधिश देशमुख यांनी न्यायालयीन कामकाजांचा जलद निपटारा होणेसाठी वकिलांचे सहकार्य आवश्यक असलेचे मत व्यक्त केले. यावेळी बोलताना न्यायाधिश जे. एम. नदाफ यांनी आपले न्यायालयीन कामकाजाचे अनुभवातून इचलकरंजी बारचे सर्व वकिल न्यायालयीन कामकाजामध्ये सतत अग्रेसर असलेचे नमूद केले. यावेळी न्यायाधिश पी.एन. रोकडे, न्यायाधिश आर.डी. खराटे , न्यायाधिश डी. बी. साठे, न्यायाधिश ए.एम. गायकवाड , न्यायाधिश ए. आर. कुलकर्णी, न्यायाधिश एम.एस. गावडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दि इचलकरंजी बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. राजगोपाल रामानंद तोष्णीवाल यांनी केले. सिनिअर अॅड. इरफान जमादार यांनी इचलकरंजी बार असोसिएशनबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेक्रेटरी अॅड. अभिजीत माने यांनी केले. आभार उपाध्यक्ष अॅड. राजाराम सुतार यांना मानले.

सदर कार्यक्रमाचे नियोजनास दि इचलकरंजी बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. राजगोपाल तोष्णीवाल, राजाराम सुतार, अभिजीत माने, अदित्य मुदगल, विजय शिंगारे, दिपाली हणबर, महेश कांबळे, राहुल काटकर, शैलेंद्र रजपूत, किर्ती जैद, अर्चना कुलकर्णी, डी.एम. लटके, कोल्हापूर जिल्हा नोटरी संघाचे अध्यक्ष अॅड. अमित सिंग, शहानवाज राज पटेल, यु.व्ही. जाधव, एस.बी. सावेकर व क्लार्क प्रविण फगरे व दि इचलकरंजी बार असोसिएशनचे सर्व सदस्य यांनी सहकार्य केले.



**जिल्हा न्यायाधीश एल. डी. बिले व यु. सी. देशमुख यांचा सत्कार करताना अॅड. एस. बी. खंजीरे व मान्यवर**

## चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

सांगली, ता.९(प्रतिनिधी)–

**भरधाव वेगाने जाणाऱ्या चारचाकीने पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीवरील युवराज धोंडीराम पाटील (वय ४२, रा. हनुमान चौक, सांगलीवाडी) हे गंभीर जखमी झाले.**

हा अपघात सांगली कोल्हापूर रस्त्यावरील अंकली गावच्या हद्दीत झाला आहे . याप्रकरणी चारचाकी चालक शैलेश श्रीपाल आवळे (रा. विजयनगर, सांगली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी युवराज पाटील हे सिक्युरिटी एजन्सीचे काम करतात. ते किरण माधव कुलकर्णी यांच्या दुचाकीवरुन सांगलीकडून नृसिंहवाडीकडे जात होते. अंकली गावाच्या हद्दीतील एका चारचाकी शोरुमच्या समोर आल्यावर त्यांना पाठीमागून चारचाकीने (क्र. एमएच ०१ एएच ८८६२) धडक दिली. यामध्ये फिर्यादी युवराज पाटील आणि गार्ड किरण कुलकर्णी दोघे जखमी झाल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.


Balasaheb Mane Education Trust's

**Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi**

Tal. Hatkanangale, Dist.- Kolhapur
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

**Walk-In-Interview**

(Local Appointment for the academic year 2026-27)

Eligible candidates for the post of Assistant Professor and Non-Teaching Vacancies in following subjects are invited to attend the interview along with the application and all original certificates with attested two photo copies each on Wednesday, 18/06/2026 at 10.00 a.m.

| Sr. No. | Subject | Aided / Non Aided | Number and Nature of the post |
|---|---|---|---|
| A | Assistant Professor in Science (For B.Sc.) Under Graduate | | |
| 1 | Physics | Non-Aided | 1 Full Time |
| 2 | Chemistry | Non-Aided | 2 Full Time |
| 3 | Botany | Non-Aided | 2 Full Time |
| 4 | Zoology | Non-Aided | 1 Full Time |
| 5 | Drug Chemistry | Non-Aided | 1 Full Time |
| 6 | Food Science | Non-Aided | 2 Full Time |
| 7 | Mathematics | Non-Aided | 2 Full Time |
| 8 | Computer Science | Non-Aided | 2 Full Time |
| 9 | Micro Biology | Non-Aided | 1 Full Time |
| 10 | Statistics | Non-Aided | 1 Full Time |
| 11 | English | Non-Aided | 1 C.H.B. |
| B | Assistant Professor in Commerce (For M.Com.I & II) Post Graduate | | |
| 1 | Accountancy | Non-Aided | 2 Full Time |
| C | Assistant Professor in Arts (For M.A.I & II) Post Graduate | | |
| 1 | Economics | Non-Aided | 2 Full Time |
| D | Assistant Professor | | |
| 1 | Librarian | Non-Aided | 1 Full Time |
| 2 | Physical Director | Non-Aided | 1 Full Time |
| E | Non-Teaching Post in Non-Aided Department | | |
| 1 | Laboratory Assistants | Non-Aided | 2 Post |
| 2 | Peon | Non-Aided | 1 Post |

Educational qualifications, remuneration and service conditions will be as per the rules of Govt. of Maharashtra and Shivaji University, Kolhapur. The candidates should attend the interview at their own cost at Balasaheb Mane Education Trust's office, Rukadi Tal. Hatkanangale, Dist.- Kolhapur.

**Shri. Dhairyashil S. Mane (MP)** Secretary | **Dr. Nivedita S. Mane (Ex.MP)** President

**Prof. Dr. P. B. Kamble,** Principal


## महिला चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट घरात

मिरज,ता.९ (प्रतिनिधी)–

**मिरजेतील मंगळवार पेठ परिसरात मंगळवारच्या आठवडा बाजारात चारचाकी इलेक्ट्रिक कार वरील महिला चालकाचे नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगाने कार रस्त्याकडेला असलेल्या घरामध्ये घुसल्याची घटना घडली. मंगळवारी सकाळी सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात एक दुचाकीस्वार जखमी झाला आहे.**

दोन दुचाकी व घराचे मोठे नुकसान झाले आहे. घराच्या बाहेरील खोलीत कोणीही नसल्याने आणि आठवडा बाजारातील गर्दीमध्ये कार न गेल्याने मोठी हानी टळली. मात्र यामुळे रस्त्यावर भरणारे आठवडा बाजार, त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक समस्या व धोका असे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

मिरजेतील मंगळवार पेठ परिसरात बॉम्बे बेकरी समोर हा अपघात झाला आहे. याच ठिकाणी मंगळवारचा आठवडा बाजार भरतो. अपघाताच्या वेळीही या ठिकाणी बाजारातील विक्रेते व ग्राहक नागरिकांची वर्दळ सुरू झाली होती. महात्मा गांधी चौकाकडून आलेल्या टाटा पंच कंपनीच्या (एमएच १० इइ २३७७) इलेक्ट्रिक कार वरील महिला चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्याने भरधाव झालेल्या कारने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या एका इलेक्ट्रिक मोपेड दुचाकीला व एका मोटरसायकलीला धडक दिली.

मोटरसायकल फरफटत चार चाकी वाहनासह घरामध्ये घुसली होती. या अपघातात दुचाकी वरील एकजण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

### घराचे नुकसान; दुचाकीस्वार जखमी



## दोन सराईतांकडून कोयते जप्त

सांगली, ता. ९(प्रतिनिधी)–

**हद्दपारीची कारवाई झाली असतानाही गुन्हा करण्याच्या तयारीने कोयते बाळगणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. इजाज उर्फ एजाज अल्फाज शेख(वय २९) आणि मलिकजान उर्फ सोहेल राजू नदाफ (वय २६) अशी त्या दोघांची नावे आहेत.**

दोन हद्दपार गुन्हेगार गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने गजानन डेअरीकडे जाणाऱ्या चुनाभट्टी रोड परिसरात फिरत आहेत,अशी माहिती मिळाली. त्या ठिकाणी जाऊन पोलिसांच्या दोघांना ताब्यात घेतले.

## शेतकरी आक्रमक, नुकसान भरपाईची तारीख पे तारीख

कोपार्डे ता.९ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर गगनबावडा राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण सुरू आहे. बालिंगा –दोनवडे दरम्यान भोगावती नदीवरील पूल व रस्ता रुंदीकरणासाठी पाच शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत. या शेतकऱ्यांना गेली तीन वर्ष शासनाकडून तारीख व तारीख दिली जाते. आज संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी रस्ता रुंदीकरणाचे काम बंद पाडले, व शासनाचे विरोधात घोषणा दिल्या.**

यावेळी बोलताना शेतकरी बाबासो मोहिते म्हणाले की, प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात आहेत. पर्यायी रस्त्याचा प्रश्न सुटलेला नाही आणि पाऊस सुरू झाल्याने शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकरी पांडुरंग नलवडे यांनी, जमीन गेल्याने आम्ही भूमिहीन आणि अल्पभूधारक झालो असून, भरपाईअभावी उपासमारीची वेळ आल्याची खंत व्यक्त केली. आमच्या अंगावर मशीन घाला असे म्हणत शेतकऱ्यांनी उपस्थित खात्यातील इन्चार्ज मदन पाटील, संदीप यादव, नितीन पाटील यांना अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

यावेळी शेतकरी बाबासो मोहिते, विश्वास मोहिते, बळवंत मोहिते ,सर्जेराव नलावडे, शिवाजी ढेरे ,बाळासाहेब पाटील, रंजीत मोहिते, कुंडलिक मोहिते, उदय पाटील, सुभाष पाटील, लहू पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.


Shri.Shamrao Patil (Yadravkar) Educational & Charitable Trust's

**SHARAD COLLEGE OF NURSING**

YADRAV (ICHALKARANJI)
(Approved by Government of Maharashtra, Affiliated to MSBNPE, Mumbai)

**RECRUITMENT**

| Department/ Subject | Post | Qualification |
|---|---|---|
| Medical Surgical Nursing, Child Health Nursing, Mental Health Nursing, Community Health Nursing and Obstetrics Nursing. | Lecturer | MSC Nursing |
| Nursing | Tutor | B.BSC Nursing or P.B.BSC Nursing (Min 01 Year of Teaching/Clinical Exp.) |

**Note :** Please forward your Resume with all details to career@sitcoe.org.in within 15 days after publishing this advertisement.

Date : 10.06.2026

**Shri Anil Bagane** Executive Director | **Hon. Rajendra Patil (Yadravkar)** Chairman

▪ संपादकीय ▪


# आता खरी परीक्षा

कॉक्रोच जनता पार्टीचे बहुचर्चित आंदोलन आणि निदर्शने जंतरमंतरवर झाली आणि त्याला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला. वास्तविक हा मोदी सरकारच्या विरोधातील आक्रोश होता. त्यामुळे सरकारच्या विरोधात आजवर जे जे ॲक्टिव्हिस्ट किंवा विचारवंत किंवा यूट्युबर आतापर्यंत कार्यरत होते त्यांच्याकडून या आंदोलनाला जोरदार समर्थन दिले जाणे अपेक्षित होते.पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच दिसली आहे.यापैकी अनेकांनी चक्क अभिजीत दिपके यांच्या आंदोलनावर थेट टीका केली आहे.त्यांना या आंदोलनात वेगळा वास येत आहे. दिल्लीत सन २०१४ पूर्वी झालेल्या अण्णा हजारे आंदोलनाचा हा दुसरा टप्पा असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. कारण, अण्णा आंदोलनाला संघ परिवाराचा पाठिंबा होता तसाच हा काहीसा प्रकार त्यापैकी अनेकांना वाटतो आहे. संघ परिवार, सरकार किंवा भाजप पक्ष यांच्याशी हातमिळवणी करूनच अभिजीत दिपके यांच्या या आंदोलनाचे नाटक सुरू केले गेले असावे, असे त्यांच्यापैकी अनेकांनी थेट स्वरूपात नमूद केले आहे. अण्णा हजारे यांनी काँग्रेस सरकारच्या विरोधात आंदोलन करून मोदी आणि भाजपाला संपूर्ण देशभर अनुकूल वातावरण निर्माण केले.त्याचा लाभ घेत मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आले.या सत्तेच्या गेल्या बारा वर्षांच्या काळात अण्णा हजारे यांनी एकदाही मोदी सरकारच्या गैरकृत्याच्या एकाही प्रकरणात आवाज उठवलेला नाही.ज्या लोकपालसाठी अण्णा हजारे यांनी आकाशपाताळ एक केले होते,त्यात लोकांना तथ्य वाटले होते आणि लोकांनी काँग्रेसला हटवून मोदींना सत्तेवर आणले. पण या लोकपाल यंत्रणेचे पुढे काय झाले यावर अण्णा हजारे किंवा त्यांचे त्यावेळी समर्थन करणाऱ्यांनी विचारणा केल्याचे ऐकिवात आले नाही. आज लोकपालाची यंत्रणा अस्तित्वात आहे की नाही याचीच शंका निर्माण व्हावी अशी परिस्थिती आहे. महागाई, भ्रष्टाचार, शेतकरी विरोधी धोरणे, बँकांना बुडवून विदेशात पळून गेलेले सरकारधार्जिणे उद्योगपती,असे असंख्य विषय मधल्या काळात गाजले.पण हजारे किंवा त्यांच्या समर्थकांपैकी एकही त्याच्या विरोधात आंदोलन जाऊ द्या पण स्पष्टपणे बोलतानाही आढळला नाही.आज बारा वर्षांनंतर मोदी सरकारच्या विरोधात अशीच तीव्र नाराजीची लाट पसरलेली असताना आपल्या विरोधातील वातावरणसुद्धा आपल्याच हातात राहावे या हेतूने सत्ताधाऱ्यांकडूनच अभिजीत दिपके यांना हाताशी धरून हा आंदोलनाचा प्रयोग केला जात आहे काय,असा थेट प्रश्न अनेक विचारवंतांनी विचारला आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. मुळात नीट पेपरफुटीच्या प्रकरणात काँग्रेसच्या एनएसयूआय या विद्यार्थी संघटनेने देशभरात अनेक ठिकाणी मोर्चे आणि आंदोलने केली. त्यापैकी कुठल्याही आंदोलनाला सरकारने अनुमती दिली नाही. तरीही ज्यांनी आंदोलन केले त्यांच्यावर लाठीमार, अश्रुधूर, पाण्याचे फवारे असे प्रयोग केले गेले आणि अनेकांवर खटले दाखल करून त्यांना गजाआड केले गेले. पण त्या उलट अभिजीत दिपके यांना मात्र थेट जंतर मंतरवर विनासायास आंदोलन करायला अनुमती दिली गेली. आंदोलनाची परवानगी अभिजीत दिपके हे दिल्ली विमानतळावर उतरताच चक्क पोलिसांनी त्यांना तेथे नेऊन दिली. एवढेच नव्हे तर विमानतळापासून आंदोलन स्थळापर्यंत पोलीसच त्यांना तेथे घेऊन गेले. हा सगळा केंद्रातील सत्ताधारी आणि दिपके यांच्यातील अंतर्गत संगनमताचा भाग आहे, असे अनेकांचे म्हणणे पडले. यात तथ्य किती हे अजून नेमकेपणाने स्पष्ट होणे बाकी आहे,पण दिपके यांच्या आंदोलनाच्या बाबतीत जे जे आक्षेप घेतले गेले आहेत त्यात वरकरणी तरी तथ्य दिसत आहे. आंदोलन कार्यक्रमात सोनम वांगचुक सहभागी झाले होते. त्यांनी तेथे भाषण करताना आंदोलनाला अनुमती दिल्याबद्दल मोदी सरकारचे आभार मानण्याचाही प्रकार घडला आहे.त्यामुळे ही शंका अधिक बळकट झाली आहे. मोदी सरकारच्या विरोधात काँग्रेस प्रचंड आक्रमक झाली असताना आणि त्यांच्या संघटनेकडून ठिकठिकाणी जोरदार निदर्शने सुरू असताना हा निदर्शनाचा वणवा भलतीकडेच फिरवण्याचा हा उद्योग आहे, असाही एक आक्षेप आहे. आता खरे पाहता हे आंदोलन मोदी सरकारच्या विरोधात असताना समस्त विरोधी पक्षांकडून त्या आंदोलनाला एकतर्फी पाठिंबा मिळणे अपेक्षित होते, पण काँग्रेससह बहुतेक विरोधी पक्षनेत्यांनी त्याविषयी सावधगिरीच बाळगलेली दिसली. केवळ आम आदमी पक्ष आणि काही प्रमाणात ठाकरेंची शिवसेना यांच्याकडून या आंदोलनाचे समर्थन झाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर अभिजीत दिपके मात्र जराही विचलित न होता धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर ठाम आहेत.येत्या शनिवारपर्यंत धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला नाही तर देशव्यापी आंदोलनाची हाक त्यांनी दिली आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाविषयी कितीही शंका व्यक्त केली गेली किंवा थेट आक्षेप घेतले गेले असले तरी दिपके यांची पुढची पावले लक्षात घेऊनच त्यांच्या या आंदोलनावर प्रतिक्रिया व्यक्त करणे सावधगिरीचे ठरणार आहे.

# बदललेल्या भूमिकेची मिमांसा

**अफगाणिस्तानमधील बदललेल्या राजकीय परिस्थितीचा स्वीकार करून संयुक्त राष्ट्रांनी लादलेल्या विद्यमान निर्बंधांमध्ये शिथिलता आणण्याची गरज असल्याचे प्रतिपादन भारताने केले आहे.संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी राजदूत हरीश पर्वतनेनी यांनी सुरक्षा परिषदेच्या बैठकीत ही भूमिका मांडली. केवळ दंडात्मक कारवाई किंवा निर्बंध लादून पुढे जाण्याच्या धोरणाला आता अत्यंत मर्यादित यश मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय समुदायाने आता अशा धोरणांचा अवलंब केला पाहिजे,जे अफगाण जनतेच्या हिताचे ठरतील आणि तिथल्या सकारात्मक पावलांना प्रोत्साहन देतील.**

ऑगस्ट २०२१ मध्ये काबूलवर तालिबानने नियंत्रण मिळवल्यानंतर जागतिक समुदाय अजूनही अफगाणिस्तानबाबत निश्चित आणि एकमुखी धोरण ठरवू शकलेला नाही. अशा पार्श्वभूमीवर भारताचे हे विधान अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कूटनीतिक बदलाचे संकेत देणारे मानले जात आहे. भारताची ही बदललेली भूमिका केवळ मानवी गरजा किंवा चिंतेपुरती मर्यादित नसून,त्यामागे अत्यंत खोलवर राजकीय, सामरिक आणि धोरणात्मक हितसंबंध दडलेले आहेत. अफगाणिस्तान हा मध्य आशिया आणि दक्षिण आशिया या दोन्ही क्षेत्रांना जोडणारा एक अत्यंत महत्त्वाचा भौगोलिक दुवा आहे.भारताने गेल्या अनेक दशकांपासून तिथे विविध विकास प्रकल्प,पायाभूत सुविधांची निर्मिती आणि मानवी सहाय्याच्या माध्यमातून आपले स्थान निर्माण केले आहे. जर अफगाणिस्तान पूर्णपणे अस्थिर राहिला किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडला,तर त्याचा थेट फायदा दहशतवादी संघटना आणि भारतविरोधी घटकांना मिळू शकतो,अशी भीती भारताला आहे.अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर कोणत्याही भारतविरोधी किंवा इतर दहशतवादी कारवायांसाठी केला जाऊ नये, ही भारताची मुख्य अट आहे.याच कारणामुळे भारताने तालिबानच्या नेतृत्वाशी व्यावहारिक आणि राजनैतिक संवादाचा मार्ग निवडला आहे.भारताने तालिबान सरकारला अद्याप अधिकृत मान्यता दिली नसली,तरी काबूलमधील आपले दूतावास पुन्हा सुरू केले आहे आणि अफगाण मंत्रालयांच्या प्रतिनिधींचे नवी दिल्लीत स्वागतही केले आहे. या धोरणाचा दुसरा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्रादेशिक राजकारणात पाकिस्तानचा प्रभाव संतुलित करणे हा आहे.पाकिस्तानने नेहमीच अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर करून तिथे आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा




प्रयत्न केला आहे. अशा परिस्थितीत भारताचा तिथे असलेला सक्रिय सहभाग प्रादेशिक शक्ती संतुलन राखण्यासाठी आवश्यक ठरतो. अफगाण प्रशासनाने भारताला स्पष्ट आश्वासन दिले आहे की, त्यांच्या भूमीचा वापर भारताच्या विरोधात कोणत्याही हल्ल्यासाठी किंवा घातपातासाठी होऊ दिला जाणार नाही.सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने हे आश्वासन भारतासाठी अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाचे आहे. भारताने अफगाणिस्तानमधील आपले मानवी आणि विकास सहकार्य कधीही थांबवलेले नाही.राजदूत हरीश पर्वतनेनी यांनी स्पष्ट केले की, भारताचे मदत प्रकल्प अफगाणिस्तानच्या सर्वच्या सर्व ३४ राज्यांमध्ये सुरू असून, ५०० हून अधिक विकास प्रकल्पांच्या माध्यमातून भारत तिथल्या सामान्य जनतेपर्यंत पोहोचत आहे.भारत मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य,औषधे,आपत्ती निवारण साहित्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा अफगाणिस्तानला करत आहे. याशिवाय रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे, भूकंपग्रस्त भागातील घरांची पुनर्निर्मिती करणे आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांची दुरुस्ती करण्याचे आश्वासनही भारताने पाळले आहे. शिक्षण आणि मानवी क्षमता विकासाच्या क्षेत्रातही भारत आघाडीवर

दैनंदिनी

असून, भारतीय शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून अनेक अफगाण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी दिली जात आहे. दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि क्रिकेट क्षेत्रातील संबंध देखील या जनसंपर्काचे प्रमुख माध्यम बनले आहेत. व्यापार आणि दळणवळणाच्या क्षेत्रातही भारत आणि अफगाणिस्तान आपले सहकार्य वाढवण्यावर भर देत आहेत. अफगाणिस्तानमधील खाण क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या शक्यता भारत सध्या पडताळून पाहत आहे.तसेच भारत आणि अफगाणिस्तान दरम्यान हवाई मालवाहू वाहतूक अधिक सुलभ करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. प्रादेशिक दळणवळणासाठी भारत इराणमधील चाबहार बंदराचा वापर करत आहे,ज्यामुळे पाकिस्तानला पूर्णपणे वगळून भारताला थेट अफगाणिस्तानपर्यंत व्यापारी मार्ग उपलब्ध झाला आहे.याच दरम्यान, भारताने अफगाणिस्तानवर पाकिस्तान-कडून करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यांचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध केला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत बोलताना भारताने या हल्ल्यांना अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वावर झालेला थेट हल्ला असे म्हटले आहे. या हल्ल्यामध्ये निष्पाप नागरिकांचा झालेला मृत्यू आणि लक्ष्य करून केल्या गेलेल्या हत्यांबद्दल भारताने तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

एकंदरीत पाहता, भारताचे सध्याचे अफगाणिस्तान विषयक धोरण हे व्यावहारिक कूटनीती, मानवी सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षेची काळजी यांचे एक संतुलित मिश्रण आहे. नवी दिल्लीला या गोष्टीची पूर्ण जाणीव आहे की, अफगाणिस्तानला जगापासून पूर्णपणे तोडल्यास तिथे कट्टरतावाद, दहशतवाद आणि अनिश्चितता आणखी वाढू शकते. म्हणूनच भारत सकारात्मक भागीदारी, विकास सहकार्य आणि धोरणात्मक संवादाच्या माध्यमातून अफगाणिस्तानमध्ये स्थिरता आणण्याचा प्रयत्न करत आहे. हे धोरण केवळ अफगाण जनतेच्या हिताचे नसून, संपूर्ण दक्षिण आशिया क्षेत्रात शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

# प्रगतीचे दावे आणि तळागाळातील वेदना



सध्या जनगणनेचा एका शिक्षिकेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. जनगणनेसाठी एका झोपडीवजा घरात पोहोचलेल्या त्या शिक्षिकेसमोर अशी विदारक परिस्थिती होती की घराचा क्रमांक नेमका कुठे लिहायचा, हाच प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला.अखेर झोपडीला आधार देणाऱ्या खांबावरच तिने क्रमांक लिहिला. हा प्रसंग केवळ एका कुटुंबाची वेदना नाही, तर विकासाच्या दाव्यांमागे दडलेले कटू वास्तव आहे. आजही अनेकांना निवारा आणि मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे.

मूलभूत गरजांसाठी होणारा संघर्ष हा कोणत्याही प्रगतीशील समाजासाठी अत्यंत चिंताजनक व गंभीर विषय आहे.जेव्हा समाजातील मोठ्या घटकाला अन्न,वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या प्राथमिक गरजांसाठी रोजचा संघर्ष करावा लागतो,तेव्हा मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाचा पाया ढासळताना दिसतो. प्रगतीचे दावे आणि तळागाळातील वेदना हा विरोधाभास आधुनिक विकासाच्या प्रक्रियेतील एक ज्वलंत वास्तव आहे.एका बाजूला जीडीपी वाढ, तंत्रज्ञानाचा विस्तार आणि भव्य पायाभूत सुविधांचे दावे केले जातात,तर दुसरीकडे आजही मोठा जनसमुदाय मूलभूत हक्क,गरिबी आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष करत आहे. तंत्रज्ञान,उद्योग आणि शहरीकरणामुळे देशाची आर्थिक ताकद वाढत आहे.नवीन रोजगार निर्मिती, डिजिटायझेशन आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताची वाढती पत हे या प्रगतीचे मुख्य आधार आहेत. या चकचकीत विकासाचा फायदा समाजातील एका विशिष्ट घटकालाच प्रामुख्याने मिळतो. ग्रामीण भाग, शेतकरी, मजूर आणि दुर्बल घटक या विकासाच्या प्रक्रियेत मागे पडतात.

विकासाच्या दाव्यांच्या चमकदार चित्रामागे आर्थिक विषमता,बेरोजगारी,पायाभूत सुविधांचा अभाव, आणि पर्यावरण हानी यांसारखे कटू वास्तव दडलेले असते. भव्य इमारती आणि रस्ते यामुळे खरा विकास मोजला जात नाही, तर तो मानवी जीवनाच्या गुणवत्तेवर आधारित असावा लागतो. केवळ भौतिक प्रगती (रस्ते आणि इमारती) म्हणजे खरा विकास नव्हे, तर मानवी जीवनाचा दर्जा सुधारणे हाच खऱ्या विकासाचा गाभा आहे.मानवी जीवनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी दर्जेदार आरोग्यसेवा सर्वांसाठी उपलब्ध असणे आणि प्रत्येक नागरिकाला सकस आहार मिळणे. केवळ साक्षरता नव्हे,तर रोजगारक्षम आणि नैतिक मूल्ये शिकवणारे दर्जेदार शिक्षण. शुद्ध हवा, पिण्याचे पाणी, सुरक्षितता आणि मानसिक शांततेने युक्त असे राहणीमान यावर अवलंबून असतो.

मोठ्या शहरांचा विकास होत असला, तरी आजही ग्रामीण भागात आणि निमशहरी भागात पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि चांगल्या दर्जाचे शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधा पोहोचलेल्या नाहीत. एका बाजूला मेट्रो, उड्डाणपूल आणि स्मार्ट सिटीच्या गोष्टी केल्या जातात, तर दुसऱ्या बाजूला आजही अनेक दुर्लक्षित घटकांना (उदा. ग्रामीण किंवा झोपडपट्टी भाग) शुद्ध पाणी, वीज आणि निवाऱ्यासारख्या मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. आजही ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक गरीब, वंचित आणि भूमिहीन कुटुंबांना पक्क्या घरांचा निवारा मिळालेला नाही. प्रशासकीय दिरंगाई,अपूर्ण सर्व्हेक्षण,आणि चुकीच्या निकषांमुळे अनेक पात्र लाभार्थी घरकुल योजनांपासून वंचित राहत आहेत. यामुळे त्यांना आजही कडाक्याची थंडी, पाऊस आणि उन्हाळ्यात झोपड्यांमध्ये किंवा उघड्यावर जगावे लागत आहे. प्रचंड आर्थिक वाढीनंतरही श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमालीची वाढली आहे. मुठभर लोकांच्या हातात देशाची संपत्ती केंद्रित झाली आहे, तर सामान्य जनतेला महागाई आणि रोजगाराच्या टंचाईशी लढावे लागत आहे.

राज्याच्या प्रगतीमध्ये महिला आणि बालकांची सुरक्षा आजही एक मोठा प्रश्न आहे.नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार, हजारो बालके बेपत्ता होण्याची प्रकरणे समोर येतात,जी सामाजिक सुरक्षेच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.कागदावर साक्षरतेचा टक्का वाढत असला, तरी दर्जेदार शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांमधील घोटाळे (उदा. पेपरफुटी) गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरवत आहेत. यामुळे सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण वाढते आहे. विकासाच्या नावाखाली होणारी जंगलतोड, प्रदूषण आणि हवामानातील बदल यामुळे सामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

▪ प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ.रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो.डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे.

# नेत्रदानाचा संकल्प करूया

शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे.त्यांचा जन्म १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या.१० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले.या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्याशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही.डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो.त्यांना दृष्टीच नसते.जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करून त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे.हे नेत्रदान चष्मा असणारे,मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात.आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

▪ श्याम ठाणेदार

## वाचकांचा पत्रव्यवहार

# रेल्वे प्रशासनाचा उपक्रम कौतुकास्पद


वाचाल तर वाचाल! हा मूलमंत्र केवळ चार अक्षरांची ओळख करून देणारा नाही तर माणसाला वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ करणारा एक प्रभावी विचार आहे.मात्र सध्याच्या डिजिटल क्रांतीच्या आणि मोबाईलच्या जमान्यात वाचन संस्कृती लयाला जात असून जो तो मोबाईलच्या आभासी दुनियेत हरवून गेला आहे. आज माणसाच्या हातातील पुस्तकाची जागा मोबाईल स्क्रीन, सोशल मीडिया रिल्स आणि वेब सिरीजनी घेतली आहे.विशेषतः रेल्वे प्रवासात खिडकीबाहेरचे जग न्याहाळत एखादे पुस्तक वाचून प्रवास सुखदायक आणि ज्ञानवर्धक करणारे प्रवासी आता कमीच दिसतात. या पार्श्वभूमीवर,वाचन संस्कृतीला पुन्हा उजाळा आणि संजीवनी देण्यासाठी भारतीय रेल्वे प्रशासन एक अत्यंत दिलासादायक आणि अभिनव उपक्रम राबवत आहे.

पश्चिम रेल्वे आणि प्रोजेक्ट मुंबई यांनी संयुक्तपणे मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकावर देशातील पहिले मोफत सार्वजनिक स्टेशन पुस्तकालय सुरु केले आहे.या वाचनालयाचे उद्घाटन नुकतेच दक्षिण आफ्रिकेचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्स याच्या हस्ते करण्यात आले. येथील पुस्तके प्रवासी स्थानकावर बसून वाचू शकतील तसेच घरी किंवा प्रवासात वाचण्यासाठी घेऊन जाऊ शकतील. मात्र १४ दिवसांनंतर ती परत करावी लागणार आहेत. हे मोफत पुस्तकालय केवळ विश्वास आणि प्रामाणिकपणा या तत्वांवर चालवले जाणार आहे.पश्चिम रेल्वे प्रशासन प्रोजेक्ट मुंबईच्या माध्यमातून या योजनेचा विस्तार हळूहळू दादर, अंधेरी आणि बोरीवली अशा गर्दीच्या उपनगरीय स्थानकांवरही करणार आहे. मोफत पुस्तकालयाचे रेल्वेने उचललेले हे पाऊल खरोखरच कौतुकास्पद असे आहे.

▪ प्रदीप मोरे

# समाजाला दिशा देण्यासाठी लेखनकला जोपासायला हवी

माणूस केवळ शिक्षण घेऊन लेखक होत नाही. त्यासाठी वाचनाची आवड आणि व्यासंग आवश्यक असतो. वाचनाशिवाय साहित्यविश्वाची ओळख होत नाही आणि चांगल्या लेखनासाठी आवश्यक असलेली भाषाशैलीही विकसित होत नाही. लिखाणाची कला अंगी असणे




जितके महत्त्वाचे आहे, तितकेच सातत्यही आवश्यक आहे. ज्याच्या मनात लेखनाची खरी उर्मी असते, ती त्याला स्वस्थ बसू देत नाही. तीच उर्मी त्याला स्वतःवर विश्वास ठेवून सातत्याने लेखन करण्यास प्रेरित करते. लेखन ही अशी कला आहे की ती प्रत्येकजण स्वतंत्रपणे जोपासू शकतो.

त्यासाठी कोणावरही अवलंबून राहण्याची गरज नसते. सातत्याने लेखन करणाऱ्यांसाठी संधींची कमतरता नसते.आपण कोणत्या प्रकारचे लेखन करायचे हे एकदा निश्चित केले की,यशाचा मार्ग आपोआप सापडत जातो. लेखकाला समाजाचा तिसरा डोळा मानले जाते.कारण तो समाजातील चुकीच्या,समाजविघातक रूढी-परंपरांविरुद्ध आवाज उठवून समाजाला जागृत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करत असतो. पूर्वीच्या अनेक लेखकांनी हे कार्य अत्यंत प्रभावीपणे पार पाडले. आज चांगल्या लेखकांची काहीशी वानवा जाणवत असली, तरी लेखनासाठी आजचे वातावरण पोषक आहे. निर्भीड, अभ्यासपूर्ण आणि दर्जेदार लेखन करणाऱ्या नवोदित लेखकांची आज समाजाला नितांत गरज आहे.

शिक्षण घेऊन डॉक्टर, अभियंता किंवा इतर व्यावसायिक होता येते; मात्र लेखक होण्यासाठी संवेदनशीलता, निरीक्षणशक्ती, वाचनाची आवड आणि अभिव्यक्तीची क्षमता अंगी असावी लागते. त्यामुळे ही क्षमता विकसित करण्यासाठी आणि समाजाला दिशा देण्यासाठी लेखनकला जोपासणे काळाची गरज आहे.

▪ शशिकांत गायकवाड, सांगली

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**बुधवार, ता.१०.६.२०२६,** विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे, ग्रीष्म ऋतो, अधिक ज्येष्ठ मासे,कृष्ण पक्षे,दशमी तिथी, २४.५९ नंतर एकादशी तिथी, उत्तराभाद्रपदा नक्षत्र, ९.२२ नंतर रेवती नक्षत्र, मीन रास, आयुष्यमान योग, ०६.३१ नंतर सौभाग्य २८.०४ पर्यंत, वाणिज करण, १३.५३ नंतर विष्टी करण २४.५९ पर्यंत,दिनमान १२.५९ पर्यंत, सुर्योदय ०६.०३ सुर्यास्त १९.०२ (कोल्हापूरचे) राहूकाळ दुपारी १२ ते १.३०, उत्तम दिवस दु.१.३० पर्यंत सर्व कामास शुभ, कुपनलिका, भद्रा, १३.५३ ते २४.५९, घबाड ९.२२ ते २४.५९.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**-सामाजिक स्नेहमेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

**वृषभ**-समूह कार्यात सहभागी झालात तर नवीन मित्र भेटतील.दैनंदिन गरजा न भागविल्या गेल्यामुळे काहीसा तणाव निर्माण होईल.

**मिथून**-तुमच्या मेहनतीचे चीज होऊन तुम्हाला बढती मिळण्याची शक्यता आहे. केवळ पैशाचा फायदा पाहू नका. नजिकच्या काळात तुम्हाला या बढतीचा उपयोग होईल.

**कर्क**- आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. दीर्घकालीन दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे.मनासारख्या घटना घडतील.

**सिंह**-आपल्या खाजगी आयुष्याबद्दल मित्र चांगला सल्ला देतील. तुमच्या प्रियजनांशी कटुपणे वागू नका अन्यथा नंतर तुम्हाला पश्चात्ताप करण्याची वेळ येईल.

**कन्या**- आजच्या दिवशी तुमच्या ध्येयपूर्तीच्या दृष्टीने अत्यंत उत्तम संधी चालून येतील.आयटी व्यावसायिकांसाठी परदेशातून नोकरीचा कॉल येण्याची शक्यता.

**तुळ**- प्रवासासाठी आजचा दिवस फार काही चांगला नाही. ज्या नातेवाईकांनी कठीण समयी मदत केली त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करा.

**वृश्चिक**-मतभिन्नता आणि दडपण यामुळे तुम्ही चिडचिडे आणि बैचेन व्हाल.घरातील आर्थिक स्थितीचा डोक्यावर भार असेल.अचानक प्रवास घडेल.

**धनु**-आजचा दिवस तुमच्यासाठी खूप उत्तम राहणार आहे. आज तुम्हाला आपल्यासाठी पर्याप्त वेळ मिळेल.नव्या कल्पना सुचतील.आपले आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न करा.

**मकर**-कुटुंबियांसमवेत शांत आणि स्थिर दिवसाचा आनंद घ्या.इतर लोक त्यांचे प्रश्न घेऊन तुमच्याकडे आले तर त्याकडे दुर्लक्ष करा.

**कुंभ**-तुमच्या योजनांबद्दल सर्वत्र बडबड कराल तर त्यामुळे तुमचा प्रकल्प बारगळेल. या राशीतील विद्यार्थी, विद्यार्थिनी आज आपल्या किमती वेळेचा दुरुपयोग करू शकतात.

**मीन**-आरोग्याची काळजी घ्या.कुटुंबातील लोकांमध्ये पैश्याला घेऊन आज वाद होऊ शकतात.पैश्याच्या बाबतीत तुम्हाला कुटुंबातील सर्व लोकांसोबत स्पष्ट होण्याचा सल्ला दिला जातो.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६०, पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात मोहीम

## नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

मुरगूड,ता.९(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालण्यासाठी राज्यभर विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. या मोहिमेअंतर्गत १५ जूनपर्यंत या कालावधीत सर्व विभागांमध्ये संयुक्त तपासणी व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे.तसे परिपत्रक एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने जारी केले आहे.**



मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने अवैध प्रवासी वाहतुकीसंदर्भात दिलेल्या आदेशांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असून, राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खासगी वाहने उभी करून प्रवासी घेणे अथवा उतरविणे यावर बंदी राहणार आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

एसटी महामंडळ ही राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. एसटीच्या उत्पन्नावर परिणाम करणारी तसेच प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारी अवैध प्रवासी वाहतूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. बसस्थानक परिसरात अनधिकृत वाहतुकीमुळे निर्माण होणारी गर्दी, वाहतूक कोंडी आणि सुरक्षेचे प्रश्न लक्षात घेता या मोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या मोहिमेत विभागीय वाहतूक अधिकारी,आगार व्यवस्थापक, वाहतूक निरीक्षक,सहाय्यक वाहतूक निरीक्षक, वाहतूक नियंत्रक तसेच सुरक्षा व दक्षता विभागाचे अधिकारी आणि पर्यवेक्षक यांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. संबंधित विभाग प्रमुखांनी संयुक्त पथके स्थापन करून नियमित तपासण्या कराव्यात तसेच नियमभंग करणाऱ्या वाहनांवर तात्काळ कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय, प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करून त्याबाबतचा सविस्तर अनुपालन अहवाल मुख्यालयास सादर करावा,असेही आदेश देण्यात आले आहेत. सरनाईक यांनी सर्व विभाग नियंत्रक, प्रादेशिक व्यवस्थापक आणि संबंधित अधिकाऱ्यांना या मोहिमेकडे केवळ औपचारिक उपक्रम म्हणून न पाहता ती जनहिताची आणि एसटीच्या हितसंरक्षणाची जबाबदारी म्हणून राबविण्याचे आवाहन केले आहे.

'प्रवाशांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि दर्जेदार सेवा देणे हे एसटी महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीचे आर्थिक नुकसान तर होतेच, पण प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे बसस्थानक परिसरात कायद्याचे काटेकोर पालन करून अवैध वाहतुकीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे,' असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले. या विशेष मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील शिस्त वाढण्यास, एसटीच्या महसुलाचे संरक्षण होण्यास आणि प्रवाशांना अधिक सुरक्षित व सुव्यवस्थित सेवा उपलब्ध होण्यास मदत होई सा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# १५ जून पर्यंत घरकुलांचे वितरण करा

## ...अन्यथा उपोषणाचा माजी नगराध्यक्ष विलास गाडीवड्डर यांचा इशारा

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)–



**घरकुल लाभार्थ्यांची निवड १५ जूनच्या आत चिट्ठी काढून करावी, जर १५ जूनच्या आत घरे हस्तांतरित केली नाहीत, तर नगरपरिषदेसमोर उपोषण करण्याचा इशारा माजी नगराध्यक्ष विलास गाडीवड्डर यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे.**

निवेदनात दिलेल्या माहितीनुसार निपाणी नगरपालिका आणि राजीव गांधी गृहनिर्माण महामंडळ यांच्यामार्फत पट्टणकुडी गाव परिसरात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या एएचपी युनिट अंतर्गत जी+२ प्रकारची गट घरे २०/०५/२०२६ रोजी झालेल्या आश्रय समितीच्या बैठकीद्वारे लाभार्थ्यांना वाटप केली जाणार होती. परंतु, लाभार्थ्यांच्या निवडीपूर्वी, काँग्रेस आणि भाजप पक्षाच्या लोकांनी निर्माण केलेल्या गोंधळामुळे, २१/०५/२०२६ रोजी एक वृत्तपत्रीय अहवाल प्राप्त झाला आहे, ज्यात लाभार्थ्यांची निवड रद्द करण्यात आल्याचे म्हटले आहे. त्यानुसार, मी नमूद केल्याप्रमाणे एक पत्र दिले आहे, ज्यानुसार लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित करण्यासाठी नियमांचे पालन केले पाहिजे. लाभार्थ्यांची निवड १५ दिवसांच्या आत चिट्ठी काढून केली पाहिजे. जर १५ दिवसांच्या आत घरे हस्तांतरित केली नाहीत तर नगरपरिषदेसमोर आंदोलन केले जाईल. तथापि, पत्रात असे नमूद केले होते की, आतापर्यंत कोणत्याही लाभार्थ्यांची निवड झालेली नाही. म्हणून, नियमांनुसार १५/०६/२०२६ पर्यंत पात्र लाभार्थ्यांना चिट्ठी काढून घरे हस्तांतरित करावीत. जर १५/०६/२०२६ पर्यंत घरे हस्तांतरित केली नाहीत तर नगरपरिषदेसमोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदर निवेदनाच्या प्रती पालिका आयुक्त, उपायुक्त कार्यालय, बेळगाव, प्रकल्प संचालक, जिल्हा शहरी विकास कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, बेळगाव, पोलीस निरीक्षक व शहर पोलीस ठाणे यांना पाठविण्यात आल्या आहेत.



अमलझरी येथे बैलजोडीद्वारे पेरणी करताना शेतकरी.

# निपाणी तालुक्यात खरीपाची धांदल

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)–

**यंदाचा खरीप हंगाम चांगला साधण्यासाठी निपाणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण करून बियाणे खरेदीला सुरुवात केली आहे. रयत संपर्क केंद्रातून सबसिडीवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या टन सोयाबीन बियाण्यांपैकी आठवडाभरात तब्बल ४५ टन बियाण्यांची उचल शेतकऱ्यांनी केली आहे.**

निपाणी शहर व ग्रामीण भागातील सहा केंद्रांवर सोयाबीन बियाण्यांची विक्री सुरू असून १ जून ते ६ जून या कालावधीत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात बियाण्यांची खरेदी केली. दोन तीन वळीव पावसामुळे तसेच काही शेतकऱ्यांकडे ठिबक सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्याने नदीकाठ परिसरातील काही भागात सोयाबीन पेरणी केली आहे. रयत संपर्क केंद्राने मागील पाच वर्षांतील मागणीचा अनुभव लक्षात घेऊन यंदा शेतकऱ्यांना पुरेल इतका बियाणे साठा उपलब्ध करून घेतला आहे.सद्यस्थितीत ३३५ वाणाचे सोयाबीन बियाणे संपले असून अद्यापही ९३०५ व डीएसपी २१ या वाणाचे बियाणे सध्या उपलब्ध आहे. गेल्या ४ दिवसांपासून पेरणीयोग्य पाऊस होऊन जमिनीत चांगला ओलावा निर्माण झाला आहे.त्यामुळे पेरणीची कामे उरकून घेण्यासाठी शेतकऱ्यांची एकच घाई उडाली आहे. सर्वत्र एकाच वेळी पेरणीची धांदल उडाल्याने मजूर मिळेनासे झाले आहेत. त्यामुळे पैरा पद्धतीचा अवलंब करून कामे उरकून घेतली जात आहे. तसेच तणांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बीनाशकांची फवारणी केली जात आहे. या फवारणीमुळे कमी प्रमाणात तण येण्यासह मजुरी खर्चात बचत होण्यास मदत होते.

# संकेश्वरात सोयाबीन बियाणांचे वितरण

संकेश्वर,ता.९(प्रतिनिधी)–

**संकेश्वर शंकरलिंग प्राथमिक कृषी सहकारी संस्थेने आम.निखिल कत्ती यांच्या हस्ते सोयाबीन बियाणे वितरणाचा शुभारंभ केला.आम. निखिल कत्ती यांनी सोयाबीन बियाणे पोतींचे पूजन करून बोलताना म्हणाले, कर्नाटक राज्य सरकार शेतकऱ्यांना माफक दरात उत्कृष्ट सोयाबीन बियाणांचा पुरवठा पीकेपीएस मार्फत करीत आहे.**

शेतकऱ्यांनी सरकारतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सोयाबीन बियाणांची योग्य वेळी पेरणी करुन त्याचा लाभ घ्यावयाचा आहे. शेतकऱ्यांनी खरीप पेरणीसाठी मान्सूनची प्रतिक्षा करायला हवी. शंकरलिंग पीकेपीएसतर्फे वितरण केल्या जाणाऱ्या ३० किलो वजनाची सोयाबीन पिशवीची किंमत २ हजार ७६० रुपये असून त्यावर सरकारकडून ७५० रुपयांची सबसिडी (अनुदान) दिले जाते.त्यामुळे शेतकऱ्यांना २ हजार १० रुपये मात्र मोजावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शंकरलिंग पीकेपीएसचे अध्यक्ष गजानन क्वळी, उपाध्यक्ष रामचंद्र किल्लेदार,सुनील पर्वतराव, कुमार बस्तवाडी, अप्पू तंबद, शिवकुमार उर्फ आणप्पा संगाई, गंगाराम भूसगोळ, विवेक क्वळी, रोहण नेसरी, शिवानंद मुडशी, शंकर क्वळी, विष्णू जाधव,पुंडलिक कुंभार,बाळू शिंदे,बसवराज कुंभार उपस्थित होते.

## पर्यावरणाचे रक्षण करणे हेच मानव जातीचे रक्षण-कुलकर्णी

कोगनोळी,ता.९(प्रतिनिधी)–

**आपण ज्या पृथ्वीवर राहतो तीच आपली खरी आई आहे. शुद्ध हवा, निर्मळ पाणी, अन्नधान्य, वृक्ष, वन्यजीव आणि निसर्गाची अमूल्य देणगी आपल्याला पर्यावरणातून मिळते. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे हेच मानव जातीचे रक्षण असल्याचे प्रतिपादन वर्षा कुलकर्णी यांनी केले.**

कोगनोळी (ता.निपाणी) येथील इंटरनॅशनल पब्लिक स्कूल या सैनिकी शाळेत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.प्रारंभी संदीप कुराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.याप्रसंगी मुख्याध्यापिका कोमल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर भोज ग्रामस्थांचे उपोषण मागे

## शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याची ग्वाही; काम अपूर्ण राहिल्यास संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कारवाईचा इशारा

ढोणेवाडी,ता.९(प्रतिनिधी)–

**शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी भोज ग्रामपंचायत कार्यालयासमोर सोमवार ८ जून रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण अखेर रात्री साडेदहा वाजता प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.**

भोज गावातील रखडलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या विरोधात ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता. दिवसभर सुरू असलेल्या उपोषणामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती. अखेर रात्री उशिरापर्यंत झालेल्या चर्चेनंतर कार्यकारी अभियंता,चिकोडी यांनी आंदोलन कर्त्यांसोबत बैठक घेतली. यावेळी कार्यकारी अभियंत्यांनी लेखी स्वरूपात आश्वासन देत, 'भोज गावातील जलजीवन मिशन योजनेची उर्वरित कामे पुढील पंधरा दिवसांत पूर्ण करून गावातील नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा करण्यात येईल. तसेच दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल,' असे स्पष्ट केले.



कार्यकारी अभियंत्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण स्थगित केले.

प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर रात्री सुमारे १०.३० वाजता उपोषणकर्त्यांना पाणी पाजून सत्याग्रहाची सांगता करण्यात आली.

या उपोषणात माजी तालुका पंचायत सदस्य प्रकाश वडार, माजी ग्रामपंचायत सदस्य सचिन मोहिते, आरिफ मकानदार, डॉ. बापूसाहेब हंफन्नावर, विपुल ढेरे, राजू बुरजी, अभय पाटील, कुमार नाईक, अनिल मडिवाळ यांच्यासह भोज ग्रामस्थ सहभागी झाले होते. यावेळी रयत कर्नाटक राज्य रयत संघ, भोज आणि हरित सेना, भोजचे रमेश पाटील,शितल बागे व कार्यकर्ते यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला होता.

उपोषण मागे घेताना आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, प्रशासनाने दिलेल्या पंधरा दिवसांच्या मुदतीत गावाला शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध झाले नाही, तर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. त्यामुळे आता प्रशासन दिलेल्या आश्वासनाची कितपत पूर्तता करते, याकडे संपूर्ण गावासह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# फोटोग्राफर-व्हिडिओग्राफर असो.ची वार्षिक सभा संपन्न

यमगर्णी,ता.९(वार्ताहर)–

**निपाणी तालुका फोटोग्राफर व व्हिडिओ ग्राफर असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. प्रारंभी असोसिएशनचे सेक्रेटरी संजय सूर्यवंशी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यक्ष नरेंद्र बाडकर, उपाध्यक्ष विनायक पाटील यांनी गतवर्षी केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.**



निपाणी: तालुका फोटोग्राफर-व्हिडिओग्राफर असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी उपस्थित पदाधिकारी व सदस्य.

पेट्रोलचे दर व इतर महागाई पाहता तसेच फोटोग्राफीमध्ये लागणाऱ्या सर्वंच साहित्यांचे दर वाढल्याने फोटोग्राफी व व्हिडिओग्राफीमध्ये २५ ते ३० टक्के दरवाढ करण्याचे निश्चित झाले. त्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नूतन अध्यक्ष म्हणून संजय सूर्यवंशी, उपाध्यक्ष म्हणून श्रावण कांबळे व प्रदीप भोईटे, सेक्रेटरी म्हणून विनायक पाटील, खजिनदार नरेंद्र बाडकर यांची निवड करण्यात आली तर संचालकपदी बंडू कुंभार, संतोष जरग, राहुल तावदारे, सानिका ढंग, राहुल पाटील,अमित मुरगुडे, संदेशकुमार सूर्यवंशी, अलंकार कांबळे, इराप्पा मडिवाळ, सुरज कराळे यांची निवड करण्यात आली तर सल्लागारपदी विजय दावणे, विजय नार्वेकर, श्रद्धा माळी, गंगाधर कळसन्नावर यांची निवड करण्यात आली.यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार ज्येष्ठ छायाचित्रकार मारुती घाटगे, राजू शिरोळे, निवास जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना अध्यक्ष संजय सूर्यवंशी म्हणाले, चालू वर्षात छायाचित्रकारांसाठी विविध उपक्रम राबवणार असून कर्नाटक राज्य फोटोग्राफर असोसिएशनतर्फे राज्य शासनाकडून मिळणाऱ्या सुविधा सर्व छायाचित्रकारांना मिळवून देणार असल्याचे सांगितले.

यावेळी श्रीकांत कुंभार, वैभव कंगळे, आप्पासो दिंडे, योगेश्वर काजवे, आकाश पाटील, ऋतुराज पायमल, संतोष साळुंखे, किरण पाटील, राहुल मजगे, विश्वनाथ गुडसे, केतन पाटील यांच्यासह फोटोग्राफर व व्हिडिओ ग्राफर मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार विनायक पाटील यांनी मानले.

# दिव्यांगांना सुविधा देण्यासाठी कटिबद्ध-खास.जारकीहोळी

चिकोडी ,ता.९(प्रतिनिधी)–

**दिव्यांगांनी खचून न जाता त्यांच्या प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी व त्यांना नेते मंत्री सतीश जारकीहोळी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघातील प्रत्येक गावातील दिव्यांग व्यक्तींना सरकारी सुविधा पोचविण्याचे काम केले जाईल,असे चिकोडीच्या खा. प्रियंका जारकीहोळी यांनी सांगितले.**



शहरातील परटी नागलिंगेश्वर सभागृहात चिकोडी लोकसभा मतदारसंघातील अपंग नागरिकांना उपकरणे व शाळांना स्मार्ट बोर्ड वाटप करून त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या, सरकारी दवाखान्यामध्ये एक्स-रे व सोनोग्राफी मशीन बसवण्यात येईल. दिव्यांग राघवेंद्र अनवेकर यांनी आपल्या अपंगत्वावर मात करून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर जलतरण स्पर्धेत सहभागी होऊन अनेक सुवर्णपदके पटकावले आहेत. त्याचा आदर्श सर्व दिव्यांगांनी घेतल्यास निश्चितच जीवनामध्ये यश मिळू शकते. सरकारच्या सर्व योजना आणून दिव्यांगांना पोचविण्याचे काम आम्ही करत आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक क्षेत्राला अधिक प्राधान्य देत असल्याचे सांगितले.आम.गणेश हुक्केरी म्हणाले, आपण जारकीहोळी व हुक्केरी घराण्याकडून अपंग, महिला, शेतकऱ्यांच्या विकासासाठी सर्व सरकारी योजना पोचवण्याचे प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत.

यावेळी काँग्रेसचे नेते महावीर मोहिते, दिव्यांग जलतरणपटू राघवेंद्र अनवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बुडाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चिंगळे यांनी स्वागत केले. यावेळी प्रभाकर कोरे, इरफान बेपारी, अर्जुन नाईकवाडी, निर्मला पाटील, सुप्रिया पाटील, गटशिक्षणाधिकारी प्रभावती पाटील, एच. एस. नसलापुरे यांच्यासह, विविध अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### विविध साहित्य वितरण

यावेळी खासदार प्रियंका जारकीहोळी यांच्याकडून चिकोडी लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग लोकांना तीन चाकी स्कूटर, बायसिकल श्रवण यंत्र, वॉटर बेड व शाळांना स्मार्ट बोर्डचे वाटप करण्यात आले. यात ३५ वॉटर बेड, व्हीलचेयर २५, श्रवण यंत्र ३० व १८ तीन चाकी स्कूटर,गाडी १८, टॅब १०,१२ स्मार्टफोन वितरण करण्यात आले.

# शाहूनगरातील लहान भुयारी मार्गाचे रूंदीकरण करावे

## निकू पाटील यांची खास.जारकीहोळींकडे निवेदनाद्वारे मागणी

निपाणी,ता.९(प्रतिनिधी)–

**निपाणी शहरातील राष्ट्रीय महामार्गाच्या पश्चिम बाजूकडून आंदोलन नगर, प्रगतीनगर, शाहूनगर, आश्रयनगर, सरकार कॉलनी, संभाजीनगर पर्यंत महामार्गावरील बोगद्याचे रुंदीकरण आणि विस्तारीकरण करण्यात यावे, अशी मागणी निपाणी टाऊन प्लॅनिंगचे अध्यक्ष निकू पाटील यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन खास.प्रियांका जारकीहोळी यांना देण्यात आले.**



चिकोडीत खास.जारकीहोळी यांना निवेदन सादर करण्यात आले. याप्रसंगी लक्ष्मणराव चिंगळे,सुप्रिया पाटील,निकू पाटील व इतर.

निवेदनात असे म्हटले आहे की, आंदोलननगर, प्रगतीनगर, शाहूनगर,आश्रयनगर, सरकारकॉलनी, संभाजीनगर येथील सर्व रहिवाशी या महामार्गावरील लहान बोगद्यातून (भुयारी मार्गातून) नियमितपणे प्रवास करतात. येथील रहिवाशांची संख्या सुमारे १५ ते १६ हजार आहे. येथे बीईओ कार्यालय, मंगल कार्यालय, महादेव मंदिर, श्री स्वामी समर्थ मंदिर यांसारखी प्रार्थनास्थळेही आहेत.त्यामुळे निपाणी परिसरातील मोठ्या संख्येने लोक येथे नियमितपणे येतात. त्याचप्रमाणे, त्या बाजूला न्यायालये, भाजी बाजार, अग्निशमन केंद्रे इत्यादी आहेत. शिवाय, सरकारने महामार्गाच्या दोन्ही बाजू व्यावसायिक क्षेत्र म्हणून घोषित केल्यामुळे, दोन्ही बाजूंच्या व्यावसायिक आस्थापनांना आणि सर्वांना गैरसोय होत आहे. या सर्व अडचणी लक्षात घेऊन, या बोगद्याची रुंदी किमान दोन ते चारचाकी वाहने जाण्यासाठी आणि विशेषतः अनेक पायी प्रवास करणाऱ्या लोकांसाठी पुरेशी असावी, जेणेकरून वृद्ध, अपंग, शाळेत जाणारी मुले आणि इतर पादचारी कोणत्याही अडथळ्याशिवाय फिरू शकतील. महामार्गाच्या बाजूला असलेल्या सेवा रस्त्यावर बांधलेल्या नाल्यांमधील पाण्याची विल्हेवाट न लावल्यामुळे ते निवासी भागातील घरांमध्ये शिरत आहे. त्यामुळे लोकांना डास आणि इतर कीटकांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे, ते पाणी सेवा रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या खड्ड्यात सोडले पाहिजे अशा मागण्यांचा समावेश आहे. यावेळी खास.प्रियांका जारकीहोळी यांनी निवेदनाचा स्वीकार करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी बुडाअध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे, सुप्रिया पाटील यांच्यासह या भागातील नागरिक उपस्थित होते. निवेदनावर टाऊन प्लॅनिग अध्यक्ष निकू पाटील, विनोद बल्लारी, आर.के. दिवाकर, एस. एस. चव्हाण, अरूण आवळेकर, रविंद्र श्रीखंडे, फारूख गवंडी यांच्यासह नागरिकांच्या सह्या आहेत.

# वारकऱ्यांना लागली आषाढी वारीची आस


## कोगनोळीसह सीमाभागात पायी दिंडी सोहळ्याची लगबग सुरु

कोगनोळी,ता.९(प्रतिनिधी)–

**पाऊले चालती पंढरीची वाट !**
**सुखी संसाराची तोडूनिया गाठ !!**
**या अभंगाच्या ओळी पंढरीची वारी आली की आपोआप वारकऱ्यांना आठवतात व आषाढी वारीसाठी वारकऱ्यांची पावले आपोआप पंढरीच्या दिशेने पडू लागतात.**

आषाढी वारी हा सर्वात मोठा सोहळा अवघ्या दीड महिन्यावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे कोगनोळीसह सीमाभागात व तालुक्यातील गावागावातून निघणाऱ्या पायी दिंडी सोहळा प्रमुखांची लगबग सुरु झाली आहे. दिंडीमध्ये जास्तीत जास्त वारकरी, भाविक गोळा करणे, दिंडीसाठी लागणारे साहित्य गोळा करणे, देणगी गोळा करणे, वाहनांचे नियोजन करणे यासह दिंडीसाठी लागणाऱ्या साहित्यांची जमवाजमव करणे आदींचे नियोजन करण्यात दिंडीतील कांही प्रमुख मंडळी दिसत आहेत.

पंढरपूरच्या पांडुरंगाची आषाढी, कार्तिकी, चैत्र आणि माघ अशा प्रमुख चार वाऱ्या



असल्या तरी आषाढी वारी ही सर्वात श्रेष्ठ व मोठी वारी मानली जाते. याच वारीला हजारो दिंड्या देशाच्या कानाकोपऱ्यातून येत असतात. या वारीला महत्त्वाचे म्हणून संबोधल्या जाणाऱ्या आळंदीहून निघणाऱ्या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर झाले असल्याने वारकरी मंडळींसह सर्वांनाच आता आषाढी वारीची आस लागून राहिली आहे. या वारीत वारकरी, भाविक तहानभूक हरवून पायी दिंडी सोहळ्यातून फक्त डोळ्यासमोर विठ्ठलाच्या भेटीची आस धरुन चालत असतात. या आषाढी वारीची सुरुवात प्रथम ज्ञानेश्वर माऊलींच्या दिंडी सोहळ्याने होते. या सोहळ्यात देशभरातून लाखो भाविक सहभागी होत असतात.

८ जुलै २०२६ रोजी आळंदीहून श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होणार आहे. ९ आणि १० रोजी पुणे तर ११ आणि १२ रोजी सासवड मुक्काम होणार आहे. १३ रोजी जेजुरी, १४ रोजी वाल्हे, १५ रोजी लोणंद, १६ रोजी तरडगाव, १७ रोजी फलटण, १८ रोजी बरड, १९ रोजी नातेपुते, २० रोजी माळशिरस, २१ रोजी वेळापूर, २२ रोजी भंडी शेगाव, २३ रोजी वाखरी तर २४ रोजी पंढरपूरात पोहोचणार आहे.

२५ जुलै रोजी देवशयनी आषाढी एकादशी असून आषाढी एकादशीच्या पुढे २९ जुलै पौर्णिमेपर्यंत दिंडीचा पंढरपूर मुक्काम होणार आहे. गोपाळकाला करुन या दिंडी सोहळ्याचा परतीचा प्रवास सुरु होणार आहे.

## इंडियन डेअरी असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी
# गोकुळचे कार्यकारी संचालक डॉ.गोडबोले बिनविरोध

**कोल्हापूर,ता.९ (प्रतिनिधी)– इंडियन डेअरी असोसिएशनच्या पश्चिम विभागाच्या व्हा.चेअरमन (उपाध्यक्ष) पदी कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) चे कार्यकारी संचालक डॉ. योगेश गोपाळ गोडबोले यांची बिनविरोध निवड झाली आहे.पश्चिम विभागाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा तसेच दमण आणि दीव या राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे.**

इंडियन डेअरी असोसिएशन ही देशातील दुग्ध व्यवसाय, दुग्ध विज्ञान, संशोधन, तंत्रज्ञान, गुणवत्ता व्यवस्थापन आणि उद्योग विकासासाठी कार्य करणारी अग्रगण्य राष्ट्रीय संस्था आहे. दुग्ध क्षेत्रातील विविध घटकांमध्ये समन्वय साधणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे तसेच दुग्ध उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणे ही संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.



डॉ. गोडबोले हे सध्या सुमारे ४२०० कोटी वार्षिक उलाढाल असलेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) चे व्यवस्थापकीय संचालक म्हणून सन २०२१ पासून कार्यरत आहेत. गोकुळ हा देशातील आघाडीच्या सहकारी दुग्ध संस्थांपैकी एक मानला जातो. गोकुळच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

भारतीय दुग्ध उद्योगातील ३१ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या डॉ. गोडबोले यांनी सहकारी, खाजगी आणि बहुराष्ट्रीय दुग्ध क्षेत्रात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. दूध संकलन, गुणवत्ता व्यवस्थापन, दुग्ध प्रक्रिया, विक्री-विपणन, पशुपालक सेवा आणि प्रशासकीय व्यवस्थापन या क्षेत्रांतील त्यांचा व्यापक अनुभव विशेष मानला जातो. ते इंडियन डेअरी असोसिएशन (वेस्ट झोन) तसेच डेअरी टेक्नॉलॉजी असोसिएशन(पुणे)चे माजी समिती सदस्य असून त्यांनी डेअरी टेक्नॉलॉजी, एमबीए, एम.फिल. (अर्थशास्त्र) तसेच पीएच.डी. ही उच्च शैक्षणिक पात्रता संपादन केली आहे.

निवडीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. गोडबोले यांनी इंडियन डेअरी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे, दुग्ध क्षेत्रातील सहकाऱ्यांचे तसेच शुभेच्छा देणाऱ्या सर्वांचे आभार मानले. त्यांनी आपल्या निवडीचे श्रेय गोकुळ दूध संघाच्या प्रगतीशील कार्यपद्धतीला, संस्थेच्या संचालक मंडळाला, प्रशासकीय यंत्रणेला तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वासाला दिले. गोकुळने दुग्ध क्षेत्रात उभारलेली विश्वासार्हता, गुणवत्ता आणि दूध उत्पादक हिताच्या उपक्रमांमुळेच राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पश्चिम विभागातील दुग्ध व्यवसाय अधिक तंत्रज्ञानाधारित, गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत करण्यासाठी सर्व संबंधित घटकांशी समन्वय साधून कार्य करण्याचा मानसही व्यक्त केला.

## संत निरंकारी मंडळतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मिरज,ता.९(प्रतिनिधी) सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनानुसार संत निरंकारी मंडळ (रजि., दिल्ली) ब्रँच मिरज यांच्यातर्फे दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला.**

सांगलीचे उपजिल्हाधिकारी सतीश कदम यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कदम म्हणाले की, मनातील विकार व नकारात्मक विचारांचे दमन करण्यासाठी संतांची संगत आवश्यक आहे. शिक्षणामुळे माणूस सुशिक्षित होऊ शकतो. मात्र सुसंस्कृत होण्यासाठी अध्यात्माची जोड आवश्यक आहे.

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ४८०,४८१, ४८३, ४८४, ५०५ ते ५०९ पैकी प्लॉट नंबर २ चे क्षेत्र २००० चौ. फुट मिळकत सर्व यासी चतुः सिमा पुर्वेस रस्ता, पश्चिमेस धनगर यांची मिळकत, दक्षिणेस प्लॉट नं. ३. उत्तरेस प्लॉट नं. १ सदरची मिळकत ही श्री चौंडेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित तारदाळ यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकत ही सुधिर पंढरीनाथ धुत्रे यांना ॲलोट केलेली असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी, म्हणून दिली नोटीस सही.

ता. ०७/०६/२०२६,

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की...

मिळकतीचे वर्णनः मौजे कबनूर ग्रामपंचायत हद्दीतील येथील क. ग.नं. २०५ हे.आर.१.३९.०० आकार रूपये १६.३९ ची मिळकत. यामधील क्षेत्र हे. आर ०-१९.५२ आकार रूपये २-३३ ची मिळकत यासी चतु:सिमाः –

पुर्वेस :-ओघळ व देणार यांची मिळकत, पश्चिमेस :- श्री. इंगवले यांची मिळकत, दक्षिणेस :-शांनीथाथ केटकाळे यांची मिळकत, उत्तरेस : श्री. अनंत केटकाळे यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत श्री. जिवंधर भरमू केटकाळे रा. कबनूर यांचे मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारपत्र करून संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा दिला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही हक्कसंबंध दावा अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) सात दिवसाचे आत खालील ॲडव्होकेट यांचे पत्यावर कागदपत्रासह लेखी खुलासा करावा. म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता.०९/०६/२०२६

**ॲड. रागिणी उत्तम मोरबाळे**

**१६/१२०१ आयजीएम. हॉस्पीटल जवळ, इचलकरंजी. मोब.नं.९७६७१८३८९१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन** – जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी कोरोची येथील क.ग.नं. ६०८/ ११, एकूण क्षेत्र हे. २७८.८१ चौ.मि. पैकी उत्तरेकडील क्षेत्र १३९.४० चौ.मि. ची मिळकत त्यावरील बांधीव इमारतीसह सर्व यांसी चतु:सिमा पूर्वेस :- २० फूट रस्ता. पश्चिमेस :- श्री. पटेल यांची मिळकत, दक्षिणेस :- याच प्लॉटमधील शिल्लक मिळकत, उत्तरेस :- बिळगीकर यांची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट मिळकत त्यातील लाईट, पाणी कनेक्शन, तदंगभूतवस्तु व इजमेंटचे हक्कासहची मिळकत.

२) वर नमूद मिळकत ही श्री.अर्शद मुबारक कोतवाल, रा. इचलकरंजी यांचे मालकी, कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत ही आवास फायनान्सर्स लि. यांना तारण दिलेली आहे. त्याशिवाय सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून त्यांचेशी तोंडी करार करून संचकार रक्कम स्विकारलेली आहे.

३) सबब सदर मिळकतीवर वर नमूद कर्ज बोजा शिवाय अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध दावा, पोटगी, तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, करार मदार वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावा. मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही म्हणून दिली नोटीस

ता. ९/६/२०२६.

**ॲड. सारंग सुरेश जोशी**

**शिवप्रसाद १९/२४१ कमला नेहरू हौसिंग सोसायटी, इचलकरंजी.मो.नं.८१४९०१७०७७.**

## पावसामुळे गौरवाडमध्ये पाणंद रस्त्याचा भराव वाहून गेला

**बुबनाळ,ता.९ (वार्ताहर)– पावसामुळे गौरवाड (ता.शिरोळ) येथील नदी पाणवठा रस्त्यावर असलेल्या आरबाळे ओढ्याजवळील पाणंद रस्ता वाहून गेला. शेत शिवारातील सऱ्या भरुन पाणी वाहिल्याने ओढ्या नाल्यातून हे पाणी रस्त्यावर आले.**



**गौरवाड येथे नदी पाणवठा रस्त्यावर ओढ्याचे पाणी जाण्यासाठी पाईप टाकून केलेल्या रस्त्याचा भराव वाहून गेला.(छाया–अनिल जासुद)**

येथील आरबाळे -मोरे ओढ्याजवळून शेखजी यांच्या शेताजवळ असलेल्या पाणंद ररस्त्यावर ओढ्याचे पाणी जाण्यासाठी दोन मोठ्या सिमेंट पाईप टाकून येण्याजाण्यासाठी रस्ता केला आहे.मात्र ओढ्याच्या पाण्याला तीव्र गती असल्याने पाईपजवळील सर्व भराव वाहून गेला आहे. यामुळे पाईप उघड्या पडल्या आहेत. कृष्णा काठावर अनेक शेतकऱ्यांची शेती आहे. यामुळे शेतकऱ्यांना वैरणीसाठी, शेतीसाठी दररोज दिवसातून चार-पाच वेळा आपल्या शेताकडे फेरी मारावी लागते. रस्ता वाहून गेल्यामुळे येथे फक्त पायवाटेपुरताच रस्ता शिल्लक राहिला आहे. यामुळे येथून पुढे जाणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या शेतशिवारापर्यंत वाहने घेऊन जाता येऊ शकत नाहीत.परिणामी पुढे शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना येथेच आपली वाहने लावून डोक्यावरून वैरणीचा भारा आणावा लागत आहे.

या पाणंद रस्त्यावरील ओढ्याच्या ठिकाणी भर टाकून पुन्हा पाऊस झाल्यास भराव वाहून जाणार नाही अशा कायमस्वरुपी रस्त्याची सोय करावी, अशी मागणी येथील शेतकऱ्यांमधून होत आहे.

## जाहीर नोटीस

**मौजे रुई** येथील गट नंबर **६९६ पैकी प्लॉट नंबर २३ चे क्षेत्र २३१.४१ चौरस मिटर** ची मिळकत. यासि चतु:सिमा **पुर्वेस** – २० फुट रुंदीचा रस्ता, **पश्चिमेस** – श्री. सुतार यांची मिळकत, **दक्षिणेस** – प्लॉट नंबर २४, **उत्तरेस**– प्लॉट नंबर २२. सदरची मिळकत **श्री. शैलेंद्र कुमार शितोळे रा. सांगली** यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकतीवर बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडीट सोसा लि. बुलढाणा या बँके व्यतीरीक्त कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. ०९/०६/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन** – जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी मुळची कबनूर येथील व सध्या काा इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समावष्टि झालेल्या मिळकतीचा **क.ग.नं. ३११** क्षेत्र हे . ० – ९५ आर आकार रु.१०-३१ पैसे यापैकी बिगरशेती **प्लॉट नं.३ क्षेत्र ३१० चौ.** मी. या मिळकतीवर बांधलेल्या **नारायणी ॲनटीलिया** या अपार्टमेंटचे **चौथे मजले** वरील निवासी सदनिका नं. **४०१ चे** कारपेट क्षेत्र **१३२.२२ चौ. मी**. याचे **१४२२.६९ चौ.** फुटाची सदनिका यामधील लाईट,पाणी कनेक्शनसह यांसी चतु:सिमा **पुर्वेस** – सदरील अपार्टमेंटचे साईड मार्जिन, **पश्चिमेस** सदरील अपार्टमेंटचे साईड मार्जिन, **दक्षिणेस**–सरकारी रस्ता, **उत्तरेस**– सदरील अपार्टमेंटचे साईड मार्जिन.

२) वर नमुद मिळकत ही **श्री सुशिल रामगोपाल माहेश्वरी, रा. इचलकरंजी** यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा **श्री डायालाल शिवदास दयाणी, रा. इचलकरंजी** यांना देवून मिळकत विक्रीचे खरेदीपूर्व करारपत्र करुन दिले आहे. सदरची मिळकत खरेदी घेणेसाठी **श्री डायालाल शिवदास दयाणी, रा. इचलकरंजी** यांनी आमचे अशिल **वखारभाग नागरी सहकारी पतसंस्था मर्या. इचलकरंजी पत्ता वखारभाग इचलकरंजी** यांचेकडून स्थावर तारण कर्ज घेत आहेत. सबब वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही दावा, पोटगी अर्ज, मनाई दावा, बँक तारण, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, अथवा रजिस्टर करारपत्र अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आंत सदर नमुद संस्थेच्या पत्यावर लेखी कळवावे. मुदतीअंती कोणाची कसलीही तक्रार आमचे अशिल संस्थेवर बंधनकारक नसेल म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता. ०८/०६/२०२६ इ. रोजीचे

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**

**रा.१७/२९४,पुजारी मळा, इचलकरंजी, मो.नं. ९३२६०२२३८५**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

**१) मिळकतीचे वर्णन** :- जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले पैकी मुळची मौ. शहापूर येथील व सध्या काा इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या मिळकतीचा **क. ग.नं. २८६** यापैकी बिगरशेती **प्लॉट नं. १९** याचा **सि.स.नं. १८७१६** यापैकी देवू केलेले पश्चिम बाजूचे क्षेत्र **१३२.९५** चौ. मी. याचे **१४३०.५४ चौ.** फुटाची खुली जागा यांसी चतु:सिमा **पुर्वेस**–प्लॉट नं. १९ मधील शिल्लक मिळकत, **पश्चिमेस** – प्लॉट नं. २० व २१ ची मिळकत, **दक्षिणेस** – ९.१४ मीटर रुंदीचा रस्ता, **उत्तरेस**– गट नंबर २३२ ची मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकत ही **श्री.भारत तुकाराम गिडडे, रा. विक्रमनगर इचलकरंजी** यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून मिळकत विक्रीचा करार करुन दिलेला आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज, आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात)** दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे.म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. ०९/०६/२०२६ इ. रोजीचे.

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**

**रा.१७/२९४,पुजारी मळा, इचलकरंजी मो.नं. ९३२६०२२३८५**

## महालक्ष्मी अन्नछत्रात दोन लाख भक्तांनी घेतला भोजन प्रसादाचा लाभ

### राजू मेवेकरी

**कोल्हापूर,ता.९ (प्रतिनिधी)– उन्हाळी सुट्टीच्या निमित्ताने कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिर या ठिकाणी दर्शनासाठी भक्तांनी अलोट गर्दी केली.देशभरातून भाविक अंबाबाईच्या दर्शनासाठी आले होते.याच कालावधीमध्ये महालक्ष्मी अन्नछत्र येथे सुमारे २ लाख भाविकांनी मोफत भोजन प्रसादाचा लाभ घेतला असल्याची माहिती अन्नछत्राचे संस्थापक अध्यक्ष राजू मेवेकरी यांनी दिली.**

उन्हाळा कालावधीत भाविकांच्या सोयीसाठी महालक्ष्मी अन्नछत्रची वेळ दोन तास वाढवण्यात आली होती. मसाले भात, आमटी,मिक्स भाजी, गव्हाची खीर,ताक आदी पदार्थ ठेवण्यात आले होते. यासाठी मेवेकरी यांचे मार्गदर्शनाखाली ७५ कर्मचाऱ्यासह संजय जोशी,राजेश सुगंधी, एस. के. कुलकर्णी, विराज कुलकर्णी, ॲड.तन्मय मेवेकरी, सतीश सरनाईक, सुनील खडके, चंद्रशेखर घोरपडे,आदित्य मेवेकरी, अतिश जाधव, ऋतुराज सरनोबत, प्रथमेश कुलकर्णी, प्रतीक गुरव, रजत जोशी यांनी संयोजन केले. शिस्तबध्द, नेटके नियोजन यामुळे भक्तांनी समाधान व्यक्त केले. कपिलतीर्थ व्यापारी वर्गाचे विशेषे सहकार्य मिळाल्याचेही मेवेकरी म्हणाले.

## शिराळ्यात देशी भुईमूग बियाण्यांच्या दरात वाढ

**शिराळा,ता.९ (प्रतिनिधी)– शिराळा तालुक्यात पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावल्यानंतर खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. दमदार पावसामुळे भात, भुईमूग, सोयाबीन व कडधान्यांच्या पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून शेतकरी बियाणे खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी करत आहेत.**

विशेषतः देशी भुईमूग व कडधान्यांच्या बियाण्यांना मोठी मागणी वाढली आहे. शिराळा आठवडा बाजारात देशी भुईमूग बियाण्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून प्रतिपायली १ हजार ते १ हजार २०० रुपयांपर्यंत दर पोहोचले आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे २०० रुपयांनी वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू केली आहेत. माळरान भागात भुईमूग, सोयाबीन आणि कडधान्यांच्या पेरणीची लगबग वाढली आहे.

कमी कालावधीत उत्पादन देणाऱ्या आणि स्थानिक हवामानास अनुरूप असलेल्या देशी बियाण्यांना यंदा अधिक पसंती मिळत आहे.दरम्यान, पारंपरिक 'पसरा' व 'चित्रा' यांसारख्या भुईमूग वाणांची उपलब्धता कमी होत असल्याने शेतकऱ्यांना बियाणे मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. कृषी सेवा केंद्रांवर रासायनिक खते व बियाणे खरेदीसाठीही शेतकऱ्यांची गर्दी वाढली आहे.व्यापाऱ्यांच्या मते, देशी बियाण्यांची कमतरता कायम राहिल्यास पुढील काही दिवसांत दर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## सै.टाकळीत बारा बिगे शेत,रस्ते पाण्याखाली

**सै.टाकळी,ता.९ (प्रतिनिधी) शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील बळीराजा सध्या चिंतेत सापडला असून, गावच्या दक्षिण हद्दीतील भिमराव पाटील शेत ते दानवाड रस्ता आणि बाबासाहेब पाटील शेत या दोन प्रमुख पाणंद रस्त्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. पहिल्याच पावसात रस्त्यात पाणी साठले असून चिखलयुक्त रस्ते झाले आहेत.**

दरवर्षी जून ते डिसेंबर या तब्बल सहा महिन्यांच्या कालावधीत हे दोन्ही रस्ते पूर्णपणे चिखलात आणि पाण्यात बुडून जातात. परिणामी, मुख्य रस्त्यापासून स्वतःच्या शेतीकडे जाण्यासाठी शेतकऱ्यांना जीवघेणी कसरत करावी लागत असून, पिकांची वाहतूक करणे,खते-औषधे नेणे पूर्णपणे ठप्प होते. यामुळे शेतकऱ्यांची मोठी आर्थिक व मानसिक कुचंबणा होत आहे.

यंदाचा पावसाळा सुरू झाला असून शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकला आहे. पुढील सहा महिने येथे काम करणे अशक्य होणार आहे. सध्या शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आम्हाला आता पोकळ आश्वासने किंवा कागदी घोडे नकोत, तर हा रस्ता तातडीने आणि युध्दपातळीवर तयार हवा, अशी आक्रमक आणि आर्त हाक सैनिक टाकळीतील शेतकरी बांधवांनी दिली आहे.

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. १२० पैकी प्लॉट नं. ११ चे क्षेत्र-९२-० चौ. मी. खुली मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस- प्लॉट नं.१२ ची मिळकत, पश्चिमेस प्लॉट नं. १० ची मिळकत, दक्षिणेस-२० फुट रस्ता, उत्तरेस-गट नं. ११७ मधिल राजाराम चव्हाण यांची मिळकत येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही सौ. सुनिता अजय सिंह रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे तोंडी ठरवले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणुन दिली नोटीस सही

ता. ०८/०६/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**

**पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो. ७८२०९०९७०५**

## खरेदी करार नोटीस

मिळकतीचे वर्णनः- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मौजे शहापूर येथील क.ग.नं. ९७ मधील गुंठेवारी बिगरशेती झालेला प्लॉट नंबर ३५ चे क्षेत्र १४६-५० चौ. मी. ची खुली जागा मिळकत असून यास सि.स. नंबर १८६३२/३५ असा असून यासी चतुःसिमा पूर्व -३० फुटाचा रस्ता, पश्चिम- पाटील यांची मिळकत, दक्षिण प्लॉट नंबर ३४ ची तेली यांची मिळकत, उत्तर-रस्ता असून सदरची मिळकत ही सुजाता दिपक पाटील यांच्या मालकीची असून ती त्यांनी आमच्या पार्टीस करारपत्राने लिहून दिलेली आहे व त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. सदर मिळकती बाबत कोणाचा कांहीही हक्क, हित संबंध, दावा, तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी तक्रारी नोंदवावी. म्हणून दिली नोटीस.

दि.०९/०६/२०२६

**विश्वनाथ कृष्णा घाटगे**

**१०/५६३, विक्रमनगर, इचलकरंजी. मोबा.नं.९८२३४५८५८५.**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

**मिळकतीचे वर्णन:**–जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी मुळची **कबनूर** येथील व सध्या **काा इचलकरंजी महानगरपालिका** हद्दीत समाविष्ट झालेल्या **व दि. यशवंत को. ऑप. प्रोसेसर्स कामगार सह. गृहनिर्माण संस्था इचलकरंजी** मधील मिळकतीचा सि.स.नं. २५२४० क्षेत्र २५४.२० चौ.मी यापैकी मालकीचे क्षेत्र १२७.१० चौ. मी. याचे १३६७.५९ चौ. फुटाची खुली जागा व यामधील आर सी सी इमारत मिळकत याचा वार्ड नं. १९/५७७ याचा नवीन मालमत्ता नं. १९३०००७२५ असून यामधील लाईट, पाणी कनेक्शनसह याचा प्लॉट नं.८९/अ यांसी चतुः सिमा–**पुर्वेस** – शाळेचे मैदान, **पश्चिमेस** – प्लॉट नं.८९/ब ची श्री खंडेलवाल यांची मिळकत, **दक्षिणेस** – श्री देसाई यांची मिळकत, **उत्तरेस** – २० फुट रुंदीचा रस्ता.

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री **मधुकर आकाराम तोरणे, श्री सदाशिव आकाराम तोरणे, शारदा गजानन तोरणे, रा. यशवंत कॉलनी इचलकरंजी व श्रीमती ज्योती संजय करडे, रा. एस. पी. रोड मुंबई** यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून मिळकत विक्री करणेचे ठरले आहे. सबब, वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज, आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात)** दिवसाचे आंत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे.म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. ०९/०६/२०२६ इ. रोजीचे.

**ॲड.सुनिल सु.धुपदाळे**

**रा.१७/२९४,पुजारी मळा, इचलकरंजी मो.नं. ९३२६०२२३८५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :**– जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील व सध्या इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ झालेली मिळकत याचा गट नं. १३३/अ/१/१ यातील प्लॉट नं. ३ पैकी ४७२ चौ. मी. ची जागा यासी चतु:सीमा पूर्वेस – प्लॉट नं. ३ मधील प्रदीप रांदड यांची मिळकत, पश्चिमेस – ओपन स्पेस, दक्षिणेस – सरकारी रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. ४ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसीमेतील मिळकत त्यातील तदंगभुत वस्तूसह, इजमेंटरी हक्कांसह आणि त्यातील म्युनिसिपल घर नं. २० / ७३६ याचा नविन मालमत्ता क्र. २०३०००९७७ चे इमारतीसह. सदरची मिळकत शहापूर कबनूर विस्तारीत मधील सि. स. नं. २३९८८ पैकी आहे.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत नानासो रामचंद्र भोसले यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत रूक्काबाई श्रीपती मोन्नाप्पा वगैरे यांचेकडून मे. दुय्यम निबंधक इचलकंरजी यांचेकडे अनुक्रमांक १०८५ दि. १६/०५/१९८९ चे नोंद खरेदीपत्राने खरेदी केली असून सदर मिळकत मे. जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचेकडील आदेशाने बिगरशेती झालेली असून त्याचे रेखांकन टाऊन प्लॅनर इचलकरंजी नगरपालिका यांचेकडील नंबर ३९५ दि. १५/०८/१९८९ नुसार मंजूर झाले आहे. नानासो रामचंद्र भोसले यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेची ठरवुन आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत विक्री योग्य असल्याचा आणि ती युको बँक शाखा इचलकरंजी यांच्या तारण बोजाखेरीज निर्वेध व निष्कर्जी असल्याचा तसेच त्यावर कोणताही करार, नसुन तिच्यासंबंधी कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात वाद प्रलंबित नसल्याचा आणि मिळकत जप्ती / मनाई यापासुन मुक्त असल्याचा निर्वाळा मिळकतीचे मालकांकडुन देणेत आला आहे. तथापि सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, वाटणी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, रस्ता, अतिक्रमण अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकीलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल सदर मिळकतीबाबतचे खरेदीचे कायदेशीर व्यवहार / दस्त पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी

ता. ०९/०६/२०२६.

**ॲड. स्वानंद मुकुंद कुलकर्णी**

**स्वानंदगंध ६/११२६, परमार्थ निकेतन मागे, सांगली रस्ता, इचलकरंजी. मोबाईल नं. ९४२२०४४८०५**

# लग्न,यात्रांमध्ये साऊंड सिस्टीमचा सर्रास वापर

## तरूणाईकडून परंपरेला छेद; पोलीस प्रशासन व पालकांनी लक्ष देण्याची गरज

वारणानगर,ता.९(इंद्रजीत पाटील)–

**ग्रामीण भागात यात्रा, लग्न व वाढदिवसानिमित्ताने डॉल्बीचा मोठ्या प्रमाणात वापर चालू आहे. लग्न व यात्रांची परंपरा जपण्याऐवजी तरुणाई लग्न व यात्रांना विद्रूपीकरणाचे स्वरूप आणत आहे. विविध मंडळांच्यावतीने साऊंड सिस्टीमच्या ईर्षेने दणदणाट करून कार्यक्रमाचा बेरंग सुरू आहे.**

पूर्वीपासून यात्रा,पारंपारिक उत्सव म्हणून साजरी केली जायची. पै–पाहूणे, मित्रमंडळी, माहेरवाशिण या सर्वांना एकत्र आणण्याचा हा उद्देश होता. दुसरा उद्देश म्हणजे ग्रामदेवतेचा वर्षातून एकवेळ धार्मिक उत्सव साजरा करणे असा होता.तसेच लग्न कार्यक्रमही विधीवत पध्दतीने मोठ्या थाटामाटात लावली जात असत.



जोपर्यंत जाणत्या कारभाऱ्यांच्या हातात कारभार होता, तोपर्यंत त्यांच्या धाकात कार्यक्रम पारंपारिक पद्धतीने साजरा केला जायचा. आता हा कारभार अपवाद वगळता तरुणाईने अनधिकृतपणे हातात घेतला आहे. त्यांना आई–वडिलांचा धाक राहिलेला नाही, तिथे कारभाऱ्यांचं कोण ऐकणार?

गावातील मंडळांच्यात साऊंड सिस्टिमच्या दणदणाटाची जणू ईर्षाच लागते. अनेक मंडळे परवानगी घेत नाहीत. कर्णकर्कश आवाज, त्यात काहीजण नशेत धुंद होऊन नाचत असतात. यात्रेसारख्या सार्वजनिक धार्मिक कार्यक्रमात गाणी हिडीस फिडीस लावण्याचे विदारक चित्र पाहण्यास मिळते. यात काही अतिउत्साही तरुण गाडीच्या पुंगळ्या काढून गल्लीबोळातून रेस करून विनाकारण फेऱ्या मारत असतात. यामध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश जास्त आहे.त्यामुळे देशाचे भवितव्य वेगळ्या वळणावर जात आहे. याची भीती समाजातून व्यक्त केली जात आहे.

काही तरुण तर वाढदिवसाच्या निमित्ताने मध्यरात्रीस डॉल्बी लाऊन मोटर सायकलच्या पुंगळ्या काढून गल्लीबोळातून रेस करून फेऱ्या मारताना दिसून येतात.काही तरुणांनी जुन्यागाड्यांमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज येतील अशा गाड्या बनवून घेतल्या आहेत. ग्रामीण भागात रात्री वाढदिवस साजरा करण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यात भरीस भर म्हणून फार्म हाऊस हि मोठ्या संख्येने झाल्याचे दिसून येत आहेत. अशा ठिकाणीच तरुण नशेत धुंद होऊन त्यांच्याकडून नकोसे प्रकार घडतात.याच्या समुळ उच्चाटसाठी पोलीस प्रशासन व पालक मंडळींनी लक्ष देऊन तरुणाईस यापासून प्रावृत्त केले पाहिजे.

### पोलिसांचा धाक हवा

साऊंड सिस्टिमचा दणदणाट चालू ठेवणे, हा कायद्याने गुन्हा असला तरी याकडे मात्र राजकीय दबावापोटी डोळेझाक केली जाते.बिघडत चाललेल्या परिस्थितीवर पोलिसांनी नियंत्रण आणणे गरजेचे आहे अन्यथा साऊंड सिस्टिमच्या दणदणाटात बेधुंद होऊन नाचताना तरुणांच्या वादाच्या घटना गावोगावी घडताना पहायला मिळत आहेत.

# शेतकऱ्यांना नियंत्रित दरात खत पुरवठा करावा

## शेतकरी कामगार पक्षाची मागणी

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)–

**जीवनावश्यक वस्तुंचे दर सर्व सामान्य जनतेच्या आवाक्या बाहेर गेले आहेत. तेव्हा सरकारने जीवनावश्यक वस्तुंचे दर कमी करावे.शेती हंगामाच्या वेळी शेतकऱ्याला खतांची टंचाई जाणवत आहे. ती टंचाई दूर करून शेतकऱ्यांना नियंत्रित दरात खत पुरवठा करावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने शासनाकडे करण्यात आली.**

केंद्र आणि राज्य सरकारच्या काळात दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. या वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचं जगणं कठीण झालयं. ही वाढती महागाई कमी करा,यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस बाबुराव कदम यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार नम्रता चौगुले यांची भेट घेतली. केंद्र आणि राज्य सरकारने वाढती महागाई नियंत्रणात आणावी,अशी मागणी केली. डिझेल, पेट्रोल, गॅस, तांदूळ, गहू, ज्वारी, कडधान्य, खाद्य तेल यांचे दर नियंत्रित ठेवावे.रेशन धान्य नियमाप्रमाणे वाटप होत नाही त्यामध्ये नियमितता असावी. शाळांना दिले जाणारे मध्यान्ह भोजनामध्ये फक्त सुका भात दिला जातो त्या बरोबर डाळआमटी दिली जावी,अशी मागणी शेतकरी कामगार पक्ष शहर कार्यालय यांच्याकडून केली. मागणीचे निवेदन नायब तहसीलदार नम्रता चौगुले यांना देण्यात आले. गीता कदम, वैशाली सुर्यवंशी,प्रिया जाधव, शीतल पोहाळकर, दिलीपकुमार जाधव, संग्राम माने, प्रकाश शिंदे, रंगराव पाटील,मोहन पाटील, चंद्रकांत सुर्यवंशी,इकबाल शेख, सुभाष मोहिते, आनंद पोवाळकर उपस्थित होते.



नायब तहसिलदार नम्रता चौगुले यांना निवेदन देताना शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

# मधुकर फरांडे यांना कथा परिमल राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

कबनूर,ता.९–



**येथील साहित्यिक, कवी, गीतकार, कथाकार मधुकर फरांडे यांना तेजश्री प्रकाशन, इचलकरंजी यांनी प्रकाशित केलेल्या 'कोंडी' या कथासंग्रहास परिमल सांस्कृतिक व्यासपीठ, रोपळे, बुद्रुक (ता.पंढरपूर) यांच्यावतीने 'कथा परिमल राज्यस्तरीय पुरस्कार ' जाहीर झाला आहे.**

या अगोदर 'कोंडी' या कथासंग्रहास सहा राज्यस्तरीय पारितोषिक मिळेलेली आहेत. परिमल सांस्कृतिक व्यासपीठ, पंढरपूर यांचे मार्फत देण्यात येणारा 'कथा परिमल' राज्यस्तरीय पुरस्कार शनिवार ता.१३ जून २०२६ रोजी पंढरपूर येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.



# खुपीरे ग्रामीण रुग्णालयात ट्रू-नॅट मशीनचे लोकार्पण

कोपार्डे,ता.९(प्रतिनिधी)–

**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय, खुपीरे येथे प्रयोगशाळा विभागात नव्याने उपलब्ध झालेल्या अत्याधुनिक ट्रू–नॅट मशीनचे उद्घाटन करवीरचे आम.चंद्रदीप नरके यांच्या हस्ते संपन्न झाले.**

उपस्थित मान्यवरांचे स्वागत वैद्यकीय अधीक्षक डॉ. मृणालिनी पाटील यांनी केले.या कार्यक्रमाला जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.हर्षला वेदक, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.उत्तम मदने, निवासी वैद्यकीय अधिकारी,सीपीआर.डॉ.रेश्मा पाटील,डॉ.विठ्ठल पाटील, डॉ.धनंजय पाटील,प्रयोगशाळा तंत्रज्ञ शीतल सुतार, अविनाश पिसाळ, ज्योती पुदाले,धनंजय परीट, विशाल मिरजकर यांच्यासह संजय डी.पाटील, संजय पाटील,तानाजी पाटील,शिवाजी गुरव,नितीन भोसले, ग्रामीण रुग्णालय खुपीरे येथील अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हा क्षयरोग विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# कवी बाळासाहेब तोरस्कर यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)–

**सोळांकुर येथील ज्येष्ठ कवी बाळासाहेब तोरस्कर यांना कोकण दीप मासिकाच्या वतीने दिला जाणारा यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.**



तोरस्कर गेली अनेक वर्षे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय, प्रेरणादायी व समाजाभिमुख साहित्यनिर्मिती, समाजकार्य व पत्रकारिता आदी बाबींचा विचार करून त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.या पुरस्कार सोहळ्याचे वितरण ता.१४ जूनला प्राध्यापक सुरेंद्र गावस्कर सभागृह, मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर येथे करण्यात येणार आहे. त्यावेळी त्यांना हा मानाचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.सदर पुरस्कार निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# शिक्षकांच्या समस्येचे शिक्षण अधिकाऱ्यांनी निर्गतीकरण करावे

## आम.जयंत आसगावकर

बोरपाडळे,ता.९(प्रतिनिधी)–

**आज शिक्षणक्षेत्र अनेक समस्यांच्या गर्तेत सापडले आहे. एक समस्या सोडवताना दुसऱ्या अडचणी समोर असतात. माध्यमिक शिक्षण विभागामध्ये वरिष्ठ आणि निवड श्रेणी तसेच बदली प्रस्ताव प्रलंबित आहेत यामागे कारकूनी करामत आहे याकडे माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी सजगतेने लक्ष देवून प्रलंबित प्रस्तावांचे निर्गतीकरण करावे असे प्रतिपादन शिक्षक आम.जयंत आसगावकर यांनी केले.**

कोल्हापूर जिल्हा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्यावतीने वारणानगर येथील डॉ.विनय कोरे सांस्कृतिक भवन येथे आयोजित वार्षिक कृतिसत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले. अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष राहुल पवार हे होते.

आमदार आसगावकर पुढे म्हणाले की, अनाधिकृत शाळांची यादी शिक्षण अधिकाऱ्यांनी विनाविलंब जाहीर करावी.शाळेतील अॅकॅडमीग्रस्त विद्यार्थ्यांचाही त्यांनी शोध घेवून त्यावर निर्बंध आणावयास हवेत . गरज असेल तिथेच शाळा हे धोरण शासनाने अवलंबावे यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.याशिवाय आमदार म्हणून काम करताना एक कॉल, प्रॉब्लेम सॉल्व्ह हीच भूमिका यापुढे राहील, असे सांगितले. माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत यांनी मुख्याध्यापक संघाचा हा स्तुत्य उपक्रम असून कामाच्या विकेंद्री करणाकडे आपण जातीने लक्ष देणार असल्याचे सांगितले. कृतीसत्राच्या पहिल्या सत्रात कृती समितीचे बाबा पाटील, विनाअनुदान प्रश्नासाठी लढणारे खंडेराव जगदाळे, संचालक बी.बी.पाटील, सचिव आर.वाय.पाटील यांनीही विविध विषयांवर आणि समस्येवर मार्मिक विधान केले. प्रारंभी रोपास पाणी देवून कृतीसत्रास प्रारंभ झाला. स्वागत व प्रास्ताविक उपाध्यक्ष मिलिंद पांगिरकर यांनी केले.

यावेळी विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संघाचे पदाधिकारी रविंद्र मोरे, सुरेश संकपाळ, श्रीकांत पाटील, के.के.पाटील, डॉ.डी.एस.घुगरे, बी.जी.बोराडे, संजय डी.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी आमदार डॉ. विनय कोरे तसेच जिल्हापरिषदेच्या शिक्षण व अर्थ समितीच्या सभापती शितल यादव यांनी सदिच्छा भेट दिली.

# महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तंत्रज्ञानस्नेही बनावे-काटकर

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)–

**महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी तंत्रज्ञानस्नेही बनत वीज ग्राहकांप्रती कर्तव्याचे पालन करताना 'ग्राहक देवो भव:' हे सूत्र जपावे, असा सल्ला महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर यांनी महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दिला.**

या कार्यक्रमास कोल्हापूर मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता गणपत लटपटे, पायाभूत आराखडा विभागाच्या अधीक्षक अभियंता पुनम रोकडे, कार्यकारी अभियंते अभिजीत सिकनीस, म्हसू मिसाळ, दत्तात्रय भणगे, अजित अस्वले, निलेश चालिकवार, संगणक प्रणाली विश्लेषक बाळकृष्ण पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर, जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले प्रामुख्याने उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना अधीक्षक अभियंता गणपत लटपटे म्हणाले, ग्राहक सेवेत व कंपनीच्या प्रगतीत सर्व घटकांचे योगदान आहे. कोल्हापूर जिल्ह्याची देयक क्षमता राज्यात अव्वल आहे. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात ७१ कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन पंकज गोंजारी यांनी केले.

# मिळकत धारकांनी सवलत योजनेचा लाभ घ्यावा–चल्लावाड

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)–

**महानगरपालिकेच्या घरफाळा विभागाच्यावतीने नागरिकांनी घरफाळा रक्कम भरणा केल्यास महापालिका करामध्ये ६ टक्के सूट जाहीर केली आहे. त्यानुसार सोमवारी ता.८ जून २०२६ रोजी २०१३ मिळकतधारकांनी ६ टक्के सवलत योजनेचा लाभ घेवून १ कोटी १८ लाख ७ हजार ७९ रुपये इतकी रक्कम जमा करुन सवलत योजनेचा लाभ घेतल्याची माहिती कर निर्धारक व संग्राहक सुधाकर चल्लावाड यांनी दिली.**

तसेच, ता.१ एप्रिल ते ता.८ जून २०२६ या कालावधीत ६ टक्के सवलत योजनेचा लाभ घेणाऱ्या मिळकतधारकांची संख्या ३६,०३७ एवढी असून त्यामधून रु.१६ कोटी १८ लाख इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा झालेली आहे. अजूनही १,३४,९६३ एवढ्या मिळकतधारकांनी चालू आर्थिक वर्षामधील घरफाळा भरणा केलेला नाही. कोल्हापूर महानगरपालिकेच्यावतीने ज्या मिळकतधारकांनी अद्यापही घरफाळा भरणा केला नसेल त्यांनी कोल्हापूर महानगरपालिका सर्व नागरी सुविधा केंद्र सकाळी ९ ते दुपारी ४:३० या कालावधीमध्ये आपला घरफाळा भरावा,असे आवाहनही श्री.चल्लावाड यांनी केले आहे. तसेच, नागरिकांच्या सोईसाठी गुगल पे, फोन पे, पेटीएम व महानगरपालिका संकेत स्थळावरुन सुध्दा ऑनलाईन रक्कम भरणा करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे घरफाळा विभागीय कार्यालयामधील व नागरी सुविधा केंद्र मधील किओस्क मशिनव्दारे ऑनलाईन रक्कम भरणा करण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तरी शहरातील सर्व मिळकतधारकांनी ता.३०जून २०२६ अखेर आपली सन २०२६–२७ चालू आर्थिक वर्षाची घरफाळ्याची रक्कम भरुन ६ टक्के सवलत योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कर निर्धारक व संग्राहक सुधाकर चल्लावाड यांनी केले आहे.

# तुकाराम मुंडे यांना नियोजित कार्यकाल पूर्ण करू द्यावा

## जनहितवादी संघटनांची मागणी

शिरगाव,ता.९(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना नियोजित कार्यकाल पूर्ण करण्याची संधी द्यावी,अशी मागणी महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते व जनहितवादी संघटनांकडून करण्यात आली आहे.**



अन्न व औषध प्रशासन विभाग हा नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित महत्त्वाचा विभाग असून अन्न भेसळ, बनावट औषधे व ग्राहकांच्या आरोग्य संरक्षणासाठी प्रभावी कारवाई करणे ही विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली विभागात पारदर्शकता, शिस्त आणि जनहिताभिमुख प्रशासनाला चालना मिळत आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.महाराष्ट्र शासकीय कर्मचारी बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणारा विलंब प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार प्रशासनात स्थैर्य राखणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या विभागात सुरू असलेल्या सुधारणा व कार्यवाह्यांना सातत्य मिळावे,यासाठी कार्यकाल पूर्व बदली टाळण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात ईमेल प्रणालीद्वारे राष्ट्रपती, राज्यपाल, पंतप्रधान, मुख्यमंत्री व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना जनहित निवेदन सादर करण्यात आले आहे. अशी माहिती जनकल्याण फौंडेशनचे राज्य सदस्य अतुल महादेव पाटील यांनी दिली आहे.

श्रीहरी
शुक्रवार, ता. ०५/०६/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
रात भर प्यार
सायं. ७ वा.
गरम सांसे
A
प्रौढांसाठी


श्रीदत्त
शुक्रवार, ता. ५ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
नेकेड सिन
A फक्त प्रौढांसाठी A















# ढेबेवाडी विभागावर पाणीटंचाईचे संकट गडद

## मराठवाडी,महिंद,साखरी धरणाने गाठला तळ : नागरिकांची पायपीट

ढेबेवाडी,ता.९(प्रतिनिधी)–

**ढेबेवाडी विभाग सध्या पाणीटंचाईच्या छायेखाली सापडला असून, येणाऱ्या काही दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. वांग–मराठवाडी, महिंद आणि काळगांव परिसरातील साखरी या धरणांनी तळ गाठल्यामुळे पाण्याचा साठा संपुष्टात आला आहे. विहिरी, कूपनलिका, ओढे–नाले कोरडे पडले असून, गावागावांत पाण्यासाठी लोकांना झगडावे लागत आहे.**



पाटण तालुक्यातील वांग मराठवाडी धरणातील पाण्याने तळ गाठला असून पाणीटंचाई तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. (छाया–महेश जाधव)

डोंगराळ आणि दुर्गम वाल्मिकी पठार व परिसरात पाणीटंचाईची तीव्रता अधिकच जाणवते. सकाळ होताच महिलांच्या डोक्यावर घागरी आणि हांडे घेऊन पाण्यासाठी सुरू होणारी पायपीट ही रोजचीच आहे. दोन–तीन किलोमीटर अंतर चालूनही पाणी मिळत नाही.शेतीची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत चालली आहे. हिरवळ नष्ट होऊन शेतात करपलेली पिके उभी आहेत. शेतकऱ्यांच्या हातातले पीक निसटत असून, कष्टाचे मोल मिळणार की नाही, याचीही शाश्वती नाही.जनावरांसाठी पाणी आणि चारा या दोन्हींचा तुटवडा निर्माण झाला आहे. ओला चारा आधीच संपला असून, सुका चाराही दुर्मिळ झाला आहे.तहानेने व्याकुळ झालेली जनावरे इकडून तिकडे भटकताना दिसत आहेत.

जंगलातील रानटी प्राणीही पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे वळू लागले आहेत.बिबटे,रानडुक्कर यांसारख्या प्राण्यांची हालचाल वाढली असून, त्यामुळे गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी पाळीव जनावरांवर हल्ल्यांच्या घटनाही घडत आहेत. पाण्याच्या एका प्रश्नाने मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष तीव्र होत चालला आहे. पर्यावरणीय समतोलही ढासळताना दिसत आहे. पक्षी पाण्याच्या शोधात गावाकडे धावत असून, पाण्याअभावी त्यांची तडफड सुरू आहे. अनेक ठिकाणी पक्ष्यांचे मृत्यूही होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. निसर्गाची ही हाक दुर्लक्षित करता येणार नाही यावर उपाययोजना होणे गरजेचे आहे.

> **'दिवसेंदिवस ढेबेवाडी विभागातील परिस्थिती अत्यंत गंभीर होत आहे. पाण्याविना जीवन ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. शासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असून, नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करण्याची जबाबदारी ओळखली पाहिजे. अन्यथा येणारा काळ अधिकच भयावह ठरू शकतो.'**
> **–जगन्नाथ विभुते,**
> अशासकीय सदस्य पुणे परिषद.



चांदोली धरणात सध्या समाधानकारक पाणीसाठा शिल्लक आहे.

# चांदोली धरणात ११.९७ टीएमसी पाणीसाठा

चांदोली,ता.९(वार्ताहर)–

**चांदोली धरणाच्या नव्या तांत्रिक वर्षाला १ जूनपासून सुरुवात झाली असून तांत्रिक वर्षाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३१ मे रोजी धरणात १३.३३ टीएमसी म्हणजेच ३८.७५ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक होता त्यातील गेल्या आठ दिवसात धरणातील १.३६ टीएमसी पाण्याचा वापर झाला असून मंगळवार ता.९ रोजी चांदोली धरणात ११.९७ टीएमसी म्हणजेच ३४.८० टक्के इतका समाधानकारक पाणीसाठा शिल्लक होता.**

चांदोली धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता ३४.४० टीएमसी असून सध्या धरणात ११.९७ टीएमसी म्हणजेच ३३९.०३ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा शिल्लक असून त्यातील ५.०९ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे तर उर्वरित ६.८८ टीएमसी म्हणजेच १८.५० टक्के हा मृत संचयी साठा आहे त्यामुळे चांदोली धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी आणखी २२.४३ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. पावसाचे आगर म्हणून संबोधल्या जाणाऱ्या चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दरवर्षी सरासरी तीन ते चार हजार मिलिमीटर पाऊस पडतो यावर्षी जूनचा दुसरा आठवडा उजाडला तरीही चांदोली परिसरात पावसाने ओढ दिली आहे त्यामुळे धरणातील पाणी पातळी हळूहळू कमी होऊ लागली आहे. सध्या धरणाची पाणी पातळी ५९८.९० मीटर इतकी आहे.

### पावसाने ओढ दिल्याने पाणीपातळीत हळूहळू घट

# वीज कपातीच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांमधून संताप

मसूर,ता.९(प्रतिनिधी)–

**यंदा उष्णतेचा पारा दिवसेंदिवस वाढतच आहे. पावसाने ओढदिल्याने त्यात आणखी भर होत आहे. अशातच महावितरणने कृषीपंपाच्या वीजपुरवठ्यात भारनियमन केल्याने पिके कशी जगवायची, या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. त्यामुळे मसूर परिसरातील शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.**

पूर्वी कृषीपंपांना रात्रीच्या वेळी सलग १० तास वीजपुरवठा केला जात होता. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पुरेसे पाणी देता येत होते. मात्र, दोन वर्षांपूर्वी प्रशासनाने यामध्ये कपात करत वीजपुरवठा आठ तासांवर आणला. आता २६ मे २०२६ पासून महावितरणने पुन्हा एकदा विजेचा कालावधी घटवून तो केवळ सहा तासांवर आणला आहे.सध्या कडक उन्हाळ्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. अशा स्थितीत पिकांना दररोज किंवा एक दिवसाआड पाण्याची गरज असते. सहा तासांच्या तोकड्या वीजपुरवठ्यामुळे संपूर्ण क्षेत्राला पाणी देणे अशक्य बनले आहे. परिणामी, शेतातील पिके वाळून जाण्याच्या स्थितीत आहेत. विशेषतः ऊस, भाजीपाला आणि फळबागा यांसारख्या बागायती पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.महावितरणने हा अन्यायकारक निर्णय त्वरित मागे घऊन वीजपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# सेवा ज्येष्ठतेनुसार शिक्षकांना पदोन्नती द्यावी

### जुनी पेन्शन संघटनेची मागणी

सांगली,ता.९(प्रतिनिधी)–

**जिल्हा परिषदेच्या शिक्षक पदोन्नती प्रक्रियेत सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी आणि टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी २०२८ पर्यंत मुदतवाढ देऊन सशर्त पदोन्नती द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील सविस्तर निवेदन सांगली जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण समिती सभापती ऋषिकेश लाड यांना देण्यात आले.**

संघटनेने निवेदनात म्हटले आहे की, सध्या सुरू असलेल्या पदोन्नती प्रक्रियेत केवळ १ सप्टेंबर २०२५ रोजी टीईटी उत्तीर्ण असणाऱ्याच शिक्षकांना न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेत पात्र ठरवले जात आहे. परंतु सेवेत आधीपासूनच असलेल्या जुन्या शिक्षकांना टीईटी बंधनकारक करू नये, अशी शिक्षकांची रास्त मागणी होती. सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय होऊ नये म्हणून संघटनेने प्रशासनासमोर काही महत्त्वपूर्ण मागण्या केलेल्या आहेत. यामध्ये सध्या होणाऱ्या पदोन्नती या निव्वळ सेवाज्येष्ठतेच्या आधारावरच देण्यात याव्यात, पदोन्नती मिळालेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी न्यायालयाच्या निर्णयानुसार २०२८ पर्यंतची मुदत (अट) घालण्यात यावी, जे शिक्षक २०२८ पर्यंत टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकणार नाहीत, त्यांना पदावनत करून त्यांच्या मूळ पदावर पाठवावे. तसेच, त्या रिक्त जागांवर त्यावेळी उपलब्ध असलेल्या टीईटी धारक शिक्षकांची नियुक्ती करावी. यासाठी पदोन्नती स्वीकारणाऱ्या शिक्षकांकडून आधीच ना हरकत प्रमाणपत्र लिहून घ्यावे या मागण्यांचा समावेश आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, जिल्हा सचिव स्वप्निल मंडले, जिल्हा संघटक मिलन नागणे, जिल्हा उपाध्यक्ष अझरुद्दीन जमादार आणि मिरज तालुका अध्यक्ष रमेश मगदूम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

> **शिक्षण संचालकांचे आदेश आवश्यक**
> शिक्षण संचालक यांचे आदेशानुसार १ सप्टेंबर २०२५ अखेर जे शिक्षक टीईटी पास आहेत, अशांचा समावेश ज्येष्ठता यादीत केला आहे. त्यानंतर पास झालेल्यांबाबत शिक्षण संचालकांनी स्वतंत्र आदेश, निर्देश देणे गरजेचे आहे. २०२८ पर्यंत टीईटी परीक्षा पास होण्यास मुदत ही सवलत सेवेसाठी आहे, पदोन्नतीसाठी नाही. पदोन्नतीसाठी टीईटी आवश्यकच आहे.
> **–मोहन गायकवाड, प्राथमिक शिक्षणाधिकारी सांगली जिल्हा परिषद.**



आष्टा: समीर गायकवाड यांचा सत्कार करताना प्रा.व्ही.एस.देवकाते,समवेत अन्य मान्यवर.

# महात्मा गांधी विद्यालयाच्यावतीने समीर गायकवाड यांचा सत्कार

आष्टा,ता.९(प्रतिनिधी)–

**रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या व्यवस्थापन परिषदेच्या दक्षिण विभाग सांगली विभागीय समन्वय समितीच्या सदस्यपदी आष्टा येथील समीर ईश्वरा गायकवाड यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल आष्टा येथील महात्मा गांधी विद्यालयाच्यावतीने समीर गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.**

यावेळी समीर गायकवाड म्हणाले, रयत शिक्षण संस्थेने माझ्यावर दिलेली ही जबाबदारी मी अत्यंत निष्ठेने पार पाडेन. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवणे हेच माझे मुख्य ध्येय असेल. प्राचार्य व्ही.एस.देवकाते म्हणाले, समीर गायकवाड यांच्यासारख्या अभ्यासू नेतृत्वाची निवड रयतच्या विभागीय समितीवर होणे,ही आष्टा शहरासाठी अभिमानास्पद बाब आहे.त्यांच्या मार्गदर्शनामुळे सांगली जिल्ह्यातील रयतच्या शाळांना अधिक बळकटी मिळेल.यावेळी पर्यवेक्षक आर.बी.पाटील, बाबासाहेब सिद्ध आदी उपस्थित होते.

# शिराळा पोलीस स्टेशनसमोर युवासेनेचे आंदोलन

## कृषी पंप केबल चोरीप्रकरणी प्रशासनाविरोधात संताप

शिराळा,ता.९(प्रतिनिधी)–

**शिराळा तालुक्यातील मोरणा धरणकाठ परिसरासह विविध भागांत सुरू असलेल्या कृषी पंपांच्या केबल चोरीच्या घटनांविरोधात युवासेना शिराळा तालुक्याच्या वतीने शिराळा पोलीस स्टेशनसमोर 'कुंभकर्ण आंदोलन' करण्यात आले. चोरीच्या घटनांचा अद्याप उलगडा न झाल्याने आणि शेतकऱ्यांचे नुकसान थांबत नसल्याने संतप्त शिवसैनिकांनी प्रशासनाला जाग आणण्यासाठी हे आंदोलन छेडले.**

मोरणा धरणकाठावरील तडवळे,पाडळी,पाडळीवाडी, उपवळे,कदमवाडी,मांगले, गिरजवडे धरण परिसरासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून विद्युत मोटारींच्या केबल चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. तहसीलदार कार्यालयाजवळ शिवसैनिकांनी एकत्र येत जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर आंदोलकांनी शिराळा पोलीस स्टेशनच्या आवारात प्रवेश केला.

दरम्यान, शिराळ्याचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर पोलीस निरीक्षक जंबाजी भोसले यांना निवेदन देऊन आंदोलन स्थगित करण्यात आले.



पो.नि.जंबाजी भोसले यांना निवेदन देताना युवासेना पदाधिकारी.

या आंदोलनात युवासेना तालुका प्रमुख ॲड. स्वप्नील पाटील, नगरसेवक राजसिंह पाटील, अवधुत गायकवाड, ओमकार गायकवाड, स्वप्नील निकम, यश परदेशी, शैलेश चौगुले, दत्ता लोहार आदी उपस्थित होते.

# बदलत्या वातावरणाशी निगडित शेती करावी-डॉ.संग्राम धुमाळ

कराड,ता.९(प्रतिनिधी)–

**बदलत्या हवामानामुळे शेतीपद्धतीत बदल करून स्थानिक हवामानाशी सुसंगत आणि बाजारपेठेत मागणी असलेल्या पिकांकडे शेतकऱ्यांनी वळणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण शासकीय कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.संग्राम धुमाळ यांनी केले.**

कृषी संशोधन केंद्र, कराड आणि यशवंतराव चव्हाण शासकीय कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या खरीपपूर्व बैठक व चर्चासत्रात ते बोलत होते. या कार्यक्रमास कृषी संशोधन केंद्राच्या प्रमुख डॉ.राणी निंबाळकर, मंचाचे अध्यक्ष आत्माराम पाटील, डॉ. कैलास काळे,सहाय्यक कृषी अधिकारी विनोद पुजारी, मंडल कृषी ओंकार बर्गे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

डॉ.धुमाळ म्हणाले, हवामान बदलाचा परिणाम शेतीवर होत असल्याने पारंपारिक पिकांसोबत नावीन्यपूर्ण व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पिकांचा विचार करणे गरजेचे आहे. शेतकरी–शास्त्रज्ञ मंच हा संशोधन संस्था आणि शेतकरी यांच्यातील महत्त्वाचा दुवा असून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी याची भूमिका महत्त्वाची आहे. पर्यावरण संवर्धनाबाबत बोलताना त्यांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.

### हिंदू एकता सांगली शहर अध्यक्षपदी अनिरुद्ध कुंभार

सांगली,ता.९(प्रतिनिधी)–

**हिंदू एकता आंदोलन सांगलीच्या शहर अध्यक्षपदी अनिरूध्द कुंभार यांची निवड करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष माजी आ. नितिन शिंदे यांनी या निवडीची घोषणा केली.**

हिंदू एकता आंदोलन कार्यालय, कोल्हापूर येथे हिंदू एकता आंदोलन संघटनेची प्रांतिक बैठक पार पडली. या बैठकीमध्ये अनिरुध्द कुंभार यांची सांगली शहर अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र कार्याध्यक्ष विनायक पावसकर, चंद्रकांत जिरंगे, सांगली जिल्हाध्यक्ष संजय जाधव, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष दीपक देसाई, कोल्हापूर शहराध्यक्ष गजानन तोडकर, दत्तात्रय भोकरे,सोमनाथ गोटखिंडे, दिग्विजय शिंदे,श्रीकांत पोडकर, राहुल यादव, कराड शहराध्यक्ष प्रकाश जाधव तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंबेनळी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना ८ लाखांची मदत

सातारा,ता.९(प्रतिनिधी)–

**महाबळेश्वर–पोलादपूर मार्गावर आंबेनळी घाटात झालेल्या भीषण कार अपघातात सातारा जिल्ह्यातील ८ युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत मिळावी यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा पाठपुरावा सुरु होता.**

ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्या मागणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मृतांच्या वारसांना प्रत्येकी १ लाख अशी एकूण ८ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. कोकणातून घरी परतत असताना दि. २४ मे रोजी मध्यरात्री या युवकांची कार दरीत कोसळली होती. या अपघातात आठही युवकांचा मृत्यू झाला होता. दुर्घटनेनंतर ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी मृतांच्या घरी सांत्वनपर भेट देऊन कुटुंबियांना आर्थिक मदत मिळवून देण्याचा शब्द दिला होता. याबाबत ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मृतांच्या वारसांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याची मागणी केली.या मागणीनुसार मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मृताच्या वारसांना प्रत्येकी १ लाख रुपये मदत जाहीर केली असून ही रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा प्रतापगंज पेठ सातारा या शाखेच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या बँक खात्यामध्ये वर्ग केली आहे.

### विडणी येथे पारायण सोहळा उत्साहात

फलटण,ता.९(वार्ताहर)–

**फलटण तालुक्यातील विडणी येथील सद्गुरु शिवाजी महाराज मंदिरात भव्य श्री शंकरगीता पारायण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री सद्गुरु शंकर महाराजांच्या पावन पादुकांचे दर्शन भाविकांसाठी आयोजित करण्यात आले होते.**


श्री सद्गुरु शंकर महाराजांच्या पादुकांचे मंदिरात मोठ्या भक्तीभावाने आगमन झाले. यावेळी श्री सद्गुरु शंकर महाराज पादुका, श्री सद्गुरु शिवाजी महाराज समाधी, श्री सद्गुरू कुलकर्णी महाराज (आईसाहेब) मूर्ती,श्री सद्गुरु विठ्ठल महाराज समाधी यांना अभिषेक करण्यात आला. त्यानंतर श्री शंकरगीता पारायणास प्रारंभ झाला. व्यासपीठ चालक सौ.उर्मिला निवंगुणे या होत्या. या धार्मिक सोहळ्यास भाविक भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या कार्यक्रमाचे आयोजन मिलिंद कदम, निखिल वाघमारे आणि जयवंत कर्वे यांच्या पुढाकाराने करण्यात आले.

# वसगडे येथील मुख्य रस्त्याला 'तळ्याचे' स्वरुप

## रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये साचले पावसाचे पाणी; वाहनधारकांसह नागरिकांची कसरत

भिलवडी,ता.९(वार्ताहर)–

**गेल्या दोन दिवसात कृष्णा काठावर जोरदार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे अनेक रस्त्यावरती पाणीच पाणी साचले. या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला तर वसगडे (ता.पलूस) येथील मुख्य बस स्टॅन्ड समोरील चौकात मात्र पावसामुळे गेली दोन ते तीन दिवस झाले पाणी साचून राहिल्यामुळे वाहनधारकांसह चालत जाणाऱ्या महिला आणि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात तारेवरची कसरत होत आहे.**



वसगडे (ता.पलूस) येथे बस स्टॅन्ड मुख्य रस्त्यावरती पाणी साचल्याने रस्त्याला तळ्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ढिसाळ कारभारामुळे या मुख्य चौकात खोलगट असे खड्डेच खड्डे पडले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.या बाबीकडे संबंधित बांधकाम विभाग सोईने दुर्लक्ष करीत असल्याने ग्रामस्थांच्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे.तर स्थानिक राजकीय नेत्यांनीही या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामस्थ स्थानिक नेत्यांच्यावरती नाराजी व्यक्त करू लागले आहेत. वसगडे येथील बस स्टॅन्ड समोरील मेन रोड लगत पडलेले खड्डे आणि रस्त्याची झालेली दयनीय अवस्था पाहता मुख्य रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांना या खड्ड्यातून वाट काढत जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.दोन दिवस झालेल्या पावसाने या भागात पाणी साचल्याने या खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहिले आहे. पाण्यातून वाट काढत जाण्यासाठी महिला आणि ग्रामस्थांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. गेले दोन वर्षे झाली या रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असून काही भागात रस्ता पूर्ण झाला आहे तर काही भागात तो अपूर्ण राहिलेला आहे. यामुळे बांधकाम खात्याच्या दुर्लक्षाने आणि गांधारीच्या भूमिकेने या रस्त्याचे काम काही ठिकाणी रखडलेले दिसत आहे. या बस स्टॅन्ड समोरील खड्ड्यात एखाद्या वाहन धारकाचा बळी गेल्यानंतरच किंवा अपघात घडल्या नंतरच संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार का?अशा तीव्र संतापजनक प्रतिक्रिया या भागातील ग्रामस्थांच्यातून व्यक्त होत आहेत.

> **दोन वर्षापासून काम चालू-बंद अवस्थेत**
> गेली दोन वर्षे झाले हे रस्ता काम बांधकाम विभागाच्या कामचुकारपणामुळे चालू-बंद अशा अवस्थेत असून मुख्य बस स्टॅन्ड समोरील सुमारे ५० मीटर इतका रस्ता खचला असल्याने त्या रस्त्यात मोठ मोठे खड्डेच खड्डे पडल्याने यामध्ये पाणी साचून तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून वेळेत हा रस्ता दुरुस्त व खड्डे भरून न घेतल्यास एखादा मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ लक्ष केंद्रित करून या रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे .

# 'कोटा'तर्फे ज्युनियर आयएएस फाउंडेशन प्रोग्रामचा उपक्रम

कराड,ता.९(प्रतिनिधी)–

**अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातून अनेक विद्यार्थी नागरी सेवांकडे वळतात, ही गरज ओळखून येथील कोटा अकॅडमीने शालेय वर्गापासूनच विद्यार्थ्यांसाठी ज्युनियर आयएएस फाउंडेशन प्रोग्राम हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.**

या विशेष उपक्रमांतर्गत इयत्ता सातवी ते ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार कला आहे. यात यूपीएससी, एमपीएससी, एमएससी, एनडीएसारख्या राष्ट्रीय व राज्य पातळीवरील प्रतिष्ठेच्या स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करून घेतली जाणार आहे.या उपक्रमाबाबत कोटा ॲकॅडमीच्या संचालिका मैथिली खुस्पे म्हणाल्या की, केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना प्रशासकीय संस्थेच्या शैक्षणिक भेटी घडवून आणल्या जातील. आजी–माजी आयएएस, आयपीएस आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची विशेष व्याख्याने आणि त्यांच्याशी थेट संवासदाची संधी उपलब्ध केली जाईल. याचा फायदा मिळून ते प्रशासकीय सेवेत उत्तम अधिकारी बनावेत, यासाठी एक जुलैपासून हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. सातवी ते अकरावीमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोटा ॲकॅडमीचे संचालक डॉ.महेश खुस्पे यांनी केले आहे.

महासत्ता

बुधवार,ता.१० जून २०२६

# ९७० श्रावणबाळ लाभार्थ्यांना नोटिसा

## शिरोळ तालुक्यात खळबळ; विसंगती आढळलेल्या प्रकरणांमध्ये तहसील प्रशासनाकडून कारवाई

शिरोळ,ता.९(वार्ताहर)-

**शिरोळ तालुक्यात श्रावणबाळ योजनेचा लाभ घेणाऱ्या तब्बल ९७० लाभार्थ्यांना तहसील प्रशासनाकडून नोटिसा बजावण्यात आल्याने तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची सखोल तपासणी केल्यानंतर नियमांमध्ये न बसणारे तसेच विविध प्रकारच्या विसंगती आढळलेल्या प्रकरणांमध्ये ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.शासनाच्या श्रावणबाळ योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल ज्येष्ठ नागरिकांना मासिक आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेचा लाभ पात्र व्यक्तींनाच मिळावा, यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार विविध तालुक्यांमध्ये लाभार्थ्यांच्या नोंदींची पडताळणी सुरू आहे.**




त्याचाच एक भाग म्हणून शिरोळ तालुक्यातील लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान काही लाभार्थ्यांच्या नोंदींमध्ये एकाच नावाच्या दोन व्यक्ती आढळून आल्या. काही लाभार्थ्यांच्या नावावर शेतीची जमीन असल्याचे सातबारा उताऱ्यातून स्पष्ट झाले. तर काही प्रकरणांमध्ये उत्पन्न, मालमत्ता अथवा इतर निकषांबाबत शंका निर्माण झाल्याने संबंधित लाभार्थ्यांना स्पष्टीकरण देण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून नोटीस मिळालेल्या लाभार्थ्यांना ठरावीक कालावधीत आवश्यक कागदपत्रांसह आपली बाजू मांडण्याची संधी दिली आहे.

मागील सुमारे महिनाभर महसूल विभागाकडून श्रावणबाळ आणि संजय गांधी निराधार योजना लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी सुरू होती. या तपासणीत अनेक नोंदींची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर पहिल्या टप्प्यात ९७० श्रावणबाळ लाभार्थ्यांना नोटिसा देण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या नोटिसा बजावण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून महसूल विभागाचे कर्मचारी यामध्ये कार्यरत आहेत.

विशेष म्हणजे ही मोहीम केवळ श्रावणबाळ योजनेपुरती मर्यादित राहणार नसून दुसऱ्या टप्प्यात उर्वरित लाभार्थ्यांचीही तपासणी करून शंकास्पद लाभार्थ्यांना नोटीसा देण्यात येणार आहेत. तसेच संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी झाली असून आवश्यक्तेनुसार त्यांनाही नोटिसा बजावण्यात येणार असल्याचे संबंधित विभागातून सांगण्यात आले आहे.

या कारवाईमुळे तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाली आहे. अनेकांनी शासनाच्या निकषांनुसार लाभ घेत असल्याचा दावा केला असून, नोटिसा मिळाल्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह प्रशासनासमोर हजर राहण्याची तयारी सुरू केली आहे. तर काही लाभार्थ्यांनी प्रशासनाकडून करण्यात येणारी पडताळणी पारदर्शक व वस्तुनिष्ठ पद्धतीने व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

महसूल विभागाच्या या उपक्रमामागे अपात्र लाभार्थ्यांना योजनांमधून वगळून पात्र व्यक्तींना न्याय देण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचावा यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत आणखी लाभार्थ्यांची तपासणी होऊन नवीन नोटिसा जारी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, नोटीस प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांनी घाबरून न जाता आवश्यक कागदपत्रांसह तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. लाभार्थ्यांचे स्पष्टीकरण आणि सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे पुढील निर्णय घेतला जाणार असल्याने या प्रक्रियेकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.



पहिल्याच पावसात प्रभाग एकमधील मुख्य रस्त्यावर साठलेले पाणी

# शिरदवाडमध्ये गटारीचे सांडपाणी नागरिकांच्या घरात

शिरदवाड,ता.९(वार्ताहर)-

**येथील प्रभाग एकमध्ये गेल्या कित्येक महिन्यापासून गटारीचे काम सुरू आहे .हे काम अद्यापही अपूर्णच राहिले आहे.कामाचे नियोजन, दर्जा व तांत्रीकतेचा अभाव असल्याने शासनाचे लाखो रुपये वाया गेल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.**

### पहिल्याच पावसात ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

याबाबतची अधिक माहिती अशी की शिरदवाड येथील दीड हजार लोकसंख्या असलेल्या प्रभाग क्रमांक एकच्या दहा ते पंधरा गल्लीमधील सांडपाणी जाण्यासाठी सध्या कोणताच मार्ग नाही. त्यामुळे पावसाचे तसेच सांडपाणी काहींच्या घरात तर अनेक सखल भागात तसेच रस्त्यावर साचून येथील नागरिकांना दुर्गंधी,डास यांचा त्रास होत आहे.

पाणी बाहेर जाण्यासाठी कोणताच मार्ग नसल्याने व या परिसरात अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे सखल भागात असल्यामुळे नागरिक,लहान मुले, महिलांना याचा त्रास होत आहे. पहिल्याच जोरदार पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले तर अनेकांच्या घरात गुडघाभर पाणी गेल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून जगावे लागत आहे.याकडे प्रशासनाची मात्र डोळेझाक होत असल्यामुळे नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. याबाबत भागातील नागरिकांनी निवेदने दिली,आंदोलने केली पण त्यास यश आलेले नाही. तसेच हा प्रश्न निकाली निघू शकला नाही. याबाबत लोकप्रतिनिधींनी निधी देऊन गटर करण्याचा प्रयत्न झालेला आहे पण प्रत्येक वेळी तो यशस्वी झाल्याचे दिसत नाही.सध्या इथे पाणी बाहेर काढण्याचे काम सुरू असून हे काम हे अत्यंत संथ गतीने सुरू आहे.तसेच त्याबाबत ग्रामपंचायतीचीही प्रचंड उदासीनता आहे. गेले कित्येक महिने हे काम बंद आहे.त्यालाही कितपत यश येते हे पाहणे गरजेचे आहे. यासाठी पुरेशा निधीचे नियोजन करून तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन त्यातून कायमस्वरूपी मार्ग काढावा अशी मागणी या परिसरातील नागरिकांतून होत आहे.या कामाबाबत नागरिकांतून अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत असून हे काम अत्यंत निकृष्ट प्रकारचे झाले आहे त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी आणि दोषींवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## कृषी दुकानांमध्ये बियाणे खरेदीसाठी गर्दी

बोरपाडळे,ता.९(प्रतिनिधी)-

**रविवारच्या रात्रीच्या पावसाने शेती कामाला वेग आला आहे. सड वेचणी, बांध ओढणे, सरी सोडणे, भुईमूगाचे बियाणे काढणे आदी कामात शेतकरी वर्ग व्यस्त दिसत आहे.**

रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर भाताची पेरणी बऱ्यापैकी झाली असून अजूनही काही शेतकरी बैलाद्वारे,ट्रॅक्टर मशीन आणि माणसांनी ओढत भात पिकांची पेरणी करताना दिसत आहेत. पावसाचा सुगावा लागल्याने बियाणे खरेदीसाठी कृषी दुकानावर गर्दी होत आहे.परंतु प्रशासनाने पेरणी करण्यासाठी गडबड करू नये असे आवाहन केले आहे.

# राशिवडे गावाला प्रभारी अधिकाऱ्यांचे ग्रहण

## ग्रामविकास अधिकारी,कृषी सहाय्यक,तलाठी,वैद्यकीय अधिकारी,गावकामगार, पोलिस पाटीलही प्रभारी

राशिवडे,ता.९(प्रतिनिधी)-

**प्रशासनाच्या अजब आणि मनमानी कारभाराचा फटका राधानगरी तालुक्यातील सर्वात मोठे गाव असणाऱ्या राशिवडे बु गावाला बसत आहे.ग्रामविकास अधिकारी, गावकामगार पो.पाटील, कृषी अधिकारी, तलाठीसह वैद्यकीय अधिकाऱ्यांची दोन्ही पदे प्रभारी असल्याने कामकाज करताना ग्रा.पं.पदाधिकाऱ्यांना चांगलीच कसरत करावी लागत आहे. त्यामुळे प्रभारी असणारी पदे कायमस्वरुपी न भरल्यास आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.**

राशिवडे बु हे तालुक्यातील सर्वात मोठे गाव,मोठी बाजारपेठ असणारे गाव.याठिकाणी प्रा.आरोग्य केंद्र,मंडल कार्यालय,तलाठी कार्यालय कार्यरत आहे.तर मोठी ग्रामपंचायत असल्याने ग्रामविकास अधिकारी पद कार्यरत आहे.वीस हजारच्या आसपास लोकसंख्या असलेल्या या गावासाठी गेल्या दोन वर्षांपासून कायमस्वरूपी ग्रामविकास अधिकारी नाही,आतापर्यंत दोन वर्षांत चार ते पाच प्रभारी अधिकाऱ्यांनी काम केले आहे व सध्या या ठिकाणचा कार्यभार प्रभारींवरच असल्याने ग्रा.पं.पदाधिकाऱ्यांना कामकाजास विकासकामे करताना अडचणी निर्माण होत आहेत.आरोग्य केंद्रामध्ये रोज मोठ्या प्रमाणात बाह्य तपासणी होत असते.

याठिकाणी काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा चांगली असली तरी ही दोन्ही पदे प्रभारीच आहेत. तीच अवस्था तलाठी कार्यालयाची आहे.याठिकाणी तलाठीही प्रभारीच आहे.कायदा सुव्यवस्था सांभाळण्यासाठी मदत करणारे पोलीस पाटील पदही प्रभारी आहे.सर्वात महत्वाचे म्हणजे शेतीविषयक माहीती,मार्गदर्शन करणाऱ्यांसाठी असणारे कृषी सहाय्यक पदही प्रभारी आहेत. राशिवडे गावाला आता प्रभारी अधिकाऱ्यांचे ग्रहण लागल्याने कारभार करण्यास अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून प्रभारी असणारी ही प्रमुख पदे कायमस्वरुपी भरण्याची मागणी त्रस्त ग्रामस्थांतून होत आहे.

> मुख्य ठिकाणीच प्रभारी पदे असल्याने कारभार करताना अडचणी निर्माण होत आहेत.प्रभारी पदे कायमस्वरुपी करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे, लवकरच प्रभारीचे ग्रहण सुटेल अशी अपेक्षा आहे.
> **(सौ.संजीवनी पाटील सरपंच राशिवडे बु.)**

### कायमस्वरूपी पदभरती करण्याची ग्रामस्थांची मागणी;अन्यथा आंदोलनाचा इशारा

## सायबर सुरक्षेसाठी महिला आयोग राबविणार पथदर्शी प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

**सोशल मीडियाचा वाढता वापर आणि त्या माध्यमातून महिला व बालकांवर होणारे सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, छेडछाड, सायबर बुलिंग आणि पोक्सो संबंधित गुन्ह्यांचे प्रमाण रोखण्यासाठी, राज्य महिला आयोगाच्या वतीने कोल्हापूर जिल्ह्यात तीन हजार शाळांमध्ये विशेष पथदर्शी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.**

या बैठकीत बोलताना राज्य महिला आयोगाच्या सचिव नंदिनी आवडे यांनी, पालकांनी आपल्या मुलांना सायबर सुरक्षेची योग्य जाण करून देणे ही आजच्या काळाची मोठी गरज असल्याचे प्रतिपादन केले. समाजमाध्यमांच्या गैरवापरामुळे निर्माण होणारी आव्हाने आणि वाढती गुन्हेगारी लक्षात घेता, समाजातील सर्व घटकांना जागरूक करण्यासाठी या प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्यात आल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. कोल्हापूर जिल्ह्यात या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमजबजावणीनंतर हा कार्यक्रम संपुर्ण राज्यात आयोगामार्फत राबविला जाणार आहे.या पथदर्शी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत समाजमाध्यमांच्या सुरक्षित वापराबाबत व्यापक जागरूकता निर्माण करण्याचे प्रमुख उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.समाजमाध्यम गैरवापराच्या प्रकारांवर आणि त्याचे महिला व बालकांवर होणारे मानसिक ताण, सामाजिक बदनामी व आर्थिक नुकसान यांसारख्या गंभीर परिणामांवर सविस्तर प्रकाश टाकला जाईल. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुहास वाईंगडे, पोलीस निरीक्षक संजय हारुगडे, अलोक अग्रहारी उपस्थित होते.

## मराठा आरक्षणासाठी कोल्हापूर गॅझेट लागू करा

### सर्वपक्षीय कोल्हापूर गॅझेट अंमलबजावणी समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

**मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी तसेच मराठा आणि कुणबी समाज एकच असल्याच्या ऐतिहासिक नोंदींचा आधार घेऊन राज्य शासनाने ब्रिटिशकालीन कोल्हापूर गॅझेटची अंमलबजावणी करावी, अशी मागणी सर्वपक्षीय कोल्हापूर गॅझेट अंमलबजावणी समितीच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांना देण्यात आले.**

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात, सन १८८६ मध्ये इंग्रजांनी तयार केलेल्या कोल्हापूर गॅझेटमध्ये मराठा आणि कुणबी समाजाबाबत महत्त्वपूर्ण नोंदी असल्याचा दावा करण्यात आला आहे. या ऐतिहासिक दस्तऐवजांचा आधार घेऊन कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी ॲड. बाबा इंदुलकर यांनी, राज्य शासनाने यापूर्वी हैदराबाद गॅझेटमधील नोंदींचा आधार स्वीकारला असल्याचे सांगितले. त्याच धर्तीवर कोल्हापूर गॅझेटमधील ऐतिहासिक नोंदींचा विचार करून पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाला न्याय देण्यासाठी त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.यावेळी शिवसेना (ठाकरे गट) उपनेते संजय पवार, सहसंपर्कप्रमुख विजय देवणे, दिलीप देसाई, इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत, माजी नगरसेवक अनिल कदम, अशोक भंडारे, हर्षल सुर्वे, विजय पाटील, गीता हासूरकर आदी उपस्थित होते.

# चांदी उद्योगावरील जीएसटी कमी करावा

## चांदी उद्योग फाऊंडेशनची मुख्य जीएसटी आयुक्तांकडे मागणी

हुपरी,ता.९(वार्ताहर)-

**गेल्या वर्षभरात चांदीच्या किमतीत चार ते पाच पट प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे चांदीचा व्यापार घटला असला, तरी दागिन्यांवरील जीएसटी कराचा बोजा मात्र किमतीच्या प्रमाणात चार ते पाच पटीने वाढला आहे. ही करवाढ ग्राहक आणि उद्योजक दोघांच्याही आवाक्याबाहेर गेली आहे. त्यामुळे सरकारने चांदीवरील जीएसटी कर पूर्वीच्या व्हॅट प्रमाणे १ टक्का इतका कमी करून चांदी उद्योगाला दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशनने केली आहे.**



कोल्हापूर :मुख्य जीएसटी आयुक्त नीरज कंसल यांचा सत्कार करताना हुपरी चांदी उद्योग फाऊंडेशनचे पदाधिकारी.

कोल्हापूर जिल्ह्यातील विविध उद्योगांमधील कररचना आणि अडचणी जाणून घेण्यासाठी पुणे विभागाचे मुख्य जीएसटी आयुक्त नीरज कंसल हे कोल्हापूर भेटीवर आले होते. येथील जीएसटी भवनात आयोजित परिसंवादात फाऊंडेशनचे चेतन देशपांडे यांनी आयुक्त कंसल यांच्याकडे ही मागणी केली.या परिसंवादात चांदी फाऊंडेशनने इतरही महत्त्वाचे मुद्दे मांडले. चांदीचे दर वाढल्यामुळे नवीन जीएसटी नोंदणी आणि लेखापरीक्षणासाठी आवश्यक असणारी आर्थिक उलाढालीची मर्यादा वाढवून मिळावी, अशी मागणी करण्यात आली. मुख्य आयुक्त नीरज कंसल यांनी चांदी उद्योजकांच्या सर्व मागण्या केंद्र शासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले.

या परिसंवादाला कोल्हापूर विभागाचे आयुक्त सुमितकुमार यादव, सह आयुक्त प्रसाद गोरसे, तसेच हुपरी चांदी फाऊंडेशनचे मोहन खोत, चेतन देशपांडे, विलास जाधव, सुदर्शन खाडे, गौरव पोतदार, प्रणिल काटकर आदी उपस्थित होते.

# पंचनामे झाले पण भरपाईसाठी चालढकल

जयसिंगपूर,ता.९(प्रतिनिधी)-

**एप्रिल महिन्यात झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने शिरोळ तालुक्यातील १७६० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यातून स्पष्ट झाले. नुकसानग्रस्त पिकांचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला असून भरपाईच्या निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.**

### शेतकऱ्यांना प्रतीक्षा; शिरोळमध्ये १७६० हेक्टरवरील पिकांना फटका

मान्सूनपूर्व पावसाने शेतकऱ्यांकडून भुईमूग, सोयाबीन, भात पेरणीची गडबड सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसात शेतकऱ्यांनी शेतीच्या मशागतीची कामे उरकली आहेत. बी-बियाणे, खते, मजुरी यासाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज जाणवत आहे. अशा काळात एप्रिल महिन्यात झालेल्या नुकसानीची भरपाई मिळेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र महिना उलटून गेला तरी अद्याप शासन पातळीवर भरपाईचा कोणताच निर्णय झाला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

> एप्रिल महिन्यात अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून अहवाल शासनाला सादर केला आहे. मात्र अद्याप नुकसानीचा कोणताही निर्णय झाला नाही. खरिपाच्या तोंडावर शासनाने तातडीने भरपाई द्यावी. अन्यथा शेतकऱ्यांसह शासना विरोधात आंदोलन करावे लागेल.
> **-धनाजी चुडमुंगे**
> **(प्रमुख, आंदोलन अंकुश)**

अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे प्रशासनाकडून तातडीने पंचनामे झाले होते. पंचनामे वेगाने झाले असले तरी भरपाईच्या निर्णयाला मात्र अद्याप मुहूर्त लागला नाही. शासनाच्या या वेळकाढू धोरणाविरोधात शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. तालुक्यात चार बारमाही वाहणाऱ्या नद्या असल्याने उसाचे क्षेत्र अधिक आहे. परिणामी ऊस पिकाचे सर्वाधिक नुकसान झाल्याचे पंचनाम्यातून स्पष्ट झाले आहे. आठवड्याभरात दोन वेळा चांगला पाऊस झाल्याने शेतीच्या मशागती आणि पेरणीच्या कामाला गती आली आहे. अशा काळात शेतकऱ्यांकडे पैसे असणे गरजेचे आहे. एका बाजूला पैशांची चणचण तर दुसऱ्या बाजूला कामगारांची टंचाई, खत वितरण प्रक्रिया, बियाणांची खरेदी करत असताना होत असलेली फसवणूक असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहेत. खरिपाच्या तोंडावर शासनाने तातडीने नुकसान भरपाईचा निर्णय घेऊन शेतकऱ्याला दिलासा देण्याची गरज आहे.

# भाजप सरकारमुळेच जनता महागाईच्या खड्ड्यात

## आम.सतेज पाटील यांची टिका;शिरोळ येथे काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांना निवड पत्र वाटप

जयसिंगपूर,ता.९(प्रतिनिधी)-

**देशातील आणि राज्यातील भाजप प्रणित सरकार हे जनतेला फसविणारे सरकार आहे. सध्या देशात पेट्रोल, डिझेल, गॅस यांचे दर गगनाला भिडले आहेत. अशातच पिण्याचे पाणी सुध्दा विकत घ्यावे लागत आहे.या सरकारने जनतेला महागाईच्या खड्ड्यात लोटले आहे.**

त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सर्व सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि पक्षाचे ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी रस्त्यावर उतरून लढाई करण्याची गरज आहे. यासाठी काँग्रेसवर प्रेम करणाऱ्यांनी एक पाऊल पुढे यावे त्यांना आम्ही सोबत घेवून पाच पाऊले पुढे जाऊ,पुन्हा एकदा देशात आणि राज्यात काँग्रेस पक्षाला चांगले दिवस येण्यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. सतेज उर्फ बंटी पाटील यांनी केले.जयसिंगपूर येथील भिर्डी सभागृहात आयोजित शिरोळ तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप आणि काँग्रेस कार्यकर्ता मेळावा



काँग्रेसच्या मेळाव्यात बोलताना आम.सतेज पाटील तर समोर उपस्थित काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सतेज उर्फ बंटी पाटील हे बोलत होते. मेळाव्यापुर्वी आमदार सतेज उर्फ बंटी पाटील आणि श्री दत्त उद्योग समुहाचे प्रमुख सहकार महर्षी गणपतराव पाटील यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

शिरोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष दरगु गावडे यांनी स्वागत केले. माजी तालुकाध्यक्ष व श्री दत्त सहकारी साखर कारखान्याचे संचालक शेखर पाटील यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते शिरोळ तालुका काँग्रेस पक्षाच्या नुतन कार्यकारिणीमध्ये निवड झालेल्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करून त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या शिवसेनेच्या रूपाली चंदुगडे आणि दिनेश कांबळे यांचाही सत्कार करण्यात आला. समारंभाचे अध्यक्ष सहकार महर्षी गणपतराव पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, काँग्रेस पक्षाच्या शिरोळ तालुका कार्यकारीणीत ज्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या आहेत. त्या पदाधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली आहे. सर्व नुतन पदाधिकाऱ्यांनी तरूणांचे संघटन करून जनतेचे प्रश्न सोडविण्याबरोबरच पक्षाचा विचार तळागाळात पोहोचविण्यासाठी एकसंघपणे प्रयत्न करावेत. यावेळी माजी नगरसेवक अशोकराव कोळेकर आणि सहकार महर्षी गणपतराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पक्ष सक्षम करण्यासाठी रात्रीचा दिवस करूया असे आवाहन केले.

जयसिंगपूर शहर काँग्रेस अध्यक्ष सुदर्शन कदम, माजी नगरसेवक सर्जेराव पोवार, महिला काँग्रेस शहराध्यक्षा आम्रपाली कारंडे यांनी मनोगत व्यक्त केले. शिरोळ पंचायत समितीच्या माजी सभापती श्रीमती सुजाता शिंदे यांनी आभार मानले. दत्त कारखान्याचे चेअरमन रघुनाथ पाटील, जयसिंगपूर नगरपालिकेचे पक्षप्रतोद संजय पाटील कोथळीकर, कुरूंदवाड पालिकेचे काँग्रेस पक्षाचे पक्षप्रतोद प्रदिप चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य सौ. अर्चना चौगुले, पंचायत समिती सदस्य सौ. दिपाली होगले, सौ. निलम म्हेत्रे, माजी नगराध्यक्षा सौ. अनिता कोळेकर, माजी नगरसेवक युनूस डांगे, चंद्रकांत जाधव घुणकीकर यांच्यासह शिरोळ तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृष्णासाठी थेट 'सहकार विरुद्ध संस्थापक' सामना

- ५३ उमेदवारांची माघार;
- २१ जागांसाठी ४४ जण रिंगणात,
- चिन्हवाटपानंतर प्रचाराला वेग

कराड, ता. ९ (प्रतिनिधी)

**यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकीचे चित्र अखेर स्पष्ट झाले असून, उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी मंगळवारी तब्बल ५३ उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणुकीच्या रिंगणात ४४ उमेदवार शिल्लक राहिले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अपर्णा यादव यांनी दिली.**



अर्ज माघारीनंतर कारखान्याच्या २१ संचालकांच्या जागांसाठी आता जयवंतराव भोसले सहकार पॅनेल आणि कृषीमहर्षी आबासाहेब मोहिते संस्थापक पॅनेल या दोन प्रमुख पॅनेलमध्ये थेट लढत रंगणार असल्याचे निश्चित झाले आहे. परंतु, यामध्ये दोन अपक्ष उमेदवारांचेही अर्ज बाकी राहिल्याने संबंधित दोन ऊस उत्पादक गटातील चुरस वाढणार आहे. बुधवारी (दि. १०) चिन्हवाटपाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अधिकृत उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होणार असून, त्यानंतर प्रचाराचा धुरळा उडणार आहे.

कारखान्याच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी एकूण १३९ अर्ज प्राप्त झाले होते. छाननी प्रक्रियेनंतर १२२ अर्ज वैध ठरले. त्यानंतर माघारीच्या अंतिम टप्प्यात ५३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे आता ४४ उमेदवार निवडणूक मैदानात उरले आहेत. यामध्ये दोन्ही पॅनलचे २१-२१ उमेदवारांमध्ये लढत होणार असून, दोन अपक्ष उमेदवार ही निवडणूक रिंगणात असल्याने संबंधित दोन ऊस उत्पादक गटांमधील निवडणूक चुरशीची होणार आहे.

# लाईफ मंत्रा मी काय करू? व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन

इचलकरंजी,ता.९

**युगप्रधान आचार्य श्री महाश्रमणजी यांचे सुशिष्य मुनिश्री अनंतकुमारजी आणि मुनि श्री जैनमकुमारजी यांच्या सान्निध्यात, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषदेच्या निर्देशनाखाली तेरापंथ युवक परिषद इचलकरंजीतर्फे व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा लाईफ मंत्रा – मी काय करू? चे आयोजन तेरापंथ भवनात करण्यात आले.**

मुनिश्री अनंतकुमारजी यांनी कार्यशाळेत आपल्या मंगल उद्‌बोधनात फर्मावले की, आपल्या जीवनाचे अनेक पैलू असतात, ते सर्व एकत्र आल्यावर आपले संपूर्ण जीवन बनते. जसे आपण पाहतो की भारत देश विविध संस्कृती आणि वेगवेगळ्या राज्यांनी मिळून बनला आहे, तसेच आपले जीवन आहे. आपण आपल्या जीवनात शारीरिक, मानसिक, व्यावसायिक, कौटुंबिक आणि आध्यात्मिक या सर्व दृष्टीने श्रेष्ठ बनण्याचा प्रयत्न करावा, हाच या कार्यशाळेचा उद्देश आहे.

आपण आपल्या जीवनात शारीरिकदृष्ट्या निरोगी बनावे, सामाजिकदृष्ट्या समाज आणि संघासाठी काहीतरी देऊन शिकावे, व्यावसायिकदृष्ट्या स्वतःच्या बुद्धी आणि प्रज्ञेद्वारे काहीतरी नवीन करून आपल्या व्यवसायात चमक आणावी. कौटुंबिकदृष्ट्या आपण नातेसंबंध जपत मानसिक शांतीसह अध्यात्माकडे वाटचाल करावी, तेव्हाच आपले जीवन परिपूर्ण बनू शकते.

या कलियुगात आपल्याला मानवी जन्म मिळाला आहे, जैन धर्म मिळाला आहे, तेरापंथ मिळाला आहे, आचार्यश्री महाश्रमणजी यांसारख्या महान गुरूंचे सान्निध्य मिळाले आहे, तर आपण आपल्या जीवनात निखार आणण्याचा प्रयत्न करावा. मुनिश्रींनी कार्यशाळेत उपस्थित दाम्पत्यांसाठी विशेष मंत्र जप आराधना घडवून आणली आणि स्वतःचे निरीक्षण करण्यासाठी अनेक प्रश्नांच्या माध्यमातून स्व-मूल्यांकनाचा एक अत्यंत रंजक मापदंड सादर केला. जवळपास ३ तास चाललेल्या या कार्यशाळेत सर्व लोकांनी जागरूकतेने आणि मनोभावे स्वतःला जोडून ठेवले. मुनिश्री जैनमकुमारजी यांनी ''मी काय करू? ज्यामुळे माझे जीवन चांगले बनेल, श्रावकत्वात निखार येईल'' याबद्दल प्रेरणा दिली. तेरापंथ युवक परिषदेचे अध्यक्ष अनिल छाजेड़ यांनी उपस्थित सहभागींचे स्वागत करताना आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन तेरापंथ युवक परिषदेचे मंत्री अंकुश बाफना यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल छाजेड़ यांची संपूर्ण टीम आणि अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषदेचे क्षेत्रीय सहयोगी व सदस्य संतोष भंसाली यांचे विशेष योगदान लाभले.

# शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

## कागल तालुका कृषी कार्यालयाची सूचना

माद्याळ,ता.९(प्रतिनिधी) –

**कापशी खोऱ्यात पावसाने हजेरी लावली असली तरी,हा वळवाचा पाऊस आहे. अजून मान्सून दाखल झालेला नाही.जोपर्यंत कापशी खोऱ्यात सरासरी ६५ मिलिमीटर पाऊस पडत नाही.तोपर्यंत पेरणीची घाई करू नये,अशा सूचना कागल तालुका कृषी कार्यालयाने शेतकऱ्यांना दिल्या आहेत.**

कापशी खोऱ्यात प्रामुख्याने उसाचे पीक घेतले जाते. इतर पिके ही हंगामानुसार घेतली जातात.सध्या शेतकरी वर्ग मशागतीची कामे पूर्ण करून मान्सून सुरू होण्याची वाट पाहत आहे.बियाणेही तयार ठेवली आहेत.काही शेतकऱ्यांनी पावसावर भरवसा ठेवून भाताची धुळवाफ पेरणी केली आहे.मान्सून वेळेवर नाही आला तर,दुबार पेरणीचे संकट येऊ शकते. शेतकऱ्यांनी कमीत कमी ६५ मिलिमीटर पाऊस पडल्याशिवाय पेरणीची गडबड करू नये.असे तालुका कृषी अधिकारी शेखर थोरात यांनी कळवले आहे.दरम्यान, महाडीबीटी पोर्टलवर बियाणासाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना येत्या चार दिवसात बियाणे मिळण्याची शक्यता आहे.

**चिकोत्रा धरणातील पाणी फक्त पिण्यासाठीच...**

काही शेतकऱ्यांनी उगवणी युक्त पाऊस पडल्यामुळे सोयाबीन, भुईमूग व भात पिकाची पेरणी केली आहे.बियाणे उगवून आल्यानंतर पाटाद्वारे पाणी देता येईल, हा समज शेतकऱ्यांचा आहे.पण चिकोत्रा मध्यम प्रकल्पात सध्या फक्त ३३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. सदर पाणीसाठा फक्त पिण्यासाठी असल्यामुळे,येथून पुढे जे पाणी चिकोत्रा नदीत सोडले जाईल, त्या पाण्यावर उपसाबंदी आदेश लागू होणार आहे. उपसाबंदी असलेल्या कालावधीमध्ये पिण्याचे पाणीपुरवठा व्यक्तिरिक्त इतर कारणासाठी (खाजगी) चिकोत्रा नदीतून पाणी उपसा केल्यास सदर उपसा अनधिकृत समजून संबंधितांचा पाणी परवाना व विद्युत पुरवठा एक वर्षाच्या कालावधी करिता रद्दबातल करण्यात येऊन,याची गांभीर्याने नोंद घेऊन, जलसंपदा विभागास सहकार्य करावे, असे जलसंपदा विभागाच्या चिकोत्रा मध्यम प्रकल्पाचे शाखा अभियंता एम.के.चव्हाण यांनी सांगितले.

# बिळाशी व जांभळेवाडी ग्रामपंचायत निवडणूक आरक्षण १२ जून रोजी

## तहसीलदार शामला खोत यांची माहिती

शिराळा,ता.९ (प्रतिनिधी)

**शिराळा तालुक्यातील सन २०२४ ते २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या बिळाशी व जांभळेवाडी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १२ जून रोजी त्या त्या ग्रामपंचायत कार्यालयात होणार असल्याचे तहसीलदार शामला खोत पाटील यांनी सांगितले.**

याव्दारे सर्व नागरिकांना जाहीर सुचना देण्यात येते की, जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील पत्र दि.२७ मे, २०२६ अन्वये, शिराळा तालुक्यातील ०२ ग्रामपंचायतींचे कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम प्राप्त झाला आहे.

सदर सदस्यांच्या पदाचे आरक्षण निश्चित करण्याचा कार्यक्रम १२जून रोजी सकाळी ११ वाजता मौजे जांभळेवाडी व बिळाशी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

सदर ठिकाणी शिराळा तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व नागरिकांनी तसेच सर्व ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच तसेच सदस्य व इतर प्रतिष्ठीत नागरिक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन तहसिलदार शामला खोत-पाटील यांनी केले आहे.

# दुधगंगा नदीवरील पाणी उपसाबंदी स्थगित

कागल, ता.९ (प्रतिनिधी)

**दुधगंगा नदीवरील शेतीसाठी पाटबंधारे विभागाने जाहीर केलेली ४ दिवसांची अन्यायकारक पाणी उपसाबंदी, शेतकरी शिष्टमंडळाने केलेल्या आक्रमक पाठपुराव्यामुळे अखेर दोन दिवसांसाठी स्थगित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.**

पाटबंधारे विभागाने ५ जून रोजी दूधगंगा नदीवर ४ दिवसांची उपसाबंदी जाहीर केली होती. चालू हंगामात तिसऱ्यांदा लादण्यात आलेल्या या उपसाबंदीमुळे शेतकरी संतप्त झाले होते. याविरोधात इरिगेशन फेडरेशनचे विक्रांत पाटील किणीकर, भारत पाटील भुयेकर, शेकापचे नेते बाबासाहेब देवकर आणि कॉम्रेड शिवाजी मगदूम यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने कोल्हापूर पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता स्मिता माने यांची भेट घेतली.

यावेळी शिष्टमंडळाने प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. निवेदनात म्हटले आहे की, चालू हंगामात यापूर्वी ३ दिवसांच्या दोन वेळा (एकूण ६ दिवस) उपसाबंदी करण्यात आली होती. आता पुन्हा ४ दिवसांची बंदी लादणे म्हणजे शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रकार आहे. विशेष म्हणजे, शेतीचे पाणी बंद असताना दुसरीकडे औद्योगिक वसाहतींना २४ तास पाणी पुरवठा सुरू आहे. शेतकरी मेला तरी चालेल पण भांडवलदार जगला पाहिजे, ही पाटबंधारे विभागाची भूमिका चुकीची आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला. उद्योगांना २४ तास वीज आणि पाणी मिळते, तर शेतकऱ्यांना केवळ ६ तास वीज मिळते. अशा स्थितीत ४ दिवस पाणी बंद केल्यास पिके जळून खाक होतील, अशी भीती व्यक्त करण्यात आली.

शेतकऱ्यांचा वाढता असंतोष आणि आक्रमक पवित्रा पाहून प्रशासनाने ४ दिवसांपैकी २ दिवसांची उपसाबंदी स्थगित करण्याचे आश्वासन दिले. या चर्चेत राहुल मगदूम, दादासो पाटील, रामजी घराळ, सुभाष मगदूम,युवराज निकम, सुरेश मगदूम, दादोबा गोनुगडे, संदीप पाटील,अरविंद पाटील, राजू घराळ आणि तानाजी चौगुले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी गजानन पाटील, कृष्णात मगदूम, सुभाष पाटील, शिवाजी घराळ, गजानन आ. पाटील, नंदकुमार मगदूम, प्रकाश पाटील, मारूती पाटील, बंडु मगदूम, श्रीकांत मगदूम, चंदर पाटील, प्रकाश आगळे, अनिल पाटील, तुकाराम खोंद्रे, दादासो वैराट, संजय मगदूम, कुंडलिक चौगुले, बाळू मगदूम, शिवाजी पाटील उपस्थित होते.

# घरात घुसून विवाहितेचा विनयभंग; चौघांवर गुन्हा

सांगली,ता.९(प्रतिनिधी)–

**सायंकाळच्या सुमारास अचानक घरात घुसलेल्या चौघांनी विवाहितेच्या केसाला धरून तिला घरात खेचून तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तिने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न करताच मारहाण करून तिचा विनयभंग केला. तिच्या पतीलाही मारहाण करून चौघांनी घरातून पलायन केले. या प्रकरणी पीडितेने सांगली शहर पोलिसात फिर्याद दिली आहे.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेच्या फिर्यादीची दखल घेऊन पोलिसांनी संशयित सागर खाडे (रा.महसूल कॉलनी, सांगली) आणि त्याचे पैलवान, पांड्या आणि सुनील नामक मित्र, अशा चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पीडित विवाहिता ही ३२ वर्षीय असून ती पती आणि मुलासह राहते. सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पीडित महिलेचा पती किराणा साहित्य आणण्यासाठी दुकानात गेले होते. त्यावेळी सागर खाडे हा आपल्या तीन मित्रांसह पीडित महिलेच्या घरात घुसला. अचानक घरात घुसल्याने तिने घरातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी संशयित सागर याने तिच्या हाताला धरून तर पैलवान नामक व्यक्तीने तिच्या केसाला धरून तिला घरात खेचले. तिला लाथ मारून खाली पाडले. त्यानंतर तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे अश्लील कृत्य केले. तिने आरडाओरडा केला असता तिचे तोंड दाबले. तिचा बचाव करण्यासाठी पती पुढे आल्यानंतर त्यांनाही या टोळक्याने लाथा बुक्क्यांनी महाराण करून तेथून पलायन केले . याप्रकरणी शहर पोलिसांनी चार जणांच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

# टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

परभणी,ता. ९

**परभणी ते गंगाखेड या मार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या इंधन टँकरने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, इंधन टँकर परभणीकडून गंगाखेडच्या दिशेने जात असताना त्याने दुचाकीस पाठीमागून धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीस्वार दिगंबर कदम यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतली असता टँकर चालक घटनास्थळावरून फरार झाल्याचे समोर आले.

या प्रकरणी दैठणा पोलीस ठाण्यात माणिक आप्पाराव कदम यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# औद्योगिक महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ

मुंबई,ता.९(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला पुरंदर विमानतळ जमीन संपादनासाठी हुडकोकडून ६ हजार कोटींचे कर्ज घेण्यास शासनाने मान्यता व शासन हमी दिली आहे.

सध्या पुरंदर विमानतळा करिता जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. तसेच राज्यात विविध औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे व आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात जमीन संपादन सुरू आहे. यात शेतकऱ्यांना योग्य भरपाई देण्यासाठी तसेच नवीन औद्योगिक प्रकल्प व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अतिरिक्त आर्थिक संसाधनांची महामंडळाला आवश्यकता भासणार आहे. त्यादृष्टीने महामंडळाच्या कर्जउभारणीच्या सध्याच्या मर्यादेत वाढ करण्यासाठी या अधिनियमातील तरतुदीमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

# विट्यात पार्किंगमध्ये हातगाडे अन् रस्त्यावर बांबू

## अधिकाऱ्यांची खाबूगिरी उघडकीस: तात्काळ कारवाईची मागणी

विटा,ता.९(प्रतिनिधी)

**विटा शहरात पार्किंगमध्ये हातगाडे अन् रस्त्यावर बांबू अशा भलत्याच प्रकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मर्जीतील विक्रेत्यांना पार्किंग मध्येच हातगाडे लावण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. आता तर या विक्रेत्यांनी चक्क रस्त्यावरच आडवे बांबू टाकून वाहतुकीला आणि वाहन पार्किंगला अडथळा सुरू केला आहे. पालिकेतील या विभागाशी संबंधित अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे या विक्रेत्यांशी अर्थपूर्ण लागेबांधे असल्याचे काही विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.**



विटा पालिकेत पन्नास वर्षानंतर बदल होऊन आमदार बाबर गटाची सत्ता स्थापन झाली आहे.सत्ता बदल झाला, मात्र शहरातील मूलभूत समस्या देखील अजून जैसे थे असल्याची तक्रार आता नागरिकांकडून करण्यात येत आहे. विटा शहरातील भाजी मंडई परिसरात काही मर्जीतील विक्रेत्यांनी थेट रस्त्यावरच स्टॉल लावून वाहन पार्किंगला अडथळा केला आहे. या विक्रेत्यांना कोणीच जाब विचारत नसल्याने त्यांनी चक्क आपल्या दुकानाच्या पुढे मुख्य रस्त्यावरच बांबू आडवे टाकून नागरिकांना वाहने लावण्यास मज्जाव केला आहे.

एक आठवड्यापूर्वी विटा पालिकेतील सत्ताधारी बाबर गटाच्या काही मंडळींनी भाजी मंडईत फिरून बाजार कट्टे सोडून इतरत्र भाजीपाला विकणाऱ्या विक्रेत्यांना कट्ट्यावरच बसायला सांगितले होते. भाजी मंडईत बसणाऱ्या व्यापारी आणि शेतकऱ्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र भाजी मंडईच्या प्रवेशद्वाराजवळच बसलेल्या मर्जीतील विक्रेत्यांना पालिकेकडून कोणतेही नियम किंवा बंधन नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या या खाबुगिरीची सध्या विटा शहरात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.विटा शहरात सध्या वाहतुकीची आणि पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे.

त्यामुळे पालिका प्रशासन तसेच पोलीस प्रशासनाने केवळ भाजीमंडई परिसरातीलच नव्हे तर वाहतुकीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे तात्काळ हटवावीत, तसेच आपल्या दुकानासमोर वाहने लागू नयेत म्हणून रस्त्यावर बांबू किंवा लोखंडी जाळी, फलक ठेवून अडचण करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# सैदापूर कॅनाल परिसरात १४ किलो गांजा जप्त

## ४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

कराड,ता.९(प्रतिनिधी)

**अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेला वेग देत कराड विभागाच्या पोलिसांनी सैदापूर कॅनाल परिसरात छापा टाकून १४ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत गांजासह सुझुकी ॲक्सेस दुचाकी आणि अन्य साहित्य असा एकूण ३ लाख ९९ हजार १७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका संशयिताला अटक करण्यात आली आहे.**

या प्रकरणी पोलीस हवालदार सागर बर्गे यांनी फिर्याद दिली असून, कराड शहर पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोरख जिजाबा पवार (रा. वडोली निळेश्वर, ता. कराड) सध्या रा. साई हाइट्स, प्रथमेश कॉलनी, विद्यानगर-सैदापूर) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

गोरख पवार (रा. वडोली निळेश्वर, ता. कराड, सध्या रा. विद्यानगर-सैदापूर) हा गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार संयुक्त पथकाने सैदापूर कॅनाल परिसरात धाड टाकली.

कारवाईदरम्यान सुरुवातीला ६ किलो गांजा जप्त करण्यात आला. त्यानंतर आरोपीकडे केलेल्या पुढील चौकशीत आणखी ८ किलो गांजा हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. अशा प्रकारे एकूण १४ किलो गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक भापकर करीत आहेत.

**अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.),**
**महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला,**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

क्र. आरटीएस-३८२२/५६२८/प्र.क्र.३७३/ज-५ अ
प्र.क्र. १००७ (११) २०२५/अवपु

**श्री. मारुती शिवाप्पा चौगुले तर्फे (म.वा.)**
**शांताबाई मारूती चौगुले यांचे कुलमुखत्यार**
**कृष्णा अप्पासाहेब शेनवडे .... अर्जदार**
**विरुध्द**
**श्री. मलप्पा महादेव चौगुले व इतर .... गैरअर्जदार**

मौजे शिरढोण ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथील सं.नं. १३५१, १३५२, १३७९ व १०९१ या वादमिळकतीबाबतच्या, प्रकरणातील अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे दि. ०५/१२/२०१३ रोजीच्या आदेशाविरूध्द प्रस्तुत अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २५७ अन्वये महाराष्ट्र शासनाकडे दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जावर अपर मुख्य सचिव (अपिल व रिव्हीजन ), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडे सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

२. सदर फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने दि.२७/०५/२०२६ रोजी आयोजित सुनावणीदरम्यान अर्जदारांनी गैरअर्जदार हे फेरतपासणी अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने त्यांना सदर प्रकरणी नोटीस बजावणे शक्य नसल्याचे ह्या न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिले. सबब सदर गैरअर्जदारांना दि.१९/०८/२०२६ रोजी या प्रकरणी आयोजित सुनावणीबाबत उपस्थित राहण्याबद्दल कळविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याचे निर्देश दि.२७/०५/२०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान देण्यात आले.

| अ. क्र. | गैरअर्जदाराचे नाव | गैरअर्जदाराचा पत्ता | नोटीस पोहोच न होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.शिवाजी धोंडी चव्हाण | रा. हिस्सा नं.२४८, वॉर्ड नं.१०, इचलकरंजी. ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | नमुद पत्त्यावर राहत नसल्यामुळे |

३. सदर पक्षकार उक्त नमुद दिनांकास सुनावणीच्या वेळी उपस्थित न राहिल्यास, सदर फेरतपासणी अर्जावर त्यांच्या अनुपस्थितीत एकतर्फी निर्णय पारित करण्यात येईल.

४. सदर समन्स मा. अपर मुख्य सचिव, अपिल व रिव्हीजन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई या न्यायालयाचे आदेश क्र.प्र.क्र.१००७ (११)२०२५/अवपु दि.२७/०५/२०२६ नुसार दिलेल्या निर्देशानुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

(शिक्का)

# राज्य उत्पादन विभाग कार्यालयात झिरो आणि वसुली एजंटचा सुळसुळाट

मिरज, ता.९ (प्रतिनिधी)

**राज्य उत्पादन शुल्क विभाग मिरज कार्यालयात झिरो आणि वसुली एजंटचा सुळसुळाट निर्माण झाला आहे, याबाबत संबंधित साहेब अनभिज्ञ आहेत. की त्यांच्याच मूक संमतीने सुरू आहे, याबाबत शहरात चर्चा सुरू आहे. केवळ माध्यमात बातम्या प्रसिद्ध किंवा प्रसारित झाल्या की मग कारवाई सुरू होते. मात्र साहेब म्हणतात आमच्या नियमित कारवाया सुरू असतात. या विभागाच्या जर कारवाया सुरू असतात तर मग त्या लपवल्या का जातात. का नियमित कारवाया केल्या जात नाहीत, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.**

एका झिरोच्या हातात सर्व कारभार असल्यामुळे कारवाईची माहिती माध्यमांपर्यंत पोहोचवली जात नाही. या कारवाया म्हणजे रईस पिक्चर सारख्या आहेत काय. म्हणजे फक्त कारवाया सुरू आहे असे दाखवण्यासाठी कारवाई दाखवायची, असे तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होत आहे. येथील झिरोचे अनेक कारनामे आहेत. लायसनधारकांच्या विरोधात आंदोलन करायला लावायचे परत मिटवायला आपण स्वतः पुढे यायचें. कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या विरोधात अर्ज करायला सामाजिक कार्यकर्त्यांचा उपयोग करायचा. आंदोलकांना सुद्धा उठवून बसवायचे. मिटवायला हेच बहाद्दर पुढे. अनेक वेळा आर्थिक तडजोडी केल्याच्या सुद्धा घटना घडल्या आहेत. वसुलीपासून ते सर्वकाही झिरो करतो. झिरोने आपले स्वतःचे सुद्धा एक दुकान थाटले आहे. झिरो कर्मचारी आणि झिरो अक्षरश:। धुमाकूळ घातला आहे. याची झळ सर्वसामान्य लोकांना बसत आहे मात्र अनपेक्षितपणे ती झळ साहेबांना आणि त्या डिपार्टमेंटला सुद्धा बसत आहे. चाय पेक्षा किटली गरम असा झिरोंचा कार्यालयाला मोठा फटका बसत आहे.

# जाहीर सूचना/शुद्धीपत्रक

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, मिळकत व्यवस्थापन विभागामार्फत इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या कै. शंकरराव पुजारी जलतरण तलावाकडे जीवरक्षक सेवा पुरविणे (वार्षिक) कामासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा क्रमांक ०३/२०२६-२७ दि. ०९/६/२०२६ रोजी प्रशासकीय/तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
उपायुक्त (०१)
इचलकरंजी महानगरपालिका







# बेन स्टोक्सला कर्णधारपदावरून हटवणार?

लंडन,ता.९–

**न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडच्या तयारीला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने (ईसीबी) कर्णधार बेन स्टोक्स आणि वेगवान गोलंदाज गस ॲटकिन्सन यांच्यावर संघ नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाची चौकशी सुरू केली आहे.**

ईसीबीने मंगळवारी सांगितले की, न्यूझीलंडविरुद्धची पहिली कसोटी संपल्यानंतर सोमवारी पहाटे हे दोन्ही खेळाडू एका नाईट क्लबमध्ये उपस्थित होते. बोर्ड सध्या या प्रकरणाची चौकशी करत असून अतिरिक्त माहिती गोळा करत आहे. पण, नाईट क्लबमध्ये नेमके काय घडले किंवा या कथित उल्लंघनाचे स्वरूप काय होते, हे ईसीबीने अद्याप स्पष्ट केलेले नाही. चौकशी पूर्ण झाल्यावरच संपूर्ण चित्र स्पष्ट होईल.

दोषी आढळल्यास दोन्ही क्रिकेटपटूंना दुसऱ्या कसोटीतून वगळले जाऊ शकते. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील मालिकेतील दुसरी कसोटी १७ जूनपासून लंडनच्या ओव्हल मैदानावर खेळवली जाईल. ईसीबीने सांगितले की, सोमवारी पहाटे ज्या नाईटक्लबमध्ये ही घटना घडली, तिथे बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन उपस्थित होते. बोर्डाने हे देखील स्पष्ट केले आहे की, तपास पूर्ण होईपर्यंत कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंड संघ नंतर जाहीर केला जाईल.

# भारताचा श्रीलंकेवर रोमहर्षक विजय

## ऋतुराज गायकवाडची शतकी खेळी

डांबुला,ता.९–

**भारत अ संघाने तिरंगी मालिकेतील पहिल्या सामन्यात यजमान श्रीलंका अ संघावर रोमहर्षक विजय मिळवला. २७८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंका विजयपथावर होती, परंतु भारतीय गोलंदाजांनी शेवटच्या षटकांत सामन्याला कलाटणी दिली.**

वैभव सूर्यवंशी (१४) व प्रभसिमरन सिंग (२) यांना सलामीला आलेल्या अपयशानंतर भारत अ संघाने तिरंगी मालिकेच्या पहिल्या वन डे सामन्यात ६ बाद २७७ धावांपर्यंत मजल मारली. प्रियांश आर्य व ऋतुराज गायकवाड यांनी तिसऱ्या विकेटसाठी ५३ धावांची भागीदारी करून श्रीलंका अ संघाला प्रत्युत्तर दिले. पण, प्रियांश (३२) रन आऊट झाला. मात्र,ऋतुराज व कर्णधार तिलक वर्मा, ही जोडी मैदानावर उभी राहिली. दोघांनी १५० धावांची भागीदारी केली.

ऋतुराजने लिस्ट ए क्रिकेटमधील त्याचे २१ वे शतक पूर्ण करताना ११४ चेंडूंत ६ चौकार व ३ षटकारांसह १०१ धावांची खेळी केली. तिलकने ६० धावा केल्या, तर आयुष बडोनी (२४) व सूयांश शेडगे (२६) यांनी चांगले योगदान दिले. श्रीलंकेच्या मोहम्मद सिराजने दोन विकेट्स घेतल्या.निरोशान डिकवेला व अविष्का फर्नांडो यांनी ९३ धावांची सलामी देत, श्रीलंकेला दमदार सुरूवात करून दिली. डिकवेला (४७) व फर्नांडो (४५) यांना आयुष बडोनीने माघारी धाडले. नुवानिंदू फर्नांडो (८) अपयशी ठरला, परंतु सदीरा समराविक्रमा व कर्णधार सहान अराछिगे, ही जोडी मैदानावर उभी राहिली. त्यांची ७८ धावांची भागीदारी अनुकूल रॉयने तोडली. सदीरा ४६ धावांवर बाद झाल्यानंतर रॉयने रविंदू फर्नांडोलाही (१) माघारी पाठवले. विपराज निगमने डावातील दुसरी विकेट घेताना चमिका करुणारत्नेला (९) स्वस्तात माघारी धाडले. पण, वनूजा सहानने १६ चेंडूंत १६ धावा करत सामना जवळ आणला. सहान (२३) व विजयकांत वियास्कांथ (५) हे ४९ व्या षटकात सलग दोन चेंडूंवर माघारी परतल्याने श्रीलंकेच्या हातून सामना निसटला. त्याच षटकात अर्शद खानने मोहम्मद सिराजची विकेट मिळवून श्रीलंकेचा डाव २६९ धावांवर गुंडाळत भारताने ८ धावांनी विजय मिळवला.



# मोहम्मद सिराज आयर्लंड-इंग्लंड टी-२० मालिकेतून बाहेर

## गिलच्या खास खेळाडूला संघात स्थान

नवी दिल्ली,ता.९–

**बीसीसीआयने काही दिवसांपूर्वीच आयर्लंड आणि इंग्लंडविरूध्द होणाऱ्या टी–२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली होती. या संघात मोठा बदल करण्यात आला आहे. सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरुन काढण्यात आले असून, संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आली आहे. दरम्यान, या मालिकेआधी भारतीय संघात आणखी एक मोठा बदल करण्यात आला आहे. संघातील अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याच्या जागी वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाला मुख्य संघात स्थान देण्यात आले आहे.**

अफगाणिस्तानचा संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये एकमात्र कसोटी सामन्याचा थरार रंगला. या सामन्यात भारतीय संघाने १ डाव आणि ३०० धावांनी विजय मिळवला. या सामन्यासाठी प्रसिध कृष्णा आणि मोहम्मद सिराज या दोन्ही गोलंदाजांना संघात स्थान देण्यात आले होते. पण आयर्लंड आणि इंग्लंडविरूध्द होणाऱ्या टी–२० मालिकेतून सिराजला विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय वर्कलोड मॅनेजमेंटमुळे घेतला गेला आहे.



भारतीय संघ २६ जूनपासून आयर्लंडविरूध्द टी–२० मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. त्यानंतर जुलै महिन्यापासून भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी–२० मालिकेला सुरुवात होणार आहे. दरम्यान, बीसीसीआयने याबाबत माहिती देत म्हटले की, वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला आयर्लंड आणि इंग्लंडविरूध्द होणाऱ्या टी–२० मालिकेतून बाहेर करण्यात आले आहे. मेडिकल टीम आणि टीम मॅनेजमेंट यांच्यात चर्चा झाल्यानंतर, वर्कलोड मॅनेज करण्यासाठी त्याला विश्रांती देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. इथून पुढील व्यस्त वेळापत्रक पाहता, सिराज पूर्णपणे फिट व्हावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. निवड समितीने मोहम्मद सिराजच्या जागी प्रसिध कृष्णाला संघात स्थान देण्याचा निर्णय घेतला आहे.

**आयर्लंड आणि इंग्लंडविरूध्द टी–२० मालिकेसाठी भारतीय संघ:** श्रेयस अय्यर (कर्णधार), तिलक वर्मा (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन, शिवम दुबे, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरूण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, प्रसिध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी

**आयर्लंडशी दोन हात, त्यानंतर इंग्लंड दौरा**

सध्या अफगाणिस्तानचा संघ भारत दौऱ्यावर असून नुकत्याच पार पडलेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारताने एक डाव आणि ३०० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. यानंतर दोन्ही संघांमध्ये १३ जूनपासून तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जाणार आहे. ही मालिका संपल्यानंतर भारतीय संघ आयर्लंडसाठी रवाना होईल, जिथे दोन सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाईल. आयर्लंड दौरा आटोपून भारतीय संघ थेट इंग्लंडला पोहोचेल, जिथे पाच सामन्यांची टी–२० मालिका आयोजित करण्यात आली आहे. याच दोन्ही दौऱ्यांवरील टी–२० मालिकेसाठी बीसीसीआयने संघात बदल केल्याची माहिती दिली आहे.

# फिफा विश्वचषक पंच ओमर आर्टनना अमेरिकेत नो एन्ट्री

मियामी, ता.९–

**फिफा विश्वचषकासाठीच्या सामना अधिकाऱ्यांच्या यादीत समावेश असलेल्या सोमालियाचे पंच ओमर आर्टन यांना अमेरिकेत प्रवेश नाकारण्यात आला. यामुळे फुटबॉलच्या सर्वात मोठ्या स्पर्धेत सामना पंचगिरी करणारे आपल्या देशातील पहिले पंच बनण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. २०२५ मध्ये आफ्रिकेचे सर्वोत्कृष्ट पंच म्हणून निवड झालेल्या ओमर आर्टन यांना मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अमेरिकेच्या सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण विभागाने थांबवले.**

एका निवेदनात, या संस्थेने म्हटले आहे की, नियमित प्रक्रियेचा भाग म्हणून अतिरिक्त तपासणीसाठी ओमर आर्टन यांना थांबवण्यात आले. तपासणीनंतर, विश्वचषक पंच म्हणून प्रवास करणारी व्यक्ती पडताळणीच्या समस्यांमुळे प्रवेशासाठी अपात्र असल्याचे निश्चित झाले आणि त्यांना अमेरिकेत प्रवेश नाकारण्यात आला, असे निवेदनात म्हटले आहे.

या समस्यांबद्दल संस्थेने कोणताही तपशील दिलेला नाही.फिफा विश्वचषकासाठी निवडले गेलेले ओमर आर्टन हे एकमेव सोमालियाचे पंच होते.

अमेरिकेने जून २०२५ पर्यंत ज्या देशांवर संपूर्ण प्रवासबंदी लागू केली आहे, त्या देशांमध्ये सोमालियाचा समावेश आहे. पण



काही विशेष परिस्थितीत काही प्रकरणांमध्ये सूट दिली जाऊ शकते. ओमर आर्टन यांच्याकडे वैध व्हिसा आणि राजनैतिक पासपोर्ट दोन्ही होते, पण अमेरिकी अधिकाऱ्यांनी ते प्रवेशासाठी अपुरे मानल्याचे सांगण्यात येते.

सोमालियाच्या युवा आणि क्रीडा मंत्रालयाचे वरिष्ठ सल्लागार, सीसे अदेन अबशीर यांनी या निर्णयावर टीका केली. एका अधिकृत निवेदनात ते म्हणाले, ओमर आर्टन हे आफ्रिकेतील सर्वात आदरणीय पंचांपैकी एक आहेत आणि ते संपूर्ण फुटबॉल समुदायाच्या समर्थनास पात्र आहेत. त्यांना अमेरिकेत प्रवेश नाकारणे आणि नियोजित सामन्यांमध्ये पंचगिरी करण्यापासून रोखणे हे केवळ त्यांच्यासाठी अन्यायकारक नाही, तर ते फुटबॉलच्या निष्पक्षता, कार्यक्षमता आणि खिलाडूवृत्तीच्या तत्त्वांनाही कमी लेखते.

# फेडरर अमेरिकन ओपनमध्ये प्रदर्शनीय सामना खेळणार

वॉशिंग्टन,ता.९–

**टेनिसमधील माजी जागतिक क्रमांक आणि पाच वेळा अमेरिकन ओपनचे विजेतेपद पटकावणारा रॉजर फेडरर न्यूयॉर्कमध्ये परतणार आहे. युनायटेड स्टेट्स टेनिस असोसिएशनने जाहीर केल्यानुसार, तो या वर्षी २५ ऑगस्ट रोजी अमेरिकन ओपनमध्ये एका प्रदर्शनीय सामन्यात सहभागी होणार आहे. ४४ वर्षीय फेडरर हा २००४ ते २००८ या काळात सलग पाच वेळा अमेरिकन ओपनचे विजेतेपद जिंकणारा एकमेव टेनिसपटू आहे.**

२०२२ मध्ये निवृत्ती जाहीर करण्यापूर्वी त्याने २०१९ मध्ये या ग्रँडस्लॅम स्पर्धेत अखेरचा सहभाग नोंदवला होता. रॉजर फेडरर: ॲन आयकॉन रिटर्न्स टू न्यूयॉर्क या शीर्षकाखाली होणाऱ्या या प्रदर्शनीय सामन्यात अँडी रॉडिक, जॉन मॅकेनरो आणि आंद्रे अगासी यांचाही सहभाग असणार आहे.

हा सामना आर्थर ॲश स्टेडियमवर फॅन वीक दरम्यान खेळवला जाईल. फॅन वीक हा मुख्य एकेरी स्पर्धेच्या (सिंगल्स ड्रॉ) सुरुवातीच्या आठवड्याआधी आयोजित केला जाणारा कार्यक्रम आहे आणि त्यानंतर २०२६ ची अमेरिकन ओपन स्पर्धा होणार आहे.

माझ्या कारकिर्दीतील अनेक अविस्मरणीय क्षण न्यूयॉर्कमध्ये घडले आहेत आणि आर्थर ॲश स्टेडियम हे माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे, असे फेडररने सांगितले. त्या वातावरणाचा भाग होणे आणि दरवर्षी चाहत्यांकडून मिळणारी अविश्वसनीय ऊर्जा अनुभवणे याची मला खूप आठवण येत होती, असेही या टेनिस दिग्गजाने नमूद केले.

हा सामना रॉजर फेडररचा इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेममध्ये समावेश होण्यापूर्वी आयोजित केला जात आहे. ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण आणि रौप्य पदक जिंकणाऱ्या, तसेच २० ग्रँडस्लॅम एकेरी विजेतेपदे आणि १०३ टूर–स्तरीय ट्रॉफी जिंकणाऱ्या फेडररची निवड पात्रतेच्या पहिल्याच वर्षी करण्यात आली. हा सोहळा २९ ऑगस्ट रोजी होणार आहे.




# बांगलादेशचा ऑस्ट्रेलियावर ८६ धावांनी विजय

मिरपूर,ता.९ –

**बांगलादेशने पहिल्या वन डे सामन्यात ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात २८४ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला अपयश आले. या सामन्यात बांगलादेशचा गोलंदाज नाहिद राणा चमकला, परंतु त्याने ऑस्ट्रेलियन कर्णधार जॉश इंग्लिस सोबत घातलेला राडा चर्चेत राहिला. इंग्लिसला अडवण्यासाठी बांगलादेशी खेळाडूंना मध्यस्थी करावी लागली. बांगलादेशने हा सामना डीएलएसनुसार ८६ धावांनी जिंकला.**

बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २८४ धावांपर्यं मजल मारली. त्यांचा सलामीवीर सैफ हसन (५) स्वस्तात माघारी परतल्यानंतर तंझिद हसन व नजमूल होसैन शांतो यांनी ९४ धावांची भागीदारी करून गाडी रुळावर आणली. नॅथन एलिसने ही भागीदारी तोडताना ४४ चेंडूंत ५४ धावा करणाऱ्या हसनला माघारी पाठवले. त्यानंतर लिटन दास (७) अपयशी ठरला. पण शांतो (६७), मोसाड्डेक होसैने (नाबाद ८६) आणि तोवहिद हृदय (३१) यांनी संघाला आश्वासक धावसंख्या उभारून दिली.

ऑस्ट्रेलियाकडून नॅथन एलिसने ३,तर



लाएम स्कॉट व मॅथ रेनशॉ यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार जॉश इंग्लिस १०व्या षटकात माघारी परतला, परंतु त्याला बाद करणाऱ्या नाहिद राणा व त्याच्याच बाचाबाची झाली. इंग्लिसला आवरण्यासाठी शांतो पुढे आला आणि वाद मिटवण्याचा प्रयत्न केला.कूपर कॉनली (३५) माघारी परतल्याने ऑस्ट्रेलिया अडचणीत आला होता. ॲलैक्स केरी व कॅमेरून ग्रीन यांनी आशा जिवंत ठेवल्या होत्या, परंतु नाहिद राणाने येथेही खोडा घातला. त्याने केरीला ४७ धावांवर माघारी पाठवले. पाठापोठ लिएस स्कॉट (२) व झेव्हियर बार्टलेट (१) यांच्या विकेट मिळवून राणाने बांगलादेशचा विजय जवळपास पक्का केला. ग्रीन एका बाजूने खिंड लढवत होता, परंतु धावा व चेंडू यांच्यातले वाढलेले अंतर पार करण्यात त्यालाही अशक्य होते.

दरम्यान, सामना सुरू असताना जोरदार वीज कडाडल्याने अम्पायर्सनी तातडीने बेल्स पाडल्या आणि खेळाडूंना ड्रेसिंग रूममध्ये जाण्यास सांगितले. त्यामुळे सामना ४२.२ षटकांत ९ बाद १९२ धावांवर थांबला होता. डीएलएसनुसार या परिस्थितीत ऑस्ट्रेलियाच्या २६० धावा झाल्या असत्या तर त्यांना विजयी घोषित केले गेले असते. परिस्थिती न सुधारल्याने बांगलदेशला डीएलएसनुसार ८६ धावांनी विजयी जाहीर केले गेले. ग्रीन ५२ धावांवर नाबाद राहिला.

# वन डे मालिकेसाठी रोहित शर्मा फिट

नवी दिल्ली,ता.९–

**विराट कोहलीच्या माघारीमुळे अफगाणिस्तानविरुध्दच्या वन डे मालिकेची उत्सुकता काहीशी कमी झाली आहे. भारतीय संघ तीन वन डे सामन्यांची मालिका खेळणार आहे.त्यात रोहित शर्माबाबत अपडेट्स मिळाली आहे. रोहित पूर्णपणे तंदुरुस्त झाला असून तो या मालिकेत खेळणार आहे.**



रोहित पुनर्वसनासाठी बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलेन्समध्ये गेला होता आणि वैद्यकिय टीमने त्याला तंदुरुस्त घोषित केले आहे. बीसीसीआयने या मालिकेसाठी रोहितचा संघात समावेश केला असून त्याची उपलब्धता ही फिटनेस टेस्टवर अवलंबून असेल, हे स्पष्ट केले होते.३९ वर्षीय रोहितच्या खेळण्याने टीम इंडियाला मजबूती मिळाली आहे. त्याला २०२७ चा वन डे वर्ल्ड कप खेळायचा आहे आणि त्यापूर्वी फार कमी वन डे सामने भारताला खेळायचे आहेत. त्यामुळे एकाही मालिकेला मुकणे, हे रोहितच्या संघातील स्थानाला धोका निर्माण करणारे ठरू शकते.

# फुटबॉलचा कुंभमेळा : ४८ संघ, १०४ सामने होणार

नवी दिल्ली, ता.९ –

**९६ वर्षांपूर्वी (१९३० मध्ये) उरुग्वे येथे झालेल्या पहिल्या विश्वचषकापासून, २०२६ मध्ये होणाऱ्या २३ व्या विश्वचषकातील संघांची संख्या वाढून ४८ झाली आहे. पहिल्यांदाच, ४८ संघांमध्ये १०४ सामने खेळले जातील आणि २३ व्या विश्वचषकाचा विजेता घोषित केला जाईल.**

१९३० मध्ये उरुग्वे येथे झालेल्या पहिल्या विश्वचषकापासून ते १९७८ मध्ये अर्जेंटिना येथे झालेल्या विश्वचषकापर्यंत, संघांची संख्या १३ वरून १५ आणि नंतर ११ व्या विश्वचषकात १६ पर्यंत कमी झाली. १९८२ मध्ये स्पेन येथे झालेल्या १२ व्या विश्वचषकापासून ते १९९४ मध्ये अमेरिकेत झालेल्या १५ व्या विश्वचषकापर्यंत, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांची संख्या १६ वरून २४ पर्यंत वाढली. १९९८ मधील १६ व्या विश्वचषकापासून ते २०२२ मध्ये कतार येथे झालेल्या २२ व्या विश्वचषकापर्यंत, सात विश्वचषकांमध्ये ३२ संघांनी भाग घेतला. २०२६ मध्ये, प्रथमच, अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांमधील १६ शहरांमध्ये ४८ संघांमध्ये १०४ सामने खेळले जातील.

फिफा विश्वचषक स्पर्धेतील संघांची संख्या ३२ वरून ४८ करण्याचा निर्णय २०१३ मध्ये युएफाचे अध्यक्ष आणि फ्रान्सचे माजी कर्णधार मिशेल प्लाटिनी यांनी, तर २०१६ मध्ये फिफाचे विद्यमान अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी घेतला होता. फुटबॉलची जगभरातील लोकप्रियता आणि त्याची सतत वाढणारी बाजारपेठ लक्षात घेता, अखेरीस २०२३ मध्ये फिफा विश्वचषक स्पर्धेतील संघांची संख्या ३२ वरून ४८ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे आशियातील अव्वल आठ संघांना सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

सर्व ४८ संघांची १२ गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. सामन्यांची संख्याही सध्याच्या विश्वचषका पेक्षा ४० ने वाढून १०४ झाली आहे. सर्व गट सामने तीन देशांमधील १६ ठिकाणी खेळले जातील. दररोज अंदाजे तीन सामने होतील. फिफा २०२६ मध्ये, ३२ दिवसांऐवजी ३९ दिवसांत (११ जून ते १९ जुलै) सामने आयोजित करण्यात आले आहेत.पहिल्या १२ गटांपैकी प्रत्येक गटातून दोन संघ बाद फेरीसाठी पात्र ठरतील. या १२ गटांमधील तिसऱ्या क्रमांकावरील संघांपैकी आठ संघ रँकिंगच्या आधारावर नॉकआऊट फेरीसाठी पात्र ठरतील. २९ जून ते ३ जुलै दरम्यान, ३२ संघांच्या नॉकआऊट फेरीतून १६ संघ पुढे जातील. ४ जुलै ते ७ जुलै दरम्यान, १६ संघांमध्ये ८ सामने खेळले जातील. येथून पुढे स्पर्धा अधिक आव्हानात्मक होईल. जगातील अव्वल संघांनाही चुकीला वाव राहणार नाही. ४८ संघांच्या स्पर्धेतून पुढे आलेल्या ८ संघांमधील उपांत्यपूर्व फेरीचे सामने ९ ते ११ जुलै दरम्यान खेळले जातील. ९ आणि १० जुलै रोजी एक उपांत्यपूर्व फेरीचा सामना, तर ११ जुलै रोजी दोन उपांत्यपूर्व फेरीचे सामने खेळले जातील.




**उपांत्य फेरीत पोहोचलेल्या चार संघांना दोन दिवसांची विश्रांती मिळेल. उपांत्य फेरीचे सामने १४ आणि १५ जुलै रोजी, तर तिसऱ्या स्थानासाठीचा सामना १८ जुलै रोजी खेळला जाईल. अंतिम सामना १९ जुलै रोजी अमेरिकेतील न्यू जर्सी येथील मेटलाइफ स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहे.**